# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, शुक्रवार १९ जून २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ ८







## 'होर्मुझ' पुन्हा खुला होताच 40 LPG टँकर्स भारताच्या दिशेने रवाना

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** फेब्रुवारी महिन्यापासून इराण आणि अमेरिका यांच्यात सुरू असलेल्या युद्धामुळे भारतासह जागतिक अर्थव्यवस्थेला मोठा फटका बसला. विशेषतः भारताला इंधन आणि गॅस टंचाईचा तीव्र सामना करावा लागला. मात्र, आता दोन्ही देशांमध्ये शांतता



प्रस्थापित होण्याचे संकेत मिळत असून, भारतासाठी एक अत्यंत आनंदाची बातमी समोर आली आहे. जागतिक इंधन पुरवठ्यासाठी महत्त्वाचा मानला जाणारा 'स्ट्रेट ऑफ होर्मुझ' जलमार्ग अखेर पूर्णपणे खुला झाला असून, तेथून तेल आणि एलपीजी गॅसने भरलेले टँकर्स भारताकडे येण्यास सुरुवात झाली आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, इराण-अमेरिका शांतता चर्चेनंतर होर्मुझ सामुद्रधुनीतील वाहतूक पुन्हा सुरळीत होत असून, भारताच्या दिशेने सुमारे ४० जहाजे रवाना झाली आहेत. LPG भारतात आणला जात आहे. त्यामुळे देशातील कोट्यवधी कुटुंबांना भेडसावणा-या गॅस पुरवठ्याच्या समस्येत लवकरच दिलासा मिळण्याची शक्यता आहे. उर्जा क्षेत्रातील विश्लेषकांच्या मते, या संघर्षाचा सर्वाधिक परिणाम LPG क्षेत्रावर झाला. Kpler चे वरिष्ठ उर्जा विश्लेषक सुमित रितोलिया यांनी दिलेल्या माहितीनुसार, युद्धपूर्व काळाच्या तुलनेत भारताची LPG आयात सुमारे ५१ टक्क्यांनी घटली होती. त्यामुळे देशातील साठे पुन्हा भरून काढण्याचा मोठा दबाव निर्माण झाला होता. त्यांच्या मते, उर्जा पुरवठा तात्काळ पूर्ववत होण्याची शक्यता कमी असून, परिस्थिती टप्प्याटप्प्याने सामान्य होईल. ⇨(पान २ वर)

## स्मृती मंधानाचा टी-20 क्रिकेटमध्ये नवा कीर्तिमान!

**नवी दिल्ली :** लीड्समधील हेडिंग्ले इथे खेळल्या गेलेल्या सामन्यात मंधानाने ४७ चेंडूंमध्ये ७४ धावांची शानदार खेळी केली. तिच्या या खेळीत ११ चौकार आणि एका षटकाराचा समावेश होता. मंधानाने आपल्या शानदार फलंदाजीने टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ६०० चौकार मारून इतिहास रचला. यासह, ती पुरुष आणि महिला टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेट या दोन्हीमध्ये ६०० पेक्षा जास्त चौकार मारणारी जगातील पहिली क्रिकेटपटू ठरली.भारतीय महिला क्रिकेट संघाची उपकर्णधार स्मृती मंधाना आपल्या फलंदाजीने सातत्याने




विक्रम करत आहे. यामुळेच प्रत्येक सामन्यात एक मोठा विक्रम रचला जातो किंवा मोडला जातो. आयसीसी महिला टी-२० विश्वचषक २०२६ मध्ये नेदरलँड्सविरुद्धच्या सामन्यात मंधानाने एक असा विश्वविक्रम रचला, जो पुरुष किंवा महिला क्रिकेटमधील कोणत्याही फलंदाजाने आजपर्यंत केलेला नाही.स्पर्धेतील हे तिचे सलग दुसरे अर्धशतक होते. तिच्या शानदार खेळीमुळे भारताने २० षटकांत २०९ धावांचा डोंगर उभा केला आणि नंतर हा सामना ९५ धावांनी जिंकला. उत्कृष्ट कामगिरीबद्दल मंधानाला सामनावीर म्हणून गौरविण्यात आले.स्मृतीच्या नावावर आता टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये एकूण ६०४ चौकार आहेत. या यादीत न्यूझिलंडची सुझी बेट्स ५२१ चौकारांसह दुस-या क्रमांकावर आहे, तर श्रीलंकेची चमारी अथापथ्थू ४९३ चौकारांसह तिस-या क्रमांकावर आहे. पुरुष क्रिकेटमध्ये, पाकिस्तानचा बाबर आझम सर्वाधिक चौकार मारणारा फलंदाज आहे, पण तोही मंधानाच्या मागे आहे. मंधाना केवळ चौकारांच्या बाबतीतच नव्हे, तर धावांच्या बाबतीतही अव्वल दोन खेळाडूंमध्ये आहे. महिलांच्या टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये तिच्या नावावर ४,४७५ धावा आहेत. तिच्यापेक्षा फक्त न्यूझिलंडची सुझी बेट्स पुढे आहे, जिच्या नावावर ४,७२० धावा आहेत. मात्र, बेट्स सध्याच्या टी-२० विश्वचषकानंतर निवृत्त होणार असल्याने, मंधाना लवकरच हा विक्रम मोडेल अशी अपेक्षा आहे.

## कृषी सेवा परीक्षेत शाहिद शेख राज्यात पहिला ऋतुजा डुंबरे मुलींमधून पहिली

**नागपूर:** महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे महाराष्ट्र कृषी सेवा (मुख्य) परीक्षा-२०२४ करीता मुलाखती घेण्यात आलेल्या परीक्षेचा अंतिम निकाल १७ जून, २०२६ रोजी आयोगाच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात आला. त्यानुसार विविध ०३ संवर्गातील एकूण २५८ पदांवर उमेदवारांची शिफारस करण्यात आल्या आहेत. सदर परीक्षेमधून अहिल्यानगर जिल्ह्यातील शेख शाहिद अफसर (बैठक क्रमांक पीएन ००५३१६) हे सर्वसाधारण वर्गवारीतून राज्यात प्रथम आले आहेत. तर पुणे जिल्ह्यातील डुंबरे ऋतुजा रामदास (बैठक क्रमांक पीएन००१०६८) या मागास वर्गवारीतून तथा महिला वर्गवारीतून राज्यात प्रथम आल्या आहेत. संकेतस्थळावर गुण प्रसिद्ध- उमेदवारांच्या माहितीसाठी प्रस्तुत निकाल व प्रत्येक प्रवर्गाकरीता शिफारसपात्र ठरलेल्या शेवटच्या उमेदवाराचे गुण (सीमांकन गुण) आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले आहेत. प्रस्तुत निकालाधारे शिफारसपात्र ठरलेल्या सर्व उमेदवारांच्या शिफारशी विषयांकित परीक्षेच्या आवेदनपत्रातील दाव्यांच्या पृष्ठ्यर्थ नियुक्तीच्यावेळी त्यांची पदासाठीची पात्रता मूळ प्रमाणपत्रांवरून तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून शासनाकडे करण्यात येत आहे. उमेदवारांनी आवेदनपत्रात दिलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास अथवा आवेदनपत्रातील दाव्यानुसार आवश्यक प्रमाणपत्रांची पूर्तता नियुक्तीच्यावेळी न केल्यास तसेच शासनस्तरावर अधिसूचनेतील तरतूदीनुसार दावे तपासतांना व अन्य कारणांमुळे अपात्र ठरणा-या संबधित उमेदवारांची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

## झाडीपट्टीचा शब्दगंध आता बालभारतीत; 'सरावन मईन्यात' कविता गाजणार

**गोंदिया :** जिल्ह्यातील झाडीपट्टीच्या सांस्कृतिक वैभवाला आणि बोलीभाषेच्या समृद्ध परंपरेला राज्यस्तरावर मानाचा मुजरा मिळाला आहे. लोककलावंतांचे गाव म्हणून परिचित असलेल्या म्हसवाणी (ता. सडक अर्जुनी) येथील



ज्येष्ठ साहित्यिक, कवी, गझलकार आणि झाडीबोलीचे खंदे संवाहक लोकराम केशव शेंडे यांच्या सरावन मईन्यात या कवितेचा समावेश महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाच्या इयत्ता चौथीच्या बालभारती पाठ्यपुस्तकात करण्यात आला आहे. या निर्णयामुळे केवळ एका साहित्यिकाचा गौरव झालेला नसून झाडीबोलीचा मधुर शब्दगंध आता राज्यातील लाखो विद्यार्थ्यांच्या ओठांवर फुलणार आहे. ग्रामीण जीवनातील सहजता, निसर्गाशी असलेले घट्ट नाते, मातीतून उमटणा-या भावना आणि झाडीबोलीची लयबद्ध अभिव्यक्ती यांचे सुंदर दर्शन घडविणारी सरावन मईन्यात ही कविता विद्यार्थ्यांना भाषेची गोडी लावण्यासोबतच ग्रामीण संस्कृतीची ओळख करून देणारी ठरणार आहे. विशेष म्हणजे, मराठी भाषेच्या मुख्य प्रवाहात झाडीबोलीतील साहित्याला मिळालेली ही एक महत्त्वपूर्ण आणि अभिमानास्पद नोंद मानली जात आहे. लोकराम शेंडे यांचा साहित्यिक आणि कलात्मक प्रवास अत्यंत प्रेरणादायी आहे. अवघ्या पाचव्या वर्षी दंडार लोकनाट्यातून त्यांनी कलाक्षेत्रात पदार्पण केले. सातव्या वर्षी बालस्त्री कलाकार म्हणून रंगभूमीवर उभे राहत त्यांनी अभिनय आणि गायनाचा ठसा उमटविला. पुढे एकच प्याला, कट्यार काळजात घुसली यांसारख्या गाजलेल्या संगीत नाटकांमध्ये त्यांनी भूमिका साकारत रसिकांची वाहवा मिळविली.

# भाजप नेत्यासह तिघांची जिवंत जाळून हत्या

### छत्तीसगडमध्ये वाळू माफियांचा हैदोस, फॉर्च्यूनर कार पेटवली



**गडचिरोली/प्रतिनिधी :** नक्षलमुक्तीच्या अंतिम टप्प्यावर असलेल्या शेजारील छत्तीसगडच्या कोरिया जिल्ह्यात वाळू व्यवसायातील वर्चस्व आणि आर्थिक व्यवहारांतील वादातून भाजपचे स्थानिक नेते भारत सिंह उर्फ लाला सिंह यांच्यासह तिघांची निर्घृण हत्या झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. मंगळवारी रात्री उशिरा नोगई गावाजवळ घडलेल्या या घटनेत हल्लेखोरांनी भारत सिंह यांच्या फार्च्युनर वाहनाचा पाठलाग करून ते ट्रकांच्या सहाय्याने अडविले आणि वाहनाला आग लावल्याचा आरोप आहे. या घटनेने देशात खळबळ उडाली असून वाळू व्यवसायातील वाढत्या गुन्हेगारीचे गंभीर स्वरूप पुन्हा एकदा समोर आले आहे.सोहनत पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नोगई गावाजवळ ही घटना घडली. भारत सिंह हे जनपद पंचायतचे माजी अध्यक्ष तसेच भाजपचे स्थानिक नेते होते. प्राथमिक माहितीनुसार, संबंधित परिसरातील वाळू उत्खननाचे कंत्राट भारत सिंह यांच्या कुटुंबाकडे होते. दुसरीकडे, वाळू वाहतूक करणा-या वाहनांचा व्यवसाय त्रिपाठी कुटुंबाकडे असल्याचे सांगितले जाते. या दोन्ही गटांमध्ये गेल्या काही महिन्यांपासून आर्थिक व्यवहार आणि व्यवसायावरील नियंत्रणाच्या मुद्द्यावरून वाद सुरू होता.मंगळवारी रात्री भारत सिंह हे आपल्या सहका-यांसह फार्च्युनर वाहनाने प्रवास करत असताना हल्लेखोरांनी त्यांचा पाठलाग केल्याचे सांगितले जाते. त्यानंतर वाहनाच्या पुढे आणि मागे ट्रक उभे करून त्यांचा मार्ग रोखण्यात आला. वाहनाला बाहेर पडण्याचा कोणताही मार्ग न राहिल्याने हल्लेखोरांनी त्यावर ज्वलनशील पदार्थ टाकून आग लावल्याचा आरोप आहे.

**हल्लेखोरांकडून मारहाण-** या आगीत भारत सिंह यांचा वाहनातच होरपळून मृत्यू झाला. वाहनातील इतरांनी जीव वाचविण्यासाठी बाहेर पडण्याचा प्रयत्न केला. मात्र, बाहेर पडलेल्या व्यक्तींवर हल्लेखोरांनी मारहाण केल्याचे तपासातून समोर आले आहे. या घटनेत शिक्षक नागेंद्र सिंह आणि वीरेंद्र सिंह यांचाही मृत्यू झाला. वीरेंद्र सिंह यांच्या गळ्यावर धारदार शस्त्राने वार झाल्याचे सांगितले जात असून त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते; मात्र उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली.

**परिसरात तणावाचे वातावरण**

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. तिहेरी हत्याकांडानंतर परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून आरोपींचा शोध घेण्यासाठी विशेष पथके नियुक्त करण्यात आली आहेत. या प्रकरणाचा तपास सुरू असून वाळू व्यवसायाशी संबंधित गुन्हेगारी कारवायांबाबत पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

## हिमाचल प्रदेशात कार दरीत कोसळली;7 ठार


**चंबा/वृत्तसंस्था :** हिमाचल प्रदेशातील चंबा जिल्ह्यात एक दुर्दैवी अपघात घडला आहे. चंबा जिल्ह्यातील चुराह भागातील पुखरी-मसरुंड रस्त्यावर एका वाहनाचा ताबा सुटून ते खोल दरीत कोसळल्याने सात जणांचा मृत्यू झाला; यामध्ये एकाच गावातील तीन भावांचाही समावेश आहे. मृतांमध्ये पुरुष आणि महिलांचा समावेश असून, ते एका मुंडन (केशमुंडन) समारंभातून परतत होते.



अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिक आणि पोलिस पथक घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी बचावकार्य सुरू केले. स्थानिक नागरिकांनी दिलेल्या माहितीनुसार, पहाटे २ वाजण्याच्या सुमारास चंबा-मसरुंड रस्त्यावरील छतरुंडजवळ बोलेरो गाडीचा ताबा सुटला आणि ती सुमारे ५०० मीटर खोल दरीत कोसळली. अपघाताच्या वेळी गाडीमध्ये चालक आणि ग्रामपंचायत महाल अंतर्गत येणा-या सप्रोथ गावातील सहा रहिवासी (तीन पुरुष आणि तीन महिला) प्रवास करत होते. ते काकड्रोथा गावात एका मुंडन समारंभाला उपस्थित राहून घरी परतत होते.छतरुंडजवळ गाडीचे नियंत्रण सुटले आणि ती रस्त्यावरून खाली खोल दरीत कोसळली. गाडीतील सातही जणांचा जागीच मृत्यू झाला. या दुर्दैवी घटनेमुळे गावात शोककळा पसरली आहे. अतिरिक्त पोलिस अधीक्षक (चंबा) दिनेश कुमार यांनी सांगितले की, अथक प्रयत्नांनंतर दरीतून मृतदेह बाहेर काढण्यात आले. त्यानंतर सर्व मृतदेह शवविच्छेदनासाठी पंडित जवाहरलाल नेहरू शासकीय वैद्यकीय महाविद्यालय चंबा येथे पाठवण्यात आले. पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल केला असून, अपघाताच्या कारणाचा तपास सुरू केला आहे. स्थानिक आमदारांकडून दुःख व्यक्त चंबा जिल्ह्यातील चुराहचे भाजपा आमदार हंसराज यांनी या अपघातावर दुःख व्यक्त केले आहे. आमदारांच्या म्हणण्यानुसार, अपघातानंतर स्थानिक नागरिक पोलिसांना मदत करत आहेत. आमदार हंसराज यांनी नमूद केले की, या भागात क्रॅश बॅरियर्स (सुरक्षा कठडे) नसल्यामुळे अशा प्रकारचे अपघात घडतात.

## अमेरिका-इराणकडून शांतता करारावर अधिकृत स्वाक्षरी

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांनी दोन्ही देशांदरम्यान गेल्या काही महिन्यांपासून सुरू असलेला संघर्ष संपवण्यासाठी एका सामंजस्य करारावर अधिकृतपणे स्वाक्षरी केली आहे.अमेरिका आणि इराणच्या अधिका-यांच्या म्हणण्यानुसार, दोन्ही देशांच्या अध्यक्षांनी बुधवारी या सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली. हा करार त्वरित लागू झाला आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांनी १४ कलमी सामंजस्य करारावर व्हर्च्युअल पद्धतीने स्वाक्षरी केली. या कराराचा उद्देश दोन्ही देशांमधील शत्रुत्व संपवणे, होर्मुझची सामुद्रधुनी पुन्हा खुली करणे आणि निर्बंध तसेच इराणचा अणुकार्यक्रम यांबाबत अंतिम करारासाठी ६० दिवसांची वाटाघाटी प्रक्रिया सुरू करणे हा आहे.



**करार त्वरित लागू झाला-** व्हाईट हाउसच्या एका अधिका-याचा हवाला देत सीएनएनने वृत्त दिले की, पॅरिसमध्ये फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रान यांची भेट घेत असताना ट्रम्प यांनी बुधवारी या करारावर (मेमोरँडमवर) स्वतः स्वाक्षरी केली. पेझेश्कियान यांनीही स्वाक्षरी केलेला हा करार त्वरित लागू झाला.

**कधी झाली करारावर स्वाक्षरी?-** अमेरिकेच्या एका अधिका-याने दिलेल्या माहितीनुसार, फ्रान्समधील व्हर्साय पॅलेस येथे मॅक्रॉन यांच्यासोबतच्या स्नेहभोजनादरम्यान राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी अमेरिका-इराण कराराच्या मूळ प्रतीवर (हार्ड कॉपी) अधिकृतपणे स्वाक्षरी केली. स्वाक्षरी केलेल्या कराराच्या प्रती इराण आणि मध्यस्थी करणा-या देशांकडे पाठवण्यात आल्या आहेत. यापूर्वी रविवारी, अमेरिकेचे उपराष्ट्राध्यक्ष जे. डी. व्हान्स आणि इराणचे मुख्य वार्ताकार मोहम्मद बागेर घलिबाफ यांनी एका सामंजस्य करारावर इलेक्ट्रॉनिक पद्धतीने स्वाक्षरी केली होती.

## ग्राहकांना प्रीपेड मीटर बंधनकारक नाही; महावितरणचा मोठा खुलासा

**नागपूर/प्रतिनिधी :** राज्यामध्ये प्रीपेड इलेक्ट्रिक स्मार्ट मीटरला जोरदार विरोध केला जात असताना महावितरण कंपनीने बुधवारी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठामध्ये नागरिकांना दिलासा देणारा खुलासा केला. सध्या प्रीपेड मीटर कोणत्याही ग्राहकांना बंधनकारक करण्यात आले नाही, असे महावितरणने सांगितले. तसेच, ग्राहकांनी मागणी केली, तरच त्यांना प्रीपेड मीटर दिले जाईल, अशी माहिती दिली.





प्रीपेड मीटरविरोधात विदर्भ वीज ग्राहक संघटनेच्या वतीने उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात आली आहे. त्यावर न्यायमूर्तिद्वय अनिल किलोर व राज वाकोडे यांच्यापुढे सुनावणी झाली. ग्राहकांना प्रीपेड मीटर देण्याचा निर्णय मनमानी स्वरूपाचा आहे, असा आरोप याचिकेत करण्यात आला आहे. हा निर्णय घेण्यापूर्वी आवश्यक अभ्यास करण्यात आला नाही. यासंदर्भात कोणताही अहवाल नाही.प्रीपेड मीटरचा रिचार्ज संपल्यानंतर वीज पुरवठा आपोआप बंद होईल. रिचार्ज करण्याची तलवार सतत डोक्यावर राहील. ऑनलाईन व्यवहार करणे सर्वांना शक्य नाही. प्रत्येकाकडे स्मार्ट फोन नाहीत. या निर्णयामुळे मीटर रीडिंग व वीज बिल वितरित करणा-या कर्मचा-यांच्या नोक-याही जातील, असे याचिकाकर्त्याचे म्हणणे आहे. महावितरणने न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल करून हे सर्व आरोप फेटाळले आहेत.

**ग्राहकांच्या अधिकारावर प्रश्नचिन्ह-** न्यायालयाने ग्राहकांच्या अधिकारावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. ग्राहकांना स्मार्ट मीटर नाकारण्याचा अधिकार आहे का किंवा स्मार्ट मीटर लावण्यासाठी ग्राहकांची परवानगी घेणे आवश्यक आहे, अशी कोठे तरतूद आहे का, असे प्रश्न न्यायालयाने याचिकाकर्त्याला विचारले आणि यावर येत्या सोमवारी उत्तर सादर करण्याचे निर्देश दिले. निराधारपणे विरोध करणे याचिकाकर्त्याच्या हिताचे होणार नाही, असा इशाराही दिला.

## महायुतीची एकतर्फी सरशी?

**मुंबई/प्रतिनिधी :** विधान परिषद निवडणुकीत महायुतीचा 'सुपडा साफ' फॉर्म्युला यशस्वी ठरणार? की EXIT Poll चे अंदाज निकालाच्या दिवशी उलटे ठरणार? काही मतदारसंघांमध्ये थेट एकतर्फी लढती, काही ठिकाणी विरोधकांचा पूर्णपणे सफाया, तर काही ठिकाणी अपक्षांनी समीकरणं बदलण्याचा प्रयत्न केला. पण मतदानानंतर समोर आलेल्या EXIT Poll च्या आकड्यांमुळे महायुतीला मोठा फायदा होणार असल्याचं चित्र दिसत आहे. राज्यातील १२ विधान परिषद मतदारसंघांसाठी मतदान पार पडलं आणि अनेक ठिकाणी मतदारांनी विक्रमी उत्साह दाखवला. नाशिक, नांदेड आणि भंडारा-गोंदियामध्ये शंभर टक्के मतदान झालं, तर सोलापूर, परभणी आणि जळगावमध्येही जवळपास संपूर्ण मतदान झालं. मतदानानंतर आता सर्वांच्या नजरा लागल्या आहेत त्या EXIT Poll कडे. आणि या EXIT Poll मधील आकडे पाहिले तर महाराष्ट्रात महायुतीचा वरचष्मा दिसत असून विरोधकांसाठी मात्र ही धोक्याची घंटा ठरू शकते.




**भाजपचा सर्वाधिक दबदबा?**

EXIT Poll नुसार अमरावती, भंडारा-गोंदिया, नागपूर, संभाजीनगर-जालना, धाराशिव-लातूर-बीड, नांदेड, जळगाव, सांगली-सातारा आणि सोलापूर या मतदारसंघांमध्ये भाजप उमेदवार आघाडीवर असल्याचा अंदाज आहे. विशेष म्हणजे काही ठिकाणी विजयाची आघाडी इतकी मोठी दिसत आहे की विरोधी उमेदवारांना दुप्पट किंवा तिप्पट मतांनी मागे टाकलं जाउ शकतं. नागपूरमध्ये राजीव पोतदार, धाराशिव-लातूर-बीडमध्ये बसवराज पाटील, सांगली-सातायात धैर्यशील कदम आणि सोलापुरात राजेंद्र राउत यांना स्पष्ट आघाडी मिळण्याचा अंदाज आहे.

**शिंदे सेना दोन जागांवर आघाडीवर-** EXIT Poll नुसार परभणी-हिंगोली आणि नाशिकमध्ये शिंदे सेनेचे उमेदवार विजयाच्या दिशेने वाटचाल करताना दिसत आहेत. नाशिकमध्ये नरेंद्र दराडे यांना मोठी आघाडी मिळण्याचा अंदाज आहे, तर परभणी-हिंगोलीत सईद खान यांच्याकडे पारडे झुकलेलं दिसत आहे. म्हणजेच, भाजपसोबत शिंदे सेनाही आपली ताकद कायम ठेवताना दिसत आहे.

**विरोधकांसाठी चिंतेचा विषय?**

काँग्रेस, ठाकरे सेना आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादीला बहुतांश ठिकाणी मोठी पिछाडी दिसत आहे. अनेक मतदारसंघांमध्ये विरोधी उमेदवारांना अपेक्षित मतं मिळत नसल्याचं EXIT Poll मधून समोर येत आहे. यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांमधील राजकीय समीकरणं बदलली आहेत का? हा प्रश्न उपस्थित होत आहे.पण EXIT Poll म्हणजे अंतिम निकाल नाही... इतिहास पाहिला तर EXIT Poll चे अंदाज अनेकदा खरे ठरले आहेत, तर अनेकदा निकालाच्या दिवशी चित्र पूर्णपणे बदललेलंही पाहायला मिळालं आहे. त्यामुळे सध्या दिसत असलेली महायुतीची आघाडी प्रत्यक्ष निकालात कायम राहणार की विरोधक काही धक्कादायक निकाल देणार, हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे. भाजप ९ जागांवर आणि शिंदे सेना २ जागांवर विजय मिळवू शकते, असं चित्र आहे. याचा थेट परिणाम आगामी महापालिका, जिल्हा परिषद आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांवर होउ शकतो. दुसरीकडे, विरोधी पक्षांसाठी ही आत्मपरीक्षणाची वेळ ठरू शकते.

## आम्ही 25 कोटी भारतीयांना गरिबीतून बाहेर काढले-मोदी

**पॅरिस/नवी दिल्ली-** पॅरिसमधील भारतीय समुदायाला संबोधित करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, 'आपल्या भागीदारीला १२ वर्षे पूर्ण झाल्यानंतर काही दिवसांनीच मी आज फ्रान्समध्ये आलो आहे.'मोदी म्हणाले, '१२ वर्षे देशाची सेवा करणे हे माझ्या आयुष्यातील एक मोठे सौभाग्य आहे. भारताच्या लोकशाहीच्या सामर्थ्यानेच एका चहा विक्रेत्याला या स्तरावर आणले आहे.'पंतप्रधान म्हणाले, '२५ कोटी लोक गरिबीतून बाहेर आले आहेत. ही अशी प्रगती आहे, जिचा लाभ समाजातील शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहोचत आहे. आज फ्रान्समध्ये असलेल्या एकूण घरांपेक्षाही जास्त घरे आम्ही भारतात गरजूंसाठी बांधली आहेत. 'पंतप्रधानांच्या भाषणातील ५ महत्त्वाच्या गोष्टी; म्हणाले, 'भारत हा जगातील दुसरा ⇨(पान २ वर)

### पॅरिसमध्ये म्हणाले- आज फ्रान्समध्ये जेवढी घरे, त्यापेक्षा जास्त आम्ही गरजूंना दिली



## बंडखोर खासदारांना वाय+सुरक्षा

**बीड/प्रतिनिधी-** राज्यातील राजकारणात काल मोठा भूकंप झाला. उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेतील ९ खासदारांपैकी ६ खासदारांनी पक्ष सोडून एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत विलीन होण्याचा निर्णय घेतला. या गटाफुटीनंतर राज्यात एकच खळबळ उडाली. यानंतर मात्र संजय राउत यांनी फुटलेल्या खासदारांना कार्यकर्त्यांना फोडून काढण्याचे आदेश दिले आणि परभणी, वाशिम, बीडमध्ये कार्यकर्ते आक्रमक झाले. दरम्यान उबाठा सेनेतून फुटलेल्या त्या ६ खासदारांना आता वाय प्लस सुरक्षा देण्यात आली आहे. या निर्णयानंतर राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आले आहे. परभणीचे खासदार संजय जाधव यांनी स्वतंत्र भूमिका घेतल्यानंतर परभणी जिल्ह्यातील ठाकरे समर्थक शिवसैनिक आक्रमक झाले आहेत. सोनपेठ येथे शिवसैनिकांनी संजय जाधव यांच्या प्रतिमेला चपलांचा हार घालत निषेध ⇨(पान २ वर)



## ऊबाठाचे 22 नगरसेवक शिंदेंच्या गळाला?

**मुंबई/प्रतिनिधी :** उबाठाचे सहा खासदार गळाला लावल्-यानंतर शिवसेना शिंदे गटाने मुंबई महापालिकेत ऑपरेशन टायगर-२ राबविण्याच्-या हालचाली सुरू केल्-या आहेत. पहिल्या टप्प्यात उबाठाचे २२ नगरसेवक गळाला लावण्याचो प्रयत्न सुरू झाले आहेत. तशी चर्चा महापालिका मुख्यालयात दबक्या आवाजात सुरू आहे. परंतु दोन तृतीयांश संख्याबळाच्-या नियमामुळे प्रवेशाचे घोडे अडल्याचे बोलले जात आहे.मुंबई महानगरपालिकेत उबाठाचे ६५ नगरसेवक आहेत. यापैकी २२ नगरसेवक स्वतंत्र गट तयार करून शिंदे गटात येण्यास उत्-सुक आहेत. मात्र दोन तृतीयांश संख्याबळ अर्थात ४३ नगरसेवकांचा आकडा पूर्ण करण्यासाठी अडचणी येत आहेत, अशी माहिती शिंदे गटातील विश्वासनीय सूत्रांनी दिली. शिंदे गटातील एका नगरसेवकाने दिलेल्या माहितीनुसार, उबाठातील नगरसेवकांमध्ये सुरू असलेली कुरघोडी, अंतर्गत धुसफूस, पक्ष नेतृत्वावर आणि विरोधी पक्षनेत्यावर असलेल्या नाराजीमुळे उबाठा पक्षातील २२ नगरसेवक शिंदे गटात येण्यास तयार आहेत. वेळप्रसंगी ४३ ⇨(पान २ वर)






जनमाध्यम


एक प्रतिष्ठित सवय

# ४८ कोटींच्या दंडवसुली प्रकरणात तहसीलदार, एसडीओ अडचणीत?

## कारवाईपेक्षा संरक्षणालाच प्राधान्य दिल्याचा संशय; महसूल विभागातच कुजबुज वाढली

**ॲड. समीर ठाकूर**

**अकोला :** गाजीपूर येथील कथित अवैध गौण खनिज उत्खनन प्रकरणातील तब्बल ४८ कोटी रुपयांच्या दंडवसुलीभोवती निर्माण झालेला संशयाचा धुरळा आता थेट महसूल प्रशासनाच्या दारात पोहोचला आहे. दंड ठोठावण्यात आल्यानंतरही अनेक महिन्यांपर्यंत वसुलीची कोणतीही ठोस कारवाई न होणे, उच्च न्यायालयाने दिलेल्या मुदतीनंतर अपील स्वीकारले जाणे, अपील दाखल करताना दंडाच्या रकमेचा एक रुपयाही न भरवून घेणे, मालमत्ता शोधण्यात झालेली कथित कुचराई आणि निवडक मालमत्तांवरच शासनाचा दावा चढविणे या सर्व घटनांमुळे आता केवळ दंडग्रस्तांवरच नव्हे तर तहसीलदार व उपविभागीय अधिकाऱ्यांच्या भूमिकेवरही गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.




विशेष म्हणजे या संपूर्ण प्रकरणात सुरुवातीपासूनच महसूल प्रशासनाची भूमिका वसुली करणाऱ्या यंत्रणेपेक्षा वेळकाढूपणा करणाऱ्या यंत्रणेसारखी जास्त दिसली, याची चर्चा आता उघडपणे सुरू झाली आहे. त्यामुळे आगामी काळात या प्रकरणाची स्वतंत्र चौकशी झाल्यास काही अधिकारी स्वतःच अडचणीत येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### मालमत्ता सापडत नव्हती; मग अचानक सापडली कशी?

संपूर्ण जिल्हा डिजिटल नोंदींवर चालत असताना संबंधितांची स्थावर मालमत्ता शोधण्यात प्रशासनाला अडचणी येत असल्याचा दावा करण्यात आला. मात्र जनमाध्यमांनी कथित मालमत्तांची माहिती प्रसिद्ध केल्यानंतर अल्पावधीतच काही मालमत्तांवर शासनाचा दावा चढविण्यात आला. यामुळे 'मालमत्ता आधी नव्हती की आधी पाहण्याची इच्छाच नव्हती?' असा उपरोधिक प्रश्न आता विचारला जात आहे.

### आदिवासी जमिनींच्या प्रकरणातही मौन का?

गाजीपूर येथील आदिवासी जमिनींवर शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय भाडेपट्टे झाल्याचे आरोप अनेक महिन्यांपासून होत आहेत. हे प्रकरण समोर आल्यानंतरही जमीन ताब्यात घेण्याची प्रक्रिया, अटीभंगाची कारवाई किंवा वरिष्ठांना ठोस अहवाल पाठविण्याबाबत कोणतीही निर्णायक हालचाल दिसून आली नाही. त्यामुळे या प्रकरणातील प्रशासकीय मौन अधिकच संशय वाढवणारे ठरत आहे.

### दंडाचे खापर दुसऱ्याच्या माथी फोडण्याची तयारी?

दरम्यान महसूल विभागात आणखी एका चर्चेने जोर धरला आहे. ४८ कोटी रुपयांच्या दंडाची जबाबदारी मूळ लाभार्थ्यांवरून हटवून प्रत्यक्ष उत्खनन करणाऱ्या एका कंत्राटदाराच्या माथी मारण्याचा प्रयत्न सुरू असल्याची चर्चा आहे. 'अरुण' नावाच्या व्यक्तीच्या माध्यमातून या प्रकरणातून बाहेर पडण्याचा मार्ग शोधला जात असल्याची कुजबुज महसूल वर्तुळात रंगू लागली आहे. जर असे काही प्रयत्न सुरू असतील तर दंडाच्या मूळ जबाबदारीचे स्वरूपच बदलण्याचा हा गंभीर प्रकार ठरू शकतो.

### आता चौकशी दंडग्रस्तांची नव्हे, अधिकाऱ्यांच्या भूमिकेची?

गेल्या काही महिन्यांत घडलेल्या घटनांचा क्रम पाहता आता नागरिकांचा रोख थेट महसूल प्रशासनाकडे वळला आहे. दंड ठोठावणे, वसुली लांबणीवर टाकणे, अपील स्वीकारणे, मालमत्ता शोधण्यात कथित अपयश, निवडक कारवाई आणि आदिवासी जमीन प्रकरणातील मौन या सर्व बाबींची स्वतंत्र चौकशी झाल्यास अनेक धक्कादायक बाबी समोर येऊ शकतात, अशी चर्चा रंगली आहे. त्यामुळे आता अकोट तालुक्यात '४८ कोटींच्या दंडाची चौकशी होणार की ४८ कोटींची वसुली रोखणाऱ्या व्यवस्थेची?' एकच प्रश्न विचारला जात आहे.

### आरसीसी उघडले की कागदी कारवाईचा देखावा?

दंडवसुलीची प्रक्रिया सुरू असल्याचे दाखविण्यासाठी आरसीसी उघडण्यात आल्याचा दावा करण्यात आला. मात्र प्रत्यक्षात वसुलीच्या दिशेने कोणती ठोस आर्थिक हालचाल झाली, किती मालमत्ता जप्त झाल्या, किती रक्कम शासन खात्यात जमा झाली याबाबतची माहिती अद्याप समोर आलेली नाही. त्यामुळे आरसीसी ही वसुलीची प्रक्रिया होती की कागदोपत्री देखावा, अशी चर्चा महसूल वर्तुळात सुरू आहे.

### क्रीम प्रॉपर्टींना 'व्हीआयपी पास'?

महसूल विभागाने ज्या मालमत्तांवर बोजा चढविला, त्या मालमत्तांव्यतिरिक्त कथितरीत्या अधिक मूल्यवान आणि मोक्याच्या मालमत्ता कारवाईबाहेर ठेवल्याची चर्चा रंगली आहे. जर हे खरे असेल तर मालमत्तांची निवड कोणत्या निकषावर झाली? आणि कोणत्या मालमत्तांना संरक्षण देण्यात आले? याची चौकशी होण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.

### स्थगिती नव्हती, तरी वसुली थांबली कशी?

कायदेशीर वर्तुळात चर्चेनुसार ४८ कोटींच्या दंडवसुलीवर कोणताही स्पष्ट स्थगिती आदेश अस्तित्वात नसताना महसूल प्रशासनाने वसुलीची प्रक्रिया प्रभावीपणे राबविली नाही. शासनाची रक्कम वसूल करण्यासाठी उपलब्ध असलेले सर्व अधिकार असूनही कारवाईची गती अत्यंत संथ ठेवण्यात आली. यामुळे 'दंड वसुली रोखणारा न्यायालयीन आदेश होता की प्रशासनातील अदृश्य इच्छाशक्तीचा अभाव?' असा प्रश्न निर्माण झाला आहे.

### मुदत संपल्यानंतरही अपील स्वीकारले; कोणाच्या दबावाखाली निर्णय?

या प्रकरणातील सर्वाधिक चर्चेचा विषय म्हणजे उपविभागीय अधिकाऱ्यांनी स्वीकारलेली अपील याचिका. उच्च न्यायालयाने दिलेल्या मुदतीनंतरही अपील स्वीकारण्यात आल्याची चर्चा असून, हा निर्णय कोणत्या कायदेशीर आधारावर घेण्यात आला याबाबत अद्याप स्पष्टता नाही. यामुळे अपील प्रक्रिया ही न्यायनिष्ठ होती की कोणाला तरी दिलासा देण्यासाठी वापरली गेली, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

## १ व १० वरिल उर्वरित

### 'होर्मुझ' पुन्हा खुला होताच

कारण विविध प्रकारच्या इंधनांवर या संघर्षाचा परिणाम वेगवेगळ्या प्रमाणात झाला आहे.

**पेट्रोल-डिझेल आणि गॅस दर वाढले** -मागील काही आठवड्यांमध्ये पश्चिम आशियातील तणावामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमती वाढल्या होत्या. त्याचा परिणाम म्हणून पेट्रोल आणि डिझेलच्या किमतींवर दबाव वाढला, घरगुती LPG सिलिंडर महागले, व्यावसायिक ख्र्क्र दरातही वाढ झाली, वाहतूक आणि उद्योग क्षेत्राचा खर्च वाढला. याचा फटका सर्वसामान्य नागरिकांना बसला. दरम्यान, आता होर्मुझ सामुद्रधुनी पुन्हा सुरू झाल्याने तेल आणि वायू पुरवठा सुरळीत होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. तज्ज्ञांच्या मते, पुरवठा स्थिर राहिल्यास आगामी काळात पेट्रोलच्या किमतींमध्ये दिलासा मिळू शकतो, डिझेल दर कमी होउ शकतात आणि LPG सिलिंडर स्वस्त होण्याची शक्यता आहे.

### आम्ही २५ कोटी भारतीयांना

सर्वात मोठा मोबाईल फोन उत्पादक देश आहे.' लोकशाहीचे सामर्थ्य, एक चहा विक्रेता पंतप्रधान बनला: आपल्या भागीदारीला १२ वर्षे पूर्ण झाल्यानंतर काही दिवसांनीच मी आज फ्रान्समध्ये आलो आहे. १२ वर्षे देशाची सेवा करणे हे माझ्या आयुष्यातील एक मोठे सौभाग्य आहे. भारताच्या लोकशाहीच्या सामर्थ्यानेच एका चहा विक्रेत्याला या पातळीवर आणले आहे.' गेल्या १२ वर्षांनी १.४ अब्ज भारतीयांची अविश्वसनीय क्षमता दाखवून दिली आहे. भारताचा जीडीपी दुप्पट झाला आहे.

### बंडखोर खासदारांना वाय

नोंदवला. तसेच त्यांच्या प्रतिमेची प्रतीकात्मक अन्त्ययात्रा काढून छत्रपती शिवाजी महाराज चौकात प्रतिमेचे दहन करण्यात आले. यावेळी उद्धव ठाकरे आगे बढो, हम तुम्हारे साथ हैं आणि गद्दारांचा निषेध असोअशा घोषणा देण्यात आल्या.बीडमध्येही ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांनी सहा खासदारांचे प्रतीकात्मक पुतळे जाळून संताप व्यक्त केला. यावेळी काही कार्यकर्त्यांनी संबंधित खासदारांविरोधात तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त करत इशाराही दिला. वाशिममध्ये यवतमाळ-वाशिम लोकसभा मतदारसंघाचे खासदार संजय देशमुख यांच्या प्रतिमेला काळे फासून आणि जोडे मारून आंदोलन करण्यात आले. ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी करत खासदारांच्या निर्णयाचा निषेध नोंदवला.

### संजय राउतांच्या वक्तव्यानंतर निर्णयाची चर्चा

विशेष म्हणजे, काही वेळापूर्वीच खासदार संजय राउत यांनी पत्रकार परिषदेत म्हटले होते की, आमच्या पक्षाचे खासदार-आमदार तोडणार असे म्हणणा-या लोकांना वाटते एकदा पक्षाचे दोन तुकडे केले आता पुन्हा करू . त्यांना मी सांगतो आता जर पक्ष फोडला तर तुम्हाला तोडू नाहीतर बाळासाहेब ठाकरेंचे कार्यकर्ते म्हणून घेणार नाही.

### ऊबाठाचे २२ नगरसेवक

नगरसेवकांचा गट स्थापन करण्यास संख्याबळ कमी पडले, तर त्यांच्याकडून वेगळा गट तयार करून प्रवेश होउ शकतो, असे प्रयत्न वरिष्ठ पातळीवर सुरू आहेत.

**विरोधकांची संख्या १०५**-मुंबई महानगरपालिकेत सत्ताधारी भाजपा, शिंदे गट आणि पाठिंबा दिलेला राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष मिळून १२२ नगरसेवक आहेत. मात्र उबाठा, मनसे आणि एमआयएम पक्ष मिळून विरोधी पक्षांचे १०५ नगरसेवक आहेत. यामुळे पालिकेतील प्रस्ताव मंजूर करण्यास सत्ताधारी पक्षाला अवघड जाते.

**अशाप्रकारे प्रक्रिया होउ शकते-** उबाठा पक्षातील ४३ नगरसेवक अर्थात दोन तृतीयांश संख्याबळ पूर्ण केल्यास ते कोकण भवन येथे वेगळा गट नोंदणीसाठी अर्ज करू शकतात आणि नेता निवडून नोंदणी करू शकतात. यामुळे त्यांच्यावर कायद्यानुसार कारवाई होणार नाही. परंतु फक्त २२ नगरसेवकांनी कोकण भवन येथे अर्ज देउन गट नोंदणी केल्यास त्यांच्यावर निलंबनाची कारवाई होउ शकते.

### अमरावती विधान परिषदेसाठी

नगरसेवकांनी मतदान केल्याचे चित्र दिसले आहे. पोलीस बंदोबस्तात शहर आणि जिल्ह्यात मतदान प्रक्रिया पार पडली. आता २२ जून रोजी लागणाऱ्या निकालाकडे सर्वांच्या नजरा लागलेल्या आहे. मतदान प्रक्रिया पार पडल्यानंतर नियोजन भवनात मतपेटी या सुरक्षित ठेवण्यात आल्या आहे. येथे २४ तास पोलिसांच्या कड्या बंदोबस्तात चार दिवसापर्यंत मतपेटी राहणार आहे. २२ जून ला सकाळी आठ वाजता मतमोजणीला सुरुवात होणार आहे.

**धारणी, अचलपूर ,चांदुर रेल्वेत शंभर टक्के मतदान-** विधान परिषद निवडणुकीसाठी जिल्ह्यातील नगरपरिषद आणि नगरपंचायत मध्ये मतदानाचा टक्का चांगला राहिला आहे. धारणी,अचलपूर, मोर्शी आणि चांदुर रेल्वे या ठिकाणी १००% मतदान झालेले आहे.

**तिवसात सर्वात कमी मतदान -** राज्याच्या माजी मंत्री यशोमती ठाकूर यांचा बालेकिल्ला असलेल्या तिवसा नगर पंचायतीमधील सुमारे १२ काँग्रेस नगरसेवकांनी मतदानाकडे पाठ फिरवली. त्यामुळे जिल्ह्यात सर्वात कमी मतदानाची नोंद तिवसा येथे झाली. ऐन मतदानाच्या काही तास आधी जाहीर झालेली काँग्रेसची तटस्थतेची भूमिका, हर्षजीत देशमुखांची निष्क्रियता आणि त्यानंतर सदस्यांनीच पक्षादेश मोडीत काढणे, यामुळे या निवडणुकीत महायुतीचे पारडे जड झाल्याचे चित्र आहे.

**विजयाचा प्रवीण पोटेंना विश्वास-** भाजपचे उमेदवार प्रवीण पोटे म्हणाले, माझा विजय १००१ टक्के निश्चित असून मो मोठ्या मताधिक्याने होईल. माझ्यासमोर कोणताही तगडा विरोधक नव्हता. माझे जुने मतदार, माझी काम करण्याची पद्धती आणि सर्वपक्षीय मतदारांशी असलेले माझे सलोख्याचे संबंध या बळावरच मला हा विश्वास आहे. काँग्रेसने घेतलेल्या तटस्थतेच्या भूमिकेविषयी विचारले असता पोटे म्हणाले, आपल्या मतदारांना तटस्थ राहण्याचा पक्षादेश जारी करणे, हा काँग्रेसचा अंतर्गत प्रश्न आहे. परंतु, माझे सर्वच पक्षांमध्ये मित्र आहेत आणि त्यांनी मलाच मतदान केले असेल, याची मला खात्री आहे. यामुळे तिसऱ्यांदा पोटे यांचा विजय निश्चित मानला जात आहे.**निकालाकडे लागल्या नजरा** महाविकास आघाडीतील घटक पक्षांमध्ये आणि विशेषतः काँग्रेसच्या अंतर्गत नेतृत्वात ताळमेळल नसल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. ऐन मतदानाच्या काही तास आधी घेतलेला तटस्थतेचा निर्णय आणि त्यानंतर सदस्यांनीच तो मोडीत काढणे, यामुळे महाविकास आघाडीची मोठी कोंडी झाली आहे. यांचा फायदा महायुतीला होण्याची शक्यता वर्तवली जात असून, आता सर्वांचे डोळे २२ जून रोजीच्या निकालाकडे लागले.

### मतदान केंद्रात मोबाईल

कक्षात प्रवेश केल्याचे निदर्शनास आले. सकाळी ९ वा. सुमारास तिसरे मतदान करत असतांना मोबाईलचा वापर केल्या गेल्याची बाब निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या लक्षात येताच त्यांनी तत्काळ कारवाई करत संबंधित घटनेची तक्रार परतवाडा पोलीस ठाण्यात दाखल केली. तक्रारीच्या आधारे परतवाडा पोलिसांनी संबंधित नगरसेवकाविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे.

पोलिसांनी निवडणूक प्रक्रियेतील नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी संबंधितांविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS), २२३, लोकप्रतिनिधित्व अधिनियमातील १२८ व १३२ तसेच संबंधित तरतुदींनुसार गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे. दरम्यान, स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या निवडणुकीत मतदान प्रक्रिया शांततेत व सुरळीत पार पाडण्यासाठी प्रशासनाकडून कडक सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली होती. मतदान केंद्रातील नियमांचे काटेकोर पालन करण्याच्या दृष्टीने निवडणूक अधिकाऱ्यांनी ही कारवाई केल्याचे सांगितले जात आहे.

### मोर्शीत शांततेत मतदान

मतदार संघात भारतीय जनता पार्टी तर्फे उमेदवार म्हणून अमरावती जिल्ह्याचे माजी पालकमंत्री प्रवीण पोटे, महाविकास आघाडी तर्फे हर्षजीत देशमुख, व वंचित आघाडीचे निलेश विश्वकर्मा हे तीन उमेदवार विधान परिषदेची निवडणूक लढवीत आहे.

मोर्शी तहसील कार्यालयात मतदान केंद्रात गुरुवार दि. १८ जून रोजी मतदानाची सर्व तयारी पूर्ण करण्यासाठी प्रशासनाने सर्व यंत्रणा सज्ज केल्यानंतर सकाळी आठ वाजता पासून मतदान प्रक्रियेला सुरुवात झाली होती. या मतदान केंद्रात मोर्शी विधानसभेतील मोर्शी नगरपालिकाचे २८ नगरसेवक व वरुड नगरपालिकाचे ३० नगरसेवक व शेंदूरजना घाट नगरपालिकेचे २३ नगर सेवकांचा मतदार म्हणून समावेश असून या सर्व नगर पालिकेतील नगरसेवक नगरसेविका, स्वीकृत नगरसेवक यांची ८१ मतदार संख्या आहेत.

निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून प्रभारी उपविभागीय अधिकारी प्रसन्नजीत चव्हाण व तहसीलदार सागर ढवळे, व मोर्शी वरूड शेंदूरजना घाट नगर पालिकेचे मुख्याधिकारी कर्मचाऱ्यांनी काम पाहिले होते.

### वाळूची अवैध वाहतूक करणारा

रोडवरील पलासखेडी फाटा कारंजा बहिरम येथे १६ चाकी ट्रक सीजी ०८ एएम ९५७१ मध्ये अवैध वाळूची वाहतूक करण्यात येत आहे. यावरून पोलिसांनी पलास खेडी फाटा कारंजा बहिरम येथे कार्यवाही करून ट्रक चालक-मालक याला ताब्यात घेतले आणि त्याच्या कडून ३९ लाखाचा ट्रक ,८ ब्रास रेती ५६ हजार असा एकूण ३० लाख ५६ हजाराचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम, दत्ता तोटेवाड, उपविभागीय अधिकारी, मनीष ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली शिरजगावचे सहायक निरीक्षक अमन शिरसाट, अमलदार मनोज पंडित योगेश राखोंडे, अनुप टिंगने यांनी केली.

### मृत व्यक्तीच्या खात्यातून १४.८२

आहे. वित्तीय कागदपत्र आणि बँक रेकॉर्डचा तपास सुरू आहे. मृत व्यक्तीच्या बँक खात्याची माहिती आरोपींना कशी लागली आणि त्यांनी पैसे कसे ट्रान्सफर केले. या संदर्भात पुढील तपास पोलीस करत आहे.

### राजापेठ परिसरातून सराईत

पथकाने तखतमल कॉलेजसमोर सापळा रचून संशयितावर नजर ठेवली. पाहणीदरम्यान कुशल बोबडे हा परिसरात आढळून आला. पोलिसांनी पंचांसमक्ष त्याला ताब्यात घेऊन अमरावती शहरात प्रवेशासाठी आवश्यक परवानगीबाबत विचारणा केली असता त्याच्याकडे कोणतीही वैध परवानगी नसल्याचे उघड झाले. यानंतर आरोपीला राजापेठ पोलीस ठाण्यात आणून महाराष्ट्र पोलीस कायद्याच्या कलम १४२ अन्वये कारवाई करण्यात आली.

ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त श्याम घुगे आणि सहायक पोलीस आयुक्त संजय खताळे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वात करण्यात आली. या मोहिमेत पोउपनि मिलिंद हिवरे, मनीश करपे, पंकज खटे, रवि लिखितकर, पवन तिवारी, अर्जुन कदम, अमोल खंडेजोड, आकाश यादव, अंकुश काळे व प्रशांत बेलोरकर यांनी सहभाग घेतला.

### तडीपार गुन्हेगारांकडून कोयता-

करण्यात आला. त्यानंतर १८ जून रोजी दुसऱ्या कारवाईत डीबी पथकाला माहिती मिळाली की, इरफान खान रहेमान खान (वय ३८, रा. रहेमतनगर) हा सौदागरपुरा येथील मोकळ्या मैदानात हातात तलवार घेऊन नागरिकांमध्ये दहशत निर्माण करीत आहे. पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत आरोपीला ताब्यात घेतले. त्याच्याकडून सुमारे १ हजार रुपये किमतीची धारदार लोखंडी तलवार जप्त करण्यात आली. दोन्ही आरोपी तडीपार आदेशाचे उल्लंघन करून शहरात वावरत असल्याचे निष्पन्न झाले. याप्रकरणी नागपुरी गेट पोलीस ठाण्यात महाराष्ट्र पोलीस कायद्याच्या कलम १४२ तसेच आर्म्स ॲक्टच्या कलम ४/२५ अन्वये स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त श्याम घुगे आणि सहायक पोलीस आयुक्त कैलाश पुंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली नागपुरी गेट पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मनोहर कोटनाके यांच्या नेतृत्वाखाली डीबी पथक प्रमुख इरफान रायलीवाले व त्यांच्या सहकाऱ्यांनी पार पाडली.

### रखडलेल्या बडनेरा उडानपूलामुळे

नाही. यामुळे बडनेरा आणि अमरावती परिसरातील नागरिकांना वाहतुकीची समस्या होत आहे. रोज येथे जाम लागत आहे. या परियोजनाला वर्ष २०२० मध्ये मंजुरी मिळाली होती.२०२१ मध्ये याचे निर्माण कार्य सुरू झाले होते.३६ कोटी रुपये यासाठी मंजूर झाले आहे. निधी वितरण व प्रशासकीय कारणामुळे उडान पूल निर्माण कार्याला विलंब होत आहे. या परियोजनेच्या निर्माण कार्याची जबाबदारी महारेल कडे आहे. परिसरातील नागरिक लवकरात लवकर पुलाचे निर्माण कार्य करण्याची मागणी करत आहे. या सर्व प्रकाराची दखल हायकोर्टाने घेतली, असून शासनाला विस्तृत अहवाल मागितला आहे. जुलै महिन्यात होणाऱ्या या प्रकरणाच्या सुनावणीकडे आता नजरा लागल्या आहेत.

### इतवारा बाजारातील खाद्यपदार्थांच्या

पसरला होता. माहितीनुसार इतवारा बाजार परिसरात वीस ते पंचवीस दुकाने आहे. जेथे कच्चा चिवडा ,नमकीन, मिठाई आणि इतर खाद्यपदार्थांची विक्री केली जाते. राज्यभरात खाद्यपदार्थांच्या गुणवत्ता आणि स्वच्छतेबाबत तपासणी केली जात आहे. यामुळे व्यापाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. इतवारा बाजारातील दुकानदारांनी गुरुवारी आपली दुकाने बंद ठेवली. हॉटेल मधून खाद्यपदार्थांची विक्री बंद करण्यात आली. शहरातील विविध क्षेत्रांमध्ये पनीर,मिष्ठाण्ण आणि पॅकिंग नसणारे खाद्यपदार्थ दुकानातून हटविण्यात आले. पावसाच्या दिवसात उघड्यावर मिळणाऱ्या खाद्यपदार्थामुळे आरोग्यावर परिणाम होण्याची शक्यता अशात राज्यभरात सुरू असलेल्या कार्यवाहीच्या पार्श्वभूमीवर शहरात खाद्यपदार्थांची दुकाने बंद दिसली. तुकाराम मुंढे यांच्या कारवाईमुळे दुकानदारांनी सतर्कता बाळगली आहे.

### ऑनलाईन जुगार अड्ड्यावर

कोठार (वय ३०, रा. महाजनपुरा, अमरावती) हा 'फन टारगेट' नावाच्या ऑनलाईन गेमच्या माध्यमातून जुगार खेळविताना आढळून आला. तसेच निखील प्रभाकरराव अर्मळ (वय ३४, रा. पिंपळखुटा अर्मळ, अमरावती) हा सदर जुगारात पैसे लावताना पोलिसांच्या हाती लागला.पोलिसांनी घटनास्थळावरून जुगारासाठी वापरण्यात येणारे साहित्य जप्त केले असून, त्याची एकूण किंमत १५ हजार ७०० रुपये असल्याचे सांगण्यात आले. याप्रकरणी राजापेठ पोलीस ठाण्यात महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्याच्या कलम ४ व ५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त श्याम घुगे तसेच सहायक पोलीस आयुक्त संजय खताळे यांच्या मार्गदर्शनाखाली राजापेठ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वात करण्यात आली.

## सिलेंडरचे नवीन कनेक्शन पुर्वरत करण्यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा करणार -आ.प्रवीण तायडे

**अचलपूर/प्रतिनिधीः-**पश्चिम आशियातील सुरु असलेल्या तणावामुळे देशासह राज्यात एलपीजी गॅसचा २-३ महिन्यापासूनचा तुटवडयाची स्थिती सामान्य होत आहे. मात्र अचलपुर तालुक्यासह सर्वत्र असलेली एच.पी, इंडेन गैस सिलेंडरची खाजगी एजन्सीकडे नवीण कनेक्शनची प्रक्रीया बंद आहे. यामुळे सामान्य माणसाला याचा मोठा फटका सहन लागत आहे. काल १८ जून रोजी नागरिक व सामाजिक कार्यकर्त्यांनी अचलपूर मतदार संघाचे आमदार प्रवीण तायडे यांच्या कडे हा गंभीर मुद्दा मांडला .याची तत्काळ दखल घेत शासन स्तरावर पाठपुरावा करून तोडगा काढणार असल्याचे आश्वासन आ.प्रवीण तायडे यांनी यावेळी निवेदनकर्त्यांना दिले . शासकीय व खाजगी क्षेत्रात काम करणारे कर्मचारी, मजूर, कामगार ,विद्यार्थी आणि उदरनिर्वाहासाठी बाहेर वास्तव्य करणाऱ्या सामान्य माणसाच्या कुंटुबाला विविध अडचणीचा सामना करावा लागत आहे. यामुळे शासनस्तरावरून अन्न पुरवठा विभागाकडून अचलपूर तालुक्यासह सर्वत्र असलेल्या एच.पी, इंडेन गॅस सिलेंडर ची खाजगी एजन्सीला बंद असलेले ऑनलाईन - ऑफलाईन नवीन कनेक्शनची प्रक्रिया सुरू करण्याची मागणी नागरिकांनी आ.प्रवीण तायडे यांच्या कडे केली आहे.यावर शासन स्तरावरून सुचना निर्गमित झाल्यास मोठा लाभ नागरिकांना होऊ शकणार आहे .आज किंवा उद्या नवीन गॅस कनेक्शनची प्रक्रिया सुरू होणार या आशेने नागरिक दररोज संबंधित गॅस सिलेंडर एजन्सी कडे चकरा मारत आहे .मात्र शासन स्तरावरून यासंदर्भात कोणतेही आदेश प्राप्त न झाल्याचे उत्तर नागरिकांना मिळत आहे .



यामुळे नागरिकांना विविध समस्यांना तोंड द्यावे लागत आहे.अचलपूर मतदार संघाचे आमदार प्रवीण तायडे यांनी याबाबत शासन स्तरावर पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिल्याने नागरिकांमध्ये एक आशेची किरण निर्माण झाली आहे.

## जाहीर नोटीस

**विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती**

आर.एम.जे.सी.क्र.२८५/२०२६ — ने.ता.१६.०७.२०२६

**अर्जदार :**
१. **शुभम रामभाऊ राऊत,** वय ७८ वर्षे, धंदा - घरकाम, रा.निंभी, ता.जि.अमरावती
२. **बेबी प्रल्हादराव राऊत,** वय ७४ वर्षे, धंदा - घरकाम, रा. करजंगाव, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
३. **उषा मदनराव ढाकुलकर,** वय ६४ वर्षे, धंदा - घरकाम, रा.हिरुळपुर्णा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
४. **मालाताई जर्नादनराव देशमुख,** वय ६६ वर्षे, धंदा - घरकाम, रा.तुळजापुर गढी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
५. **शिला रामचंद्र वाठ,** वय ५३ वर्षे, धंदा - घरकाम, रा.सावळापुर, ता. जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निल

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात.**मय्यत वासुदेवराव गंगारामजी इंगोले,** हे **रा.हिरुळपुर्णा, ता.चांदूर बाजार,जि.अमरावती** येथील कायमचे रहिवासी होते. ते दि.०५/१२/२००७ रोजी हिरुळपुर्णा, ता.चांदूर बाजार,जि.अमरावती येथे मृत्यू पावले. तसेच **मय्यत नर्मदाबाई वासुदेव इंगोले** ही हिरुळपुर्णा, ता.चांदूर बाजार,जि.अमरावती येथील कायमची रहिवासी होती.ती दिनांक १०/०२/२०१८ रोजी हिरुळपुर्णा, ता.चांदूर बाजार,जि.अमरावती येथे मृत्यू पावली.त्यामुळे मय्यत **वासुदेवराव गंगारामजी इंगोले व मय्यत नर्मदाबाई वासुदेव इंगोले** यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

अर्जदार मयतांचे कायदेशिर वारस असल्याने त्यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.२८५/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.१८.०६.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,चांदूर बाजार

## जाहीर नोटीस

सर्व संबंधित नागरिक, संस्था, बँका, वित्तीय संस्था, सहकारी संस्था, सावकार, तसेच कोणत्याही प्रकारचा हक्क, दावा, ताबा, हितसंबंध किंवा स्वारस्थ असलेल्या व्यक्तीना याव्दारे जाहीर नोटीस देण्यात येते की,

**माझे पक्षकार खालीलप्रमाणे- श्री विलास रामभाऊ दांडगे रा.सुलतानपुर, पो.वरुडकाझी, ता. खुलदाबाद, जि.औरंगाबाद व श्री गोपाल मोतीरामजी चरपे, रा.अचलपूर, ता.अचलपूर, जि.अमरावती हे श्री अनूप ज्ञानेश्वरराव उताने, रा.गाडगे नगर, अमरावती ता.जि.अमरावती यांचे मालकीची व ताब्यातील खालील वर्णनाची स्थावर मालमत्ता- शेती खरेदी करण्याचा करार करणार आहेत.**

**मालमत्तेचे वर्णन :-** मौजे सायत, ता.भातकुली, जि. अमरावती येथील शेत जमीन जिचा भुमापन क्रमांक व उपविभाग क्रमांक १५० व स.क्र. ४०/५ भो.वर्ग १, हक्काची शेत जमीन, एकूण क्षेत्रफळ ३ हेक्टर १३ आर, महसुल आकारणी रुपये १७.१० या शेताची चतुःसिमा, पूर्व- मिसाळ यांचे शेत व राजेश राठी यांचे शेत, पश्चिम- लाचुरे यांचे शेत व अकृषक जमीन, उत्तर व दक्षिण या दिशेस सरकारी रस्ता जो या शेतातून जातो.

सदर शेती मालमत्तेबाबत कोणत्याही व्यक्तीचा,संस्थेचा किंवा बॅंकेचा कोणताही हक्क, दावा, ताबा, गहाण, बोजा, तारण, विक्रीचा करार, साठेखत, बक्षीसपत्र, वसीयत, भाडेपटा, कर्ज व्यवहार, न्यायालयीन दावा, दिवाणी फौजदारी अथवा महसुल कार्यवाही, स्थगिती आदेश, जप्ती आदेश, लिस पेंडन्स, वारसाहक्क, हिस्सा, कब्जा किंवा इतर कोणताही हितसंबंध असल्यास त्यांनी त्या संदर्भातील सर्व वैध व मूळ कागदपत्रांसह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर या नोटीसच्या प्रसिध्दीपासून ८ (आठ) दिवसांच्या आंत लेखी स्वरुपात योग्य दस्त ऐवज सह हरकती नोंदवावी. तसेच वरील नमूद अथवा इतर कोणताही व्यवहार अस्तित्वात असल्यास त्याची माहितीही आवश्यक कागदपत्रांसह सादर करावी.

निर्धारित मुदतीत कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास माझे पक्षकार सदर मालमत्ता खरेदी करण्यास कोणाचीही हरकत नाही असे गृहीत धरुन पुढील व्यवहार पूर्ण केला जाईल. त्यानंतर प्राप्त होणा-या कोणत्याही हरकतीस किंवा दाव्यास माझे पक्षकार अथवा अधो हस्ताक्षरी कोणत्याही स्वरुपात जबाबदार राहणार नाहीत.

**हरकत पाठविण्याचा पत्ता**

**पक्षकारातर्फे अधिवक्ता - ॲड.निखिल पुरुषोत्तमराव देशमुख**
**१२-बी, शिवप्रस्थ वृंदावन कॉलनी,**
**स्कुल ऑफ कॉलर्सच्या मागे, निंभोरा रोड,**
**अमरावती**

# जनमाध्यम

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ शुक्रवार, १९ जून २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

एक प्रतिष्ठित सवय

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# पक्षांतराच्या राजकारणाने मतदारांचा जनादेश धुळीस ?

## अकोल्यात 'ऑपरेशन टायगर'ची चर्चा ; लोकशाहीच्या भविष्याबाबत प्रश्नचिन्ह

■ ॲड. समीर ठाकूर ■

अकोला : देशाच्या राजकारणात सुरू असलेल्या पक्षांतराच्या राजकारणाचे पडसाद आता स्थानिक स्वराज्य संस्थांपर्यंत पोहोचले असून अकोला जिल्ह्यातही त्याचे स्पष्ट प्रतिबिंब दिसू लागले आहे. एका बाजूला सत्ताधारी पक्षांकडून विरोधी पक्षातील लोकप्रतिनिधींना आपल्या गोटात खेचण्याचे प्रयत्न सुरू असताना दुसऱ्या बाजूला मतदारांनी दिलेल्या जनादेशाचे नेमके काय होते, हा मूलभूत प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

गेल्या काही महिन्यांत अकोला महानगरपालिकेतील उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे चार नगरसेवक मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत दाखल झाले. त्यानंतर बार्शीटाकळी नगरपालिकेतील अपक्ष व इतर पक्षांच्या तब्बल दहा नगरसेवकांनी शिंदे गटात प्रवेश केल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली. एवढ्यावरच ही मालिका थांबलेली नसून जिल्ह्यातील आणखी एका नगरपालिकेत जवळपास डझनभर नगरसेवक पक्षांतराच्या तयारीत असल्याची चर्चा सध्या रंगू लागली आहे. या घडामोडींमुळे जिल्ह्यातील राजकीय समीकरणे बदलत असली तरी सर्वसामान्य मतदारांच्या मनात मात्र गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत.

### 'पॉलिटिकल एथिक्स'चा विसर?

एकेकाळी विचारसरणी, तत्त्वे आणि पक्षनिष्ठा यावर उभे राहिलेले राजकारण आता सत्ताकेंद्रित होत चालल्याची खंत व्यक्त होत आहे.

कोणत्याही मार्गाने स्पष्ट बहुमत मिळवणे, विरोधी पक्ष कमकुवत करणे आणि सर्व सत्ता एका केंद्रात एकवटणे, हेच राजकारणाचे नवीन सूत्र बनल्याची चर्चा आहे. विरोधी पक्षातील नगरसेवक, आमदार किंवा खासदार यांना आपल्या पक्षात आणण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध राजकीय मोहिमा, त्यांना दिली जाणारी वेगवेगळी नावे आणि त्यामागील सत्तेचे गणित यामुळे लोकशाहीपेक्षा राजकीय स्पर्धा अधिक तीव्र होताना दिसत आहे.

### मतदारांचा वाढता भ्रमनिरास

या सर्व घडामोडींमुळे सर्वसामान्य मतदारांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. मतदानाच्या वेळी ज्या विचारसरणीला समर्थन दिले, तोच प्रतिनिधी काही महिन्यांत विरोधी भूमिकेत दिसू लागल्याने मतदारांमध्ये नाराजी वाढत आहे. अनेक ठिकाणी नागरिकांकडून 'मतदान करून नेमके साध्य काय होते?' असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. लोकप्रतिनिधींच्या भूमिकेतील सातत्याचा अभाव आणि वारंवार होणारे पक्षप्रवेश यामुळे मतदारांचा लोकशाही प्रक्रियेवरील विश्वास डळमळीत होण्याची भीती व्यक्त होत आहे.

### जनादेश व्यक्तीला की पक्षाला?

लोकशाही व्यवस्थेत मतदार हा केंद्रबिंदू मानला जातो. निवडणुकीच्या काळात उमेदवार विशिष्ट पक्षाच्या विचारसरणीचा पुरस्कार करतो, त्या पक्षाच्या चिन्हावर मत मागतो आणि त्याच भूमिकेच्या आधारावर मतदार त्याला विजयी करतात. मात्र निवडणूक जिंकल्यानंतर काही महिन्यांतच तोच लोकप्रतिनिधी दुसऱ्या पक्षात प्रवेश करतो, तेव्हा मतदारांच्या विश्वासाचे काय होते? राजकीय जाणकारांच्या मते, ही केवळ पक्षबदलाची बाब नसून मतदारांच्या जनादेशाच्या मूलभूत संकल्पनेलाच आव्हान देणारी प्रक्रिया आहे. मतदारांनी ज्या पक्षाला नाकारले, त्याच पक्षात निवडून आलेला प्रतिनिधी प्रवेश करत असेल तर तो मतदारांच्या निर्णयाचा अवमान नाही का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

### 'विकासासाठी पक्षप्रवेश' की राजकीय सोय?

पक्षांतर करणाऱ्या अनेक लोकप्रतिनिधींकडून विकासकामे, निधी आणि प्रशासनातील सुलभता ही कारणे पुढे केली जातात. सत्ताधारी पक्षात गेल्याशिवाय विकासकामांना गती मिळत नाही, असा दावा अनेकदा केला जातो. मात्र याच मुद्द्यावरून लोकशाही व्यवस्थेतील मोठा विरोधाभास समोर येतो. कारण एखाद्या नगरसेवकाचा प्रभाग असो किंवा आमदाराचा मतदारसंघ, तेथील नागरिक हे देशाचे नागरिक आहेत. त्यांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे ही सत्ताधाऱ्यांची घटनात्मक जबाबदारी आहे. विकासकामे आणि निधी यासाठी पक्षनिष्ठा हा निकष असू शकत नाही. जर विरोधी पक्षातील लोकप्रतिनिधींना केवळ पक्षभिन्नतेमुळे निधी नाकारला जात असेल किंवा विकासकामांमध्ये अडथळे निर्माण केले जात असतील, तर ही परिस्थिती लोकशाहीसाठी धोक्याची घंटा मानली जात आहे.

### निधी वाटपातील दुजाभाव पक्षांतराला खतपाणी?

राजकीय विश्लेषकांच्या मते, स्थानिक स्वराज्य संस्थांपासून विधानसभेपर्यंत अनेक ठिकाणी निधी वाटपावरून नाराजीचे सूर उमटत आहेत. सत्ताधारी पक्षाच्या प्रतिनिधींना अधिक प्राधान्य तर विरोधी पक्षाच्या प्रतिनिधींना दुय्यम वागणूक दिली जात असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत आहेत.

याच परिस्थितीमुळे अनेक लोकप्रतिनिधी विकासकामांच्या नावाखाली सत्ताधारी पक्षाचा मार्ग स्वीकारत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे पक्षांतर ही वैचारिक प्रक्रिया न राहता राजकीय अस्तित्व टिकविण्याचे साधन बनत चालल्याची टीका होत आहे.

### पक्षांतरावर कठोर कायद्याची गरज

राजकीय पक्षांतरामुळे मतदारांच्या जनादेशाचा होणारा अवमान लक्षात घेता या विषयावर अधिक कठोर आणि स्पष्ट कायदा करण्याची मागणी जोर धरत आहे. निवडून आल्यानंतर पक्ष बदलणाऱ्या लोकप्रतिनिधींना पुन्हा जनतेसमोर जाणे बंधनकारक करावे, अशीही मागणी होत आहे. त्याचबरोबर सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील लोकप्रतिनिधींना विकासकामांसाठी समान निधी उपलब्ध करून देण्याची प्रभावी यंत्रणा उभारली गेल्यास अनेक पक्षप्रवेशांना आळा बसू शकतो. अन्यथा सत्तेच्या केंद्राभोवती फिरणारे हे राजकारण पुढील काळात लोकशाहीच्या मुळावर उठण्याची भीती राजकीय क्षेत्रातून व्यक्त केली जात आहे.

### विरोधकच संपले तर लोकशाहीचे काय?

लोकशाही व्यवस्थेत सत्ताधारी पक्षाइतकाच विरोधी पक्षही महत्त्वाचा असतो. सरकारच्या निर्णयांवर प्रश्न उपस्थित करणे, जनतेच्या समस्या मांडणे आणि सत्तेवर नियंत्रण ठेवणे हे विरोधी पक्षाचे कर्तव्य असते. परंतु जर सातत्याने पक्षांतराच्या माध्यमातून विरोधी पक्षातील लोकप्रतिनिधी सत्ताधाऱ्यांकडे वळत राहिले, तर भविष्यात प्रभावी विरोधी पक्ष उरणार का, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

एकाच पक्षाचे वर्चस्व वाढत गेले तर लोकशाहीतील संतुलन ढासळण्याची भीती राजकीय अभ्यासक व्यक्त करीत आहेत.

त्यांच्या मते, विरोधी पक्ष कमकुवत होणे म्हणजे लोकशाही कमकुवत होणे. कारण लोकशाहीची खरी ताकद ही विविध मतप्रवाह आणि वैचारिक स्पर्धेत असते.

# वाघे खुर्द येथे भीषण गॅस दुर्घटना ; पाच जण गंभीर, दोन अत्यंत गंभीर, लाखोंचे नुकसान

■ प्रतिनिधी | रिसोड ■

रिसोड तालुक्यातील वाघे खुर्द येथे गुरुवारी सकाळी सुमारे ११ वाजताच्या दरम्यान घडलेल्या भीषण गॅस दुर्घटनेत पाच जण गंभीर जखमी झाले असून त्यापैकी दोन जणांची प्रकृती अत्यंत चिंताजनक असल्याची माहिती मिळाली आहे. या दुर्घटनेत घरातील सर्व साहित्य आगीत जळून खाक झाले असून सुमारे १४ लाख २२ हजार रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक पंचनामा महसूल विभागाने केला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, वाघे खुर्द येथील एका घरात वापरात असलेल्या गॅस यंत्रणेमध्ये अचानक तांत्रिक बिघाड झाल्याने गॅसचा भडका उडाला. काही क्षणांतच आगीने रौद्ररूप धारण केल्याने संपूर्ण घर धुराने व ज्वाळांनी वेढले गेले. घरातील सदस्यांनी आग विझविण्याचा प्रयत्न केला; मात्र आगीची तीव्रता वाढत गेल्याने परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेली.

या दुर्घटनेत शेख शाहरुख शेख मेहबूब, अब्दुल रहमान जुबेर, शेख रफिक शेख हजरबी, शेख शाहरुख तसेच सहा वर्षांचा एक मुलगा गंभीररीत्या भाजला आहे. याशिवाय पाच वर्षीय मुलगी व अन्य दोन व्यक्तींना किरकोळ दुखापती झाल्याचे समोर आले आहे. जखमींना तातडीने उपचारासाठी वाशिम येथील सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर वैद्यकीय उपचार सुरू आहेत.

घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन जवानांनी मोठ्या शर्थीने आग आटोक्यात आणत बचावकार्य केले. तसेच शिरपूर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक धनराज तायडे यांनी आपल्या पथकासह घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेत आवश्यक कार्यवाही केली. प्रशासन, पोलीस आणि अग्निशमन दलाच्या तातडीच्या प्रतिसादामुळे संभाव्य मोठी जीवितहानी टळल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

आगीमुळे घरातील फर्निचर, कपडे, धान्य, भांडी, इलेक्ट्रॉनिक साहित्य तसेच दैनंदिन वापराच्या सर्व वस्तू जळून खाक झाल्या आहेत. काही जखमींच्या अंगावरील कपडेही आगीत जळाल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे संबंधित कुटुंबावर मोठे आर्थिक संकट कोसळले आहे.

घटनेनंतर महसूल विभागाने पंचनामा करून नुकसानीचा प्राथमिक अहवाल तयार केला आहे. या अहवालानुसार सुमारे १४ लाख २२ हजार रुपयांचे नुकसान झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. आग नेमकी कोणत्या कारणामुळे लागली, याचा शोध घेण्याचे काम प्रशासनाकडून सुरू असून तांत्रिक तपासणी केली जात आहे.

दरम्यान, या दुर्घटनेमुळे संपूर्ण गावात हळहळ व्यक्त होत असून पीडित कुटुंबाला शासनाने तातडीने आर्थिक मदत व पुनर्वसनाचा दिलासा द्यावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. गंभीर जखमींवर विशेष उपचारांची व्यवस्था करण्याची तसेच नुकसानग्रस्त कुटुंबाला त्वरित मदत देण्याची अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# फुटीर भूमिकेच्या निषेधार्थ खा. संजय देशमुख यांच्या प्रतिमेला चपलांनी मार

## महिला शिवसैनिकांचे आक्रमक आंदोलन ; घोषणाबाजीने परिसर दणाणला

■ प्रतिनिधी | वाशिम ■



यवतमाळ-वाशीम लोकसभा मतदारसंघाचे खासदार संजय देशमुख यांच्या कथित फुटीर भूमिकेविरोधात शिवसेनेच्या महिला कार्यकर्त्यांनी गुरुवारी आक्रमक आंदोलन छेडत त्यांच्या प्रतिमेला चपलांनी मारून तीव्र निषेध व्यक्त केला. या आंदोलनामुळे जिल्ह्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आले आहे.

शहरातील आंदोलनस्थळी मोठ्या संख्येने महिला शिवसैनिक व पदाधिकारी उपस्थित होते. खासदार देशमुख यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करत कार्यकर्त्यांनी त्यांच्या प्रतिमेचे प्रतीकात्मक दहन व निषेध नोंदविला. 'जनतेचा विश्वासघात करणाऱ्यांना जनता माफ करणार नाही', 'फुटीर आमदार-खासदारांचा निषेध असो' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख बालाजी पाटील वानखेडे, जिल्हा संघटक गजाननराव देशमुख, जिल्हा समन्वयक डॉ. सिद्धार्थ देवळे, लोकसभा संघटक कॅप्टन प्रशांत सुर्वे, महिला जिल्हा संघटिका मंगलाताई सरनाईक, उपजिल्हा संघटिका सुनीताताई गव्हाणकर, महिला तालुकाप्रमुख ज्योतीताई खोडे, महिला शहरप्रमुख रंजनाताई पारसकर यांच्यासह अनेक पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते. आंदोलनकर्त्यांनी आरोप केला की, जनतेच्या मतांच्या बळावर निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींनी पक्षनिष्ठा आणि मतदारांचा विश्वास कायम राखणे अपेक्षित असते. मात्र, कथित फुटीर भूमिका घेऊन जनभावनांचा अवमान करण्यात आल्याने शिवसैनिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. त्याच पार्श्वभूमीवर हे आंदोलन करण्यात आल्याचे महिला पदाधिकाऱ्यांनी सांगितले. आंदोलनादरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. महिला कार्यकर्त्यांच्या आक्रमक भूमिकेमुळे आणि निषेधाच्या तीव्रतेमुळे या आंदोलनाची जिल्हाभर चर्चा रंगली असून, आगामी काळात या विषयावर राजकीय घडामोडींना आणखी वेग येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# नालंदा नगरातील धोकादायक वीज खांबामुळे दुर्घटनेचा धोका

## तात्काळ कारवाईची मागणी

■ प्रतिनिधी | वाशिम ■



नालंदा नगरातील लेडी हार्डिंग परिसरात उभा असलेला एक वीज खांब सध्या अत्यंत धोकादायक स्थितीत असून तो कोणत्याही क्षणी कोसळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे परिसरातील नागरिक, रुग्ण, व्यावसायिक तसेच ये-जा करणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. विशेषतः सध्या सुरू असलेल्या पावसामुळे या धोक्यात अधिक भर पडली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.सदर परिसरात रुग्णालये, व्यावसायिक आस्थापने तसेच नागरिकांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. अशा परिस्थितीत वीज खांब कोसळल्यास मोठी जीवितहानी तसेच वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या गंभीर समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी वङ्कादेही महिला विकास संघाच्या संस्थापक अध्यक्षा आरती ठोके यांनी नगरपरिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना निवेदन सादर करून उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

# मोटारसायकल चोर जाळ्यात

■ प्रतिनिधी | वाशिम ■



वाशिम जिल्ह्यात मोटारसायकल चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेकडून सुरू असलेल्या विशेष मोहिमेला आणखी एक यश मिळाले असून मोटारसायकल चोरी करणाऱ्या एका आरोपीला अटक करण्यात आली आहे. आरोपीकडून ५० हजार रुपये किमतीची चोरीची बजाज पल्सर मोटारसायकल जप्त करण्यात आली आहे.

स्थानिक गुन्हे शाखेला १६ जून रोजी गोपनीय माहिती मिळाली की, ग्राम शेलू खडसे (ता. रिसोड) येथील एक युवक मोटारसायकल चोरी करण्याच्या उद्देशाने वाशिम शहरात आला आहे. या माहितीच्या आधारे पोलीस निरीक्षक प्रदीप परदेशी यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक योगेश धोत्रे यांच्या नेतृत्वात पथक तयार करून आरोपीचा शोध घेण्यात आला. मिळालेल्या माहितीनुसार आरोपी वाशिम शहरातील अकोला नाका परिसरात संशयास्पदरीत्या थांबलेला होता. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तत्काळ घटनास्थळी धाव घेत आरोपी पळून जाण्याच्या तयारीत असतानाच शिताफीने त्याला ताब्यात घेतले.

चौकशीत आरोपीने आपले नाव सतीश गौतम तुरेराव (वय २२, रा. शेलू खडसे, ता. रिसोड, जि. वाशिम) असे सांगितले. विश्वासात घेऊन केलेल्या चौकशीत त्याने फेब्रुवारी महिन्यात ग्राम वांगी येथून बजाज पल्सर १५० मोटारसायकल चोरी केल्याची कबुली दिली. त्याच्या ताब्यातून सुमारे ५० हजार रुपये किमतीची बजाज पल्सर १५० मोटारसायकल हस्तगत करण्यात आली. या संदर्भात पोलीस स्टेशन वाशिम ग्रामीण येथे ११ फेब्रुवारी २०२६ रोजी गुन्हा क्रमांक १४३/२०२६, कलम ३०३(२) भारतीय न्याय संहिता अंतर्गत मोटारसायकल चोरीचा गुन्हा दाखल आहे. पुढील तपासासाठी आरोपीला ग्रामीण पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

आरोपीकडून जिल्ह्यातील इतर मोटारसायकल चोरीच्या घटनांचाही उलगडा होण्याची शक्यता असून त्यादृष्टीने तपास सुरू आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेश खाटमोडे-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली, अपर पोलीस अधीक्षक लता फड, उपविभागीय पोलीस अधिकारी नवदिप अग्रवाल, पोलीस निरीक्षक प्रदीप परदेशी, सहायक पोलीस निरीक्षक योगेश धोत्रे तसेच स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली.


### Change In Name

My old name is
**AALIYA KHATUN KAMIL RASHID**
which now I am changing as new name
**ALIYA KHATUN KAMIL RASHID**
hence for my all correspondence will be done as per my new name please consider the same
Old passport No: P0780136
Residential address: KABADI PURA WARD NO. 18 BALAPUR DIST AKOLA AHARASHTRA 444302 Mobile no.8446027359

### Change In Name

My old name is
**KAMIL RASID ABDUL YASIN CHAUDAHRY**
Which now I am changing as new name
**KAMIL RASHEED ABDUR RASHEED**
hence for my all correspondence will be done as per my new name please consider the same
Old passport No. P0780136
Residential address: KABADI PURA WARD NO. 18 BALAPUR DIST AKOLA AHARASHTRA 444302 Mobile no. 8446027359


# दोन महिन्यांपासून लाईनमन गायब ; खेट्रीकर अंधारात

## वारंवार वीज खंडितमुळे नागरिक त्रस्त, शेतकऱ्यांचे मोठे नुकसान

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर तालुक्यातील सस्ती वीज उपकेंद्रांतर्गत येणाऱ्या खेट्री गावातील प्रभारी लाईनमन गेल्या दोन महिन्यांपासून गावात फिरकत नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला असून, त्यामुळे विद्युत यंत्रणेची देखभाल पूर्णपणे ठप्प झाली आहे. परिणामी गावासह शेतशिवारातील वीज पुरवठा वारंवार खंडित होत असून नागरिक आणि शेतकरी मोठ्या संकटात सापडले आहेत.

खेट्री परिसरात गेल्या काही दिवसांपासून अचानक वीज पुरवठा खंडित होणे आणि तासन्तास वीज न येणे ही बाब नित्याची झाली आहे. यामुळे नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत होत असून शेतकऱ्यांना पिकांना वेळेवर पाणी देणे कठीण झाले आहे. सध्या खरीप हंगामाची तयारी सुरू असताना वारंवार होणाऱ्या वीज खंडितमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान वाढत असल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली आहे.




गावकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, संबंधित प्रभारी लाईनमन गेल्या दोन महिन्यांपासून गावात आलेले नाहीत. त्यामुळे विद्युत वाहिन्यांची दुरुस्ती, देखभाल तसेच तांत्रिक बिघाड दूर करण्याची कामे रखडली आहेत. याबाबत सस्ती महावितरण कार्यालयाकडे अनेकदा तक्रारी करण्यात आल्या. मात्र अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी आहे.

दरम्यान, सस्ती वीज उपकेंद्राच्या कनिष्ठ अभियंत्यांकडूनही या समस्येकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर वारंवार खंडित होणाऱ्या वीज पुरवठ्यामुळे नागरिकांचे हाल होत असून प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणी जोर धरत आहे.

यासंदर्भात प्रभारी लाईनमन संजय खडसे यांच्याशी वारंवार संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र त्यांचा मोबाईल बंद असल्याने त्यांची भूमिका समजू शकली नाही.

खेट्रीचे सरपंच जहूर खान यांनी संतप्त प्रतिक्रिया देताना सांगितले की, 'गेल्या दोन महिन्यांपासून लाईनमन गायब आहे. त्यामुळे गावासह शेतशिवारातील वीज पुरवठा वारंवार खंडित होत आहे. सस्ती वीज उपकेंद्राच्या अधिकाऱ्यांकडे अनेकदा तक्रारी करूनही दखल घेतली जात नाही. उष्णतेच्या लाटेत ग्रामस्थ व शेतकरी प्रचंड त्रस्त झाले आहेत. संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष घालावे, अन्यथा सस्ती वीज उपकेंद्राला कुलूप ठोकून तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.'

ग्रामस्थांनी संबंधित कर्मचाऱ्याची चौकशी करून जबाबदारी निश्चित करावी तसेच खेट्री परिसरासाठी कायमस्वरूपी आणि जबाबदार लाईनमनची नियुक्ती करावी, अशी मागणी केली आहे. प्रशासन याची कितपत दखल घेते, याकडे आता संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.

# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २०२ ■ शुक्रवार, १९ जून २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


## तुरीच्या पोत्यांवर डल्ला

# आष्टी बाजार समितीत वजन काट्याचा महाघोटाळा उघड

## दलाल-व्यापाऱ्यांच्या संगनमतातून शेतकऱ्यांची लूट

**प्रति पोते दोन किलो, क्विंटलमागे चार किलो धान्य गायब; राबराब राबणाऱ्या बळीराजाच्या घामावर डाका पडल्याने संताप**







**आष्टी शहीद जनमाध्यम :** शेतकऱ्यांच्या कष्टाच्या घामाला योग्य मोबदला मिळावा म्हणून स्थापन झालेल्या कृषी उत्पन्न बाजार समितीतच शेतकऱ्यांची कथित लूट होत असल्याचा धक्कादायक प्रकार आष्टी येथे उघडकीस आला आहे. बोगस वजन काट्याच्या माध्यमातून धान्याची अतिरिक्त कपात करून दलाल आणि व्यापाऱ्यांच्या संगनमतातून शेतकऱ्यांना आर्थिक फटका दिला जात असल्याचा गंभीर आरोप पुढे आला असून या प्रकारामुळे बळीराजामध्ये संतापाची लाट उसळली आहे.

परसोडा येथील शेतकरी किशोर दहेकार यांच्या सतर्कतेमुळे हा प्रकार समोर आला. शेतकरी श्याम देशमुख यांनी विक्रीसाठी आणलेली २३ क्विंटल तूर निमकरडे नामक दलालाकडे दिली होती. मोजणी सुरू असताना वजन काट्याबाबत संशय आल्याने दुसऱ्या काट्यावर तपासणी करण्यात आली. त्यावेळी प्रत्येक पोत्यामागे तब्बल दोन किलो वजनाचा फरक आढळून आला. त्यामुळे प्रति क्विंटल सुमारे चार किलो धान्याची अतिरिक्त कपात होत असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.

या प्रकारामुळे शेतकरी वर्गात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. वर्षभर उन्हातान्हात, पाऊस-वारा सहन करत शेतकरी राबराब राबतो, लाखो रुपये खर्च करून पीक उभे करतो; पण विक्रीची वेळ आली की भाव कमी, खर्च जास्त आणि त्यातही वजन काट्यात घोळ करून धान्याची कपात होत असेल तर हा शेतकऱ्यांवरील अन्याय नसून सरळसरळ आर्थिक लूट असल्याची भावना व्यक्त होत आहे. शेतकरी पिकवतो, इतर कमावतात अशी परिस्थिती निर्माण झाली असून दलाल, व्यापारी आणि काही भ्रष्ट घटकांच्या संगनमतामुळे शेतकऱ्यांच्या घामाची किंमत मातीमोल होत असल्याची चर्चा बाजार समिती परिसरात रंगली आहे.

आधीच उत्पादन खर्च वाढला, निसर्गाचा मार सहन करावा लागला आणि बाजारात योग्य भाव मिळत नाही. त्यात वजन काट्यातील कथित गैरव्यवहारामुळे शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळले जात असल्याची भावना व्यक्त होत आहे.

तक्रार मिळताच कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव प्रशांत इंगोले यांनी घटनास्थळी धाव घेत संबंधित वजन काट्याची तपासणी केली. तपासणीत वजनात फरक आढळून आल्याने काटा तात्काळ जप्त करण्यात आला. पंचनामा करून संबंधित शेतकऱ्यांचे जबाब नोंदविण्यात आले असून पुढील कायदेशीर कारवाई सुरू करण्यात आली आहे.

दरम्यान, ही बाब उघडकीस आल्यानंतर शेतकरी संघटनांनीही आक्रमक भूमिका घेतली आहे. बाजार समितीतील सर्व वजन काट्यांची तातडीने तपासणी करावी, दोषींना काळ्या यादीत टाकावे आणि शेतकऱ्यांची झालेली आर्थिक हानी वसूल करून द्यावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

## दारूमाफियांना पोलिसांचा जबर दणका

### एका दिवसात तीन धडक कारवाया; ९ लाखांहून अधिकचा मुद्देमाल जप्त व नष्ट





**वर्धा जनमाध्यम :** जिल्ह्यात अवैध दारू व्यवसायाविरोधात वर्धा पोलिसांनी सुरू केलेल्या विशेष मोहिमेला मोठे यश मिळाले असून हिंगणघाट, आर्वी उपविभाग आणि सेलू पोलिसांनी एका दिवसात केलेल्या तीन धडक कारवायांमध्ये ९ लाख रुपयांहून अधिक किमतीचा मुद्देमाल जप्त व नष्ट केला आहे. या कारवायांमुळे अवैध दारू व्यवसाय करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

हिंगणघाट पोलिसांच्या गुन्हे प्रगटीकरण पथकाने रात्रगस्तीदरम्यान लक्ष्मण नगरी परिसरात संशयास्पदरीत्या उभ्या असलेल्या दोन मोपेड वाहनांची तपासणी केली. पोलिसांची चाहूल लागताच दोन संशयित अंधाराचा फायदा घेत पसार झाले.

घटनास्थळी १९ खर्ड्यांमध्ये भरलेल्या भिंगरी कंपनीच्या देशी दारूच्या १,९०० बाटल्या आढळून आल्या. पोलिसांनी दारूसह दोन मोपेड वाहने जप्त केली. या कारवाईत ३ लाख ९० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून फरार आरोपींचा शोध सुरू आहे. आर्वी उपविभागाच्या दारूबंदी पथकाने आष्टी आणि काकडदरा शिवारात स्वतंत्र कारवाया केल्या. आष्टी परिसरातील बेकायदेशीर दारू भट्टीवर छापा टाकून ५२५ लिटर मोहा सडवा व अन्य साहित्य जप्त करण्यात आले. या कारवाईत १ लाख १७ हजार ८५० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. काकडदरा शिवारात ४०० लिटर मोहा सडवा आणि दारू निर्मितीसाठी लागणारे साहित्य जप्त करून ९२ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला.

सेलू पोलिसांनी 'वॉश आऊट' मोहिमेदरम्यान बोरी, हिंगणी आणि शिवणगाव परिसरात कारवाया केल्या. शिवणगाव येथे ६७ हजार ३०० रुपयांचे गावठी दारू निर्मितीचे साहित्य नष्ट करण्यात आले.

तर बोरी शिवारातील बोर नदीकाठी सुरू असलेल्या अवैध दारू भट्टीवर छापा टाकून २ लाख ४० हजार रुपयांचे मोहा रसायन व साहित्य जागीच नष्ट करण्यात आले. या दोन्ही कारवायांमध्ये एकूण ३ लाख ७ हजार ३०० रुपयांचे साहित्य नष्ट करण्यात आले.

## शेतकऱ्यांच्या घामावर डल्ला मारणाऱ्यांना बेड्या

### रासायनिक खत चोरीचा अवघ्या काही दिवसांत छडा; तिघे जेरबंद, ६.९६ लाखांचा मुद्देमाल जप्त

**समुद्रपूर जनमाध्यम :** शेतकऱ्यांच्या कष्टाने पिकणाऱ्या शेतीला आधार देणाऱ्या रासायनिक खतावरच चोरट्यांनी डल्ला मारल्याने दहेगाव परिसरात खळबळ उडाली होती. मात्र समुद्रपूर पोलिसांनी तत्परता, तांत्रिक तपास आणि गोपनीय माहितीच्या आधारे या चोरीचा अवघ्या काही दिवसांत पर्दाफाश करत तीन आरोपींना अटक केली आहे. आरोपींकडून चोरीस गेलेले ७८ पोते रासायनिक खत तसेच गुन्ह्यात वापरण्यात आलेला ट्रॅक्टर आणि ट्रॉली असा तब्बल ६ लाख ९६ हजार ४६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दहेगाव शिवारातील शेतकरी गजानन रामकृष्ण ढोकपांडे (वय ४४, रा. शेडगाव) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, १६ जून रोजी सायंकाळी ७ वाजेपासून १७ जून रोजी सकाळी ८ वाजेपर्यंतच्या कालावधीत त्यांच्या शेतातून ६० बॅग रासायनिक खत चोरीस गेले होते. याशिवाय शेजारील दोन शेतकऱ्यांच्या शेतातूनही १८ बॅग खत लंपास करण्यात आले. अशाप्रकारे एकूण ७८ पोत्यांचा सुमारे ९६ हजार ४६० रुपयांचा खतसाठा अज्ञात चोरट्यांनी पळविल्याने शेतकरी वर्गात संतापाची लाट उसळली होती.

या प्रकरणी समुद्रपूर पोलिस ठाण्यात कलम ३०३ (२) भारतीय न्याय संहिता (बीएनएस) २०२३ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरविली. तांत्रिक विश्लेषण, स्थानिक माहिती आणि गोपनीय सूत्रांच्या मदतीने पोलिसांनी संशयितांचा माग काढला.

तपासादरम्यान स्वप्निल अंकुश महाजन (वय २७, रा.



समुद्रपूर), अनिल मारुती मांडवकर (वय ३६, रा. दहेगाव) आणि पुंडलिक विठ्ठल उरकांदे (वय ४०, रा. दहेगाव) यांना ताब्यात घेण्यात आले. कसून चौकशीत तिघांनीही चोरीची कबुली दिली. त्यानंतर त्यांच्या ताब्यातून चोरीस गेलेले सर्व ७८ पोते रासायनिक खत तसेच चोरीसाठी वापरण्यात आलेला ट्रॅक्टर आणि ट्रॉली जप्त करण्यात आली. एकूण ६ लाख ९६ हजार ४६० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला. शेतकऱ्यांच्या मेहनतीवर डल्ला मारणाऱ्या चोरट्यांना पोलिसांनी वेळीच जेरबंद केल्याने परिसरातील शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे. शेतीसाठी अत्यावश्यक असलेल्या खताची चोरी उघडकीस आणण्यात समुद्रपूर पोलिसांना मोठे यश मिळाले असून या कारवाईचे सर्वत्र कौतुक होत आहे.

ही धडक कारवाई पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे आणि उपविभागीय पोलिस अधिकारी सुशीलकुमार नायक यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार दीपक वानखेडे, वीरेंद्र मस्के, प्रकाश मैद, कपिल मेश्राम, संजय वानखेडे आणि रामू पंधरे यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

खरीप हंगाम तोंडावर असताना खताचा साठा चोरीला गेल्याने शेतकऱ्यांची मोठी अडचण निर्माण झाली होती.

आधीच वाढत्या उत्पादन खर्चामुळे त्रस्त असलेल्या शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम चोरट्यांनी केल्याची भावना परिसरात व्यक्त होत होती. मात्र पोलिसांच्या जलद कारवाईमुळे चोरीस गेलेला माल परत मिळाल्याने शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

## खाकीचा मानवतेला लाल सलाम

### रक्ताच्या प्रत्येक थेंबातून जपला जीवनाचा धागा;

### वर्धा पोलीस दलाच्या रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद



**वर्धा जनमाध्यम :** कायदा व सुव्यवस्था राखणारे हात जेव्हा समाजहितासाठी रक्तदानाचा संकल्प करतात, तेव्हा खाकी वर्दीतील संवेदनशील चेहराही समाजासमोर येतो. रक्तदान हेच श्रेष्ठदान या संदेशाला कृतीत उतरवत वर्धा जिल्हा पोलीस दलाने गुरुवारी पोलीस मुख्यालयातील आशिर्वाद मंगल कार्यालयात रक्तदान शिबिराचे आयोजन केले. जिल्ह्यातील विविध रुग्णालयांमध्ये जाणवत असलेला रक्ताचा तुटवडा दूर करण्यासाठी राबविण्यात आलेल्या या उपक्रमाला पोलीस अधिकारी, कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

सकाळी १०.३० वाजता सुरू झालेल्या शिबिरात २ पोलीस अधिकारी, १० पोलीस अंमलदार आणि ३ कुटुंबीय अशा एकूण १५ जणांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविले. एका रक्तदात्याच्या रक्तामुळे अनेक रुग्णांना जीवनदान मिळू शकते, या भावनेतून सहभागी झालेल्या रक्तदात्यांनी समाजाप्रती असलेली आपली जबाबदारी अधोरेखित केली.

रस्त्यावर नागरिकांच्या सुरक्षेसाठी सदैव तत्पर असलेले पोलीस कर्मचारी समाजाच्या आरोग्याच्या प्रश्नातही तितक्याच संवेदनशीलतेने पुढे सरसावल्याचे या उपक्रमातून दिसून आले. रक्तदानामुळे गरजू रुग्णांना वेळेवर मदत मिळण्यास हातभार लागणार असल्याने या उपक्रमाचे सर्व स्तरांतून स्वागत करण्यात आले.हे शिबिर पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल आणि अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. एमजीआयएमएस सेवाग्राम रुग्णालयाच्या तज्ज्ञ पथकाने रक्तसंकलनाची प्रक्रिया पार पाडली. डॉ. देशमुख आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी तांत्रिक सहकार्य केले, तर सहायक पोलीस निरीक्षक आशिष चिलांगे यांनी नियोजन आणि समन्वयाची जबाबदारी यशस्वीपणे सांभाळली. वर्धा पोलीस दलाचा हा उपक्रम केवळ रक्तदान शिबिर न ठरता मानवतेच्या सेवेसाठी खाकीची जिवंत प्रतिज्ञा ठरला आहे.

## नळातून दुर्गंधीयुक्त पाणी; अळ्या आढळल्याने नागरिकांमध्ये खळबळ

**सेलू जनमाध्यम :** शहरातील प्रभाग क्रमांक १६ मध्ये गुरुवारी काही घरांच्या नळातून दुर्गंधीयुक्त पाणी आल्याने नागरिकांमध्ये खळबळ उडाली. काही ठिकाणी पाण्यात अळ्याही आढळल्याचा दावा नागरिकांनी केला असून त्यामुळे आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. सकाळी सुमारे ९ वाजताच्या सुमारास आठवडी बाजार परिसरातील देवराव कोल्हे, शेख जलील, हारून कुरेशी, अशोक पवार यांच्यासह अनेक नागरिकांच्या नळांना दुर्गंधीयुक्त पाणी आले. या प्रकारामुळे नागरिकांनी नगर पंचायत प्रशासनाकडे तक्रार केली. माहिती मिळताच पाणीपुरवठा विभागाच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. शहरात सध्या नवीन नळ योजनेची कामे सुरू असून अनेक ठिकाणी पाइपलाइनचे काम प्रलंबित आहे. पाइपलाइनमध्ये गळती झाल्यास दूषित पाणी मिसळून पुरवठा होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. याबाबत पाणीपुरवठा सभापती शैलेंद्र दप्तरी यांनी सांगितले की, कर्मचाऱ्यांमार्फत तपासणी करून दूषित पाणीपुरवठ्याचे कारण शोधले जाईल व तातडीने दुरुस्ती करून नागरिकांना शुद्ध पाणी उपलब्ध करून दिले जाईल. दरम्यान, नागरिकांनी स्वच्छ पाणीपुरवठ्याची मागणी केली आहे.



## ६० फूट खोल विहिरीत अडकलेल्या मादी अस्वलाला जीवदान

### वन व पोलिस विभागाची संयुक्त मोहीम यशस्वी

**कारंजा (घा.) जनमाध्यम :** मौजा चिंचोली परिसरातील एका ६० फूट खोल कोरड्या विहिरीत पडून मृत्यूशी झुंज देत असलेल्या सुमारे दोन वर्षे वयोगटातील मादी अस्वलाला वन विभाग व पोलिस विभागाच्या संयुक्त प्रयत्नांतून सुरक्षित बाहेर काढण्यात आले. तब्बल काही तासांच्या शर्थीच्या बचाव कार्यानंतर अस्वलीला जीवदान मिळाले असून आरोग्य तपासणीनंतर तिला तिच्या नैसर्गिक अधिवासात सोडण्यात आले.

वन विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार, १७ जून रोजी दुपारी सुमारे २ वाजताच्या सुमारास मौजा चिंचोली येथील गणेश रामकृष्ण तांबूसकर यांच्या शेतातील कोरड्या विहिरीत अस्वल पडल्याची माहिती वनपरिक्षेत्र अधिकारी विनोद के. कोहळे यांना प्राप्त झाली. माहिती मिळताच वन विभागाचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले.



सदर विहीर पूर्णपणे कोरडी व जीर्ण अवस्थेत असल्याने बचावकार्य मोठे आव्हानात्मक ठरत होते. अस्वलीला कोणतीही इजा होऊ नये यासाठी वन विभागाने नियोजनबद्ध रणनीती आखली. विशेष पिंजरा मागवून तो काळजीपूर्वक विहिरीत उतरविण्यात आला. काही वेळाच्या प्रयत्नांनंतर अस्वली पिंजऱ्यात शिरताच तिला सुरक्षितपणे वर काढण्यात आले.

या थरारक बचाव कारवाई दरम्यान वन कर्मचाऱ्यांसह पोलिस विभागानेही महत्त्वाची भूमिका बजावली.

विहिरीबाहेर काढल्यानंतर पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी मादी अस्वलीची सखोल आरोग्य तपासणी केली. तपासणीत ती सुरक्षित असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर वन विभागाने तिला जंगलातील नैसर्गिक अधिवासात मुक्त केले. ही संपूर्ण मोहीम उपवनसंरक्षक हरवीर सिंह व सहाय्यक वनसंरक्षक ज्ञानेश्वर वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली. वन विभागाचे एस. बी. केकान, ए. के. गरे, दीपक कंडीकर, सी. एस. उईके, एस. बी. नागोसे, व्ही. एस. अंबोलकर, एस. व्ही. बुट्टे, वाय. पी. अरसड, सूरज कौरती, पुरुषोत्तम कळसाईत, भावेश नासरे, गणेश काळे, आयुष सातपूरे, गौरव कौरती तसेच पोलिस कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेत ही मोहीम यशस्वी केली.

वन्यजीव संवर्धनाच्या दृष्टीने ही कारवाई महत्त्वपूर्ण मानली जात असून, वन विभागाच्या तत्परतेमुळे एका दुर्मिळ वन्यजीवाचे प्राण वाचल्याची भावना परिसरात व्यक्त होत आहे.

## ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी संसदीय संकुल विकास परियोजनेचा विस्तार वाढवणार-मुख्यमंत्री

**मुंबई जनमाध्यम :** देशात सात राज्यांमध्ये ज्ञान भागीदार म्हणून योजक संस्थेच्या सहयोगाने संसदीय संकुल विकास परियोजना राबवण्यात येते. जनजातीय आणि दुर्गम भागांतील सर्वांगीण विकासामध्ये संसदीय संकुल उपक्रमाला महाराष्ट्रात चांगला प्रतिसाद मिळत आहे. या परियोजनेचा विस्तार विधानसभा क्षेत्रापर्यत वाढविण्यात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

वर्षा निवासस्थान येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली संसदीय संकुल विकास परियोजनेची महाराष्ट्रातील स्थिती संदर्भात आढावा बैठक संपन्न झाली. या बैठकीस माजी केंद्रीय राज्यमंत्री डॉ. भारती पवार, खासदार डॉ. हेमंत सावरा, माजी खासदार हिना गावीत, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव श्रीकर परदेशी,आदिवासी



विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे, ग्रामविकास विभाग सचिव डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार, सेवावर्धिनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी गिरीश देगावकर डॉ.गजानन डांगे, संबंधित अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, ग्रामीण भागात शाश्वत उपजीविकेच्या संधी निर्माण करणे, स्थानिक कामाच्या अभावाने निर्माण होणारे स्थलांतर थांबवणे आणि शासनाच्या योजनांची समन्वय करून प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी या परियोजनेचा विस्तार विधानसभा क्षेत्रामध्ये वाढवणे आवश्यक आहे. प्रधानमंत्री सूर्यघर योजनेसह शेती, सिंचन, रोजगार निर्मिती कौशल्य विकास आणि जीवनमान उंचावणाऱ्या विविध योजनांचा लाभ या भागांतील प्रत्येक कुटुंबापर्यंत पोहोचविण्यासाठी या उपक्रमाच्या माध्यमातून विशेष प्रयत्न करावे असेही त्यांनी यावेळी सांगितले. प्रत्येक विधानसभा क्षेत्रातील १० ते २० गावांचा समावेश करून त्याचा समूह तयार करावा. महिलांचे सक्षमीकरण, दीर्घकालीन शाश्वत विकासासाठी वृक्षलागवड, जलसंधारण आणि नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन, युवकांसाठी बाजारपेठ व कौशल्य विकासाच्या संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. या उपक्रमासाठी विविध विभागांच्या समन्वयासाठी नोडल अधिकारी नेमण्यात येईल असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

## शासनाच्या योजना घराघरांत पोहोचवा; आत्महत्याग्रस्त कुटुंबांना आधार द्या

**वर्धा जनमाध्यम :** कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष अॅड. निलेश हेलोंडे-पाटील यांनी सेलू तालुक्यातील जंगलापूर येथे आत्महत्याग्रस्त शेतकरी गणेश तुकाराम माहुरे यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. यावेळी त्यांनी संबंधित कुटुंबाला शासनाच्या विविध योजनांचा लाभ तातडीने मिळवून देण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या.

भेटीनंतर सेलू तहसील कार्यालयात विविध विभागांच्या अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीत शासनाच्या कल्याणकारी योजना प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच जिल्ह्यातील प्रत्येक गावात तामसवाडा पॅटर्न राबवून शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांना शासकीय योजनांशी जोडण्यावर भर देण्यात आला.



### मुख्यमंत्र्यांच्या आश्वासनाची पूर्तता

# सरळ खरेदीधारक शेतकऱ्यांना सानुग्रह अनुदानाचा मार्ग मोकळा

**आसेगाव पूर्णा/वार्ताहर**

मृद व जलसंधारण विभागामार्फत सरळ खरेदी पद्धतीने जमीन संपादित केलेल्या प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना सानुग्रह अनुदान मिळण्याचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी मंत्रालयात आयोजित बैठकीत संबंधित अधिकाऱ्यांना यासंदर्भातील शासन निर्णय (जीआर) तातडीने निर्गमित करण्याचे निर्देश दिले.

सन २००६ ते २०१३ या कालावधीत विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाने सरळ खरेदीधारक प्रकल्पग्रस्तांना सानुग्रह अनुदान दिले होते. मात्र मृद व जलसंधारण विभागामार्फत जमीन संपादित झालेल्या शेतकऱ्यांचा त्यात समावेश झाला नव्हता. त्यामुळे संबंधित



शेतकऱ्यांमध्ये नाराजी होती.या प्रश्नावर बळीराजा प्रकल्पग्रस्त संघर्ष संघटनेने सातत्याने पाठपुरावा केला होता. अमरावतीतील एका कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आठ दिवसांत जीआर काढण्याचे आश्वासन दिले होते. त्यानंतरही निर्णय रखडल्याने संघटनेने तसेच आमदार प्रताप अडसड यांनी पाठपुरावा सुरू ठेवला.

अखेर मंत्री संजय राठोड यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत सकारात्मक निर्णय घेण्यात आला. यामुळे विदर्भातील हजारो प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असून संघटनेच्या प्रयत्नांना यश मिळाल्याची भावना शेतकऱ्यांनी व्यक्त केली. संघटनेच्या वतीने मंत्री संजय राठोड यांचे आभार मानण्यात आले.बैठकीस आमदार प्रताप अडसड, शाम खोडे, सईताई डहाके, हरीश पिंपळे यांच्यासह बळीराजा प्रकल्पग्रस्त संघर्ष संघटनेचे पदाधिकारी आणि संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.


### खरीप हंगाम पूर्वतयारी

## गावागावांत हुमणी अळी नियंत्रणासाठी प्रकाश सापळ्यांचे प्रात्यक्षिक

**टाकरखेडा संभू/वार्ताहर**

खरीप हंगामाच्या पूर्वतयारीचा भाग म्हणून तालुका कृषी अधिकारी कार्यालयामार्फत शेतकऱ्यांमध्ये जनजागृती व प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून हुमणी अळी नियंत्रण मोहिमेला गती देण्यात आली आहे.पूर्णानगर येथील शेतकरी उमेश भाऊ महिंगे यांच्या शेतात तालुका कृषी अधिकारी उत्कर्षा भोसले यांच्या उपस्थितीत हुमणी अळी नियंत्रणासाठी प्रकाश सापळ्यांचे प्रात्यक्षिक घेण्यात आले.

यावेळी पाणी फाउंडेशनच्या मेंटर रूपाली ठाकरे यांनी शेतकऱ्यांना हुमणी अळीच्या जीवनचक्राबाबत, तिच्या प्रादुर्भावामुळे होणारे नुकसान आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.हुमणी अळी (व्हाईट ग्रब) ही खरीप पिकांसाठी अत्यंत घातक कीड



मानली जाते. मे-जून महिन्यात पावसाळ्याच्या प्रारंभी तिचा प्रादुर्भाव वाढण्यास सुरुवात होते. विशेषतः सोयाबीन व कपाशी या प्रमुख पिकांच्या मुळांवर हल्ला करून ती मोठे आर्थिक नुकसान घडवून आणते. जमिनीखाली राहून ही अळी पिकांची मुख्य व उपमुळे कुरतडते. परिणामी पाणी व अन्नद्रव्यांचा पुरवठा खंडित होऊन झाडे पिवळी पडतात, निस्तेज होतात आणि अखेरीस चकत्यांच्या स्वरूपात वाळू लागतात.कृषी विभागाच्या माहितीनुसार, वेळेत नियंत्रण न केल्यास हुमणी अळीमुळे उत्पादनात ७० ते १०० टक्क्यांपर्यंत घट होऊ शकते. सुरुवातीच्या अवस्थेत प्रादुर्भाव झाल्यास दुबार पेरणीचे संकटही उद्भवू शकते. तसेच एका हंगामात नियंत्रण न झाल्यास पुढील वर्षी किडीचा प्रादुर्भाव अधिक तीव्र होण्याची शक्यता असते.

हुमणी अळी नियंत्रणासाठी शेतकऱ्यांना एकात्मिक व्यवस्थापन पद्धती अवलंबण्याचे आवाहन करण्यात आले. मान्सूनचा पहिला मोठा पाऊस झाल्यानंतर रात्री बाहेर पडणारे भुंगेरे गोळा करून नष्ट करणे, तसेच शेतात प्रकाश सापळ्यांचा वापर करून भुंग्यांचे प्रमाण कमी करणे, हे प्रभावी उपाय असल्याचे सांगण्यात आले.

याशिवाय मेटॅरायझियम ॲनिसोपली किंवा बिव्हेरिया बॅसियाना या जैविक बुरशीचा चांगल्या कुजलेल्या शेणखतात मिसळून वापर केल्यास हुमणी अळीवर प्रभावी नियंत्रण मिळवता येते. कच्चे किंवा अर्धवट कुजलेले शेणखत वापरणे टाळावे, कारण ते हुमणीच्या भुंग्यांना आकर्षित करते, असा महत्त्वपूर्ण सल्लाही यावेळी देण्यात आला.कार्यक्रमास सहाय्यक कृषी अधिकारी रुणाली पाटकर,गावातील अनेक शेतकरी उपस्थित होते. आतापर्यंत आष्टी, आसरा, मारकी खारतळे, भातकुली, म्हैसपूर आदी गावांमध्येही हुमणी अळी नियंत्रणासाठी प्रकाश सापळ्यांची प्रात्यक्षिके घेण्यात आली असून, शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत असल्याची माहिती कृषी विभागाने दिली.

'हुमणी अळीचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी गावपातळीवर सामूहिक प्रयत्न आणि वेळेवर प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविल्यास खरीप पिकांचे मोठे नुकसान टाळता येऊ शकते,' असे आवाहन तालुका कृषी अधिकारी उत्कर्षा भोसले यांनी केले.

## डॉ.सागर धनोडकर यांचे अमरावतीत स्वागत

**अमरावती/का.प्र.**



जगातील सर्वात आव्हानात्मक आणि प्रतिष्ठेची मानली जाणारी 'द अल्टिमेट ह्यूमन रेस' म्हणून प्रसिद्ध असलेल्या कॉम्रेड्स मॅरेथॉन २०२६ स्पर्धेत अमरावतीचे धावपटू डॉ. सागर सुरेखा सुरेश धनोडकर यांनी उल्लेखनीय कामगिरी करत ९० किलोमीटरची खडतर शर्यत यशस्वीरीत्या पूर्ण केली. त्यांच्या या यशामुळे अमरावतीचे नाव जागतिक स्तरावर उंचावले आहे. दक्षिण आफ्रिकेतील कॉम्रेड्स मॅरेथॉन असोसिएशन यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेली ही जगातील सर्वात जुनी अल्ट्रा मॅरेथॉन यंदा ९९ व्या वर्षात पदार्पण पार पडली. दक्षिण आफ्रिकेतील पिटरमॅरिट्झबर्ग येथून सुरू झालेली ही ९० किलोमीटरची स्पर्धा डर्बन येथे संपन्न झाली.यंदाच्या स्पर्धेत जगभरातील २२,३९९ धावपटूंनी सहभाग नोंदविला होता. भारतातून २७९ धावपटूंनी या स्पर्धेत भाग घेतला, त्यामध्ये अमरावतीचे प्रतिनिधित्व करणारे डॉ. सागर धनोडकर हे एकमेव धावपटू होते.विशेष म्हणजे, डॉ. धनोडकर यांनी ही खडतर स्पर्धा १० तास ४७ मिनिटांत पूर्ण करत सलग दुसऱ्या वर्षी कॉम्रेड्स मॅरेथॉनचे पदक पटकावले. अशाप्रकारे त्यांनी बॅक-टू-बॅक दोन वर्षे कॉम्रेड्स मॅरेथॉन यशस्वीरीत्या पूर्ण करण्याचा मान मिळविला आहे.ते आपल्या यशाचे श्रेय त्यांनी कुटुंबीय, मार्गदर्शक, सहकारी धावपटू, मित्रपरिवार तसेच सामाजिक, राजकीय आणि व्यावसायिक क्षेत्रातील शुभेच्छुकांना दिले आहे.डॉ. सागर धनोडकर यांच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे अमरावतीच्या क्रीडा क्षेत्राचा गौरव वाढला असून शहरातील क्रीडाप्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

## 'ते' आरोप दिशाभूल करणारे व निराधार

### चिरंजीवी टुरिझमचे संचालक डॉ.किरण पांडे यांचे स्पष्टीकरण

**अमरावती/का.प्र.**

पत्रकार परिषदेच्या माध्यमातून चिरंजीवी टुरिझमने पर्यटकांची फसवणूक केल्याचा आरोप करण्यात आला होता. या आरोपांबाबत स्पष्टीकरण चिरंजीवी टुरिझमचे संचालक डॉ.किरण पांडे यांनी खुलास्याव्दारे दिले असून लावण्यात आलेले 'ते' आरोप दिशाभूल करणारे व निराधार असल्याचे त्यांनी सांगितले आहे.

आरोप सर्वश्री जितेंद्रसिंह राजकुमार, विवेक मार्कंडेय, रामसिंग येवतीकर, सुजीत देशमुख व इतर आणखी ११ जणांनी केले आहे.तक्रारीच्या संदर्भात चिरंजीवी टुरिझमने आपली बाजू मांडली आहे.सदर पर्यटक समूहाने अत्यंत किफायतशीर दरामध्ये (थर्ड एसी ट्रेन प्रवास जाणे-येणे व रोहतांग पास परमिटसह प्रति व्यक्ती रु. २३,५००/-) मनाली, रोहतांग पास, धर्मशाला, डलहौसी, खजियार व अमृतसर असा विस्तृत पर्यटन दौरा, नागपूर ते नागपूर रेल्वे प्रवासासह बुक केला होता. हा प्रवास ६ दिवस व ५ रात्री असा होता (ट्रेन प्रवास वगळून). बुकिंगच्या वेळी ग्राहकांनी आपली आर्थिक बाजु समजावून ज्या प्रकारच्या पॅकेजची मागणी केली होती, त्यानुसार सर्व व्यवस्था करण्यात आली होती. पॅकेजच्या तुलनेत अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.संबंधित हॉटेल्सची निवड उपलब्धता, पर्यटन हंगामातील गर्दी आणि ठरलेल्या बजेटचा विचार करून करण्यात आली होती. पर्यटनाच्या पीक सीझनमध्ये अत्यल्प दरात अशा प्रकारचे पॅकेज उपलब्ध करून देणे हे सर्व टूरिझमसाठी आव्हानात्मक असते. तरीदेखील ग्राहकांना त्यांच्या मागणीनुसार किंवा त्याहून अधिक दर्जाच्या सुविधा देण्याचा प्रयत्न हा आमच्याकडून करण्यात आला.वाहन व्यवस्था, पर्यटनस्थळांच्या भेटी आणि मुक्काम याबाबत सर्व नियोजन पूर्वनियोजित होते. डोंगराळ रस्त्यांची परिस्थिती, वाहतूक कोंडी, हवामानातील बदल किंवा वाहनासंबंधी उद्भवणाऱ्या आकस्मिक अडचणी या नियंत्रणाबाहेरील बाबी आहेत. अशा परिस्थितीतही संबंधित समूहाचा संपूर्ण दौरा यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आला. प्रवासापूर्वी टूर ऑपरेटरची मागणी सदरहू प्रवाश्यांनी स्वतःहून नाकारली होती.

मनाली येथे हॉटेल न्यू समिता ग्रँड आरक्षित करण्यात आले होते. हॉटेल विषयी करण्यात आलेले आरोप हे निराधार व खोटे आहेत. नियोजित प्रवास टाळून आपला वेगळा आराखडा तयार करुन त्यप्रमाणे प्रवास करणे हे कुठल्याही वाहन चालकाला संभ्रमात टाकणारे आहे.

रेल्वे स्टेशनवर ड्रायव्हरकडून पैसे मागण्यात आले यावरील स्पष्टीकरणात संपूर्ण टूर हा पूर्व नियोजित व सशुल्क असल्याकारणाने ड्रायव्हरकडून पैसे मागण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. तसेच आपल्याच म्हणण्यानुसार गाडी ही ड्रायव्हरसहीत वेळेपूर्वी हजर होती. या वरुन हे लक्षात येते की,आमच्याकडून गाडी संबंधात कुठलीही गैरसोय झाली नाही.हॉटेल न्यु समिता ग्रँड संबंधी तक्रारीबाबत स्पष्टीकरणात होटलचे बांधकाम हे पूर्ण झालेले आहे. आपण आरोप लावल्याप्रमाणे होटल निर्माणधीन होते हे आपले म्हणणे दिशाभूल करणारे व निराधार आहेत.आपणच सांगितल्याप्रमाणे आपल्याला रुमस् ह्या दुपारी २ ला मिळाल्यात.हॉटेलचा चेकइन हा नियमाप्रमाणे दुपारी २:०० आहे. त्यामुळे होटलकडून मिळालेल्या रुमस् ह्या वेळेतच मिळाल्या आहेत.

टूर मॅनेजरची अनुपस्थिती याबाबत स्पष्टीकरणात टूर मॅनेजरसाठी अतिरिक्त खर्च हा प्रवाशांना करावा लागतो असे सांगितल्यानंतर आपणाकडूनच टूर मॅनेजरसाठी नकार देण्यात आला होता व ही बाब आपणास त्यावेळी मान्य होती.आर्थिक नुकसानीची भरपाई याबाबत स्पष्टीकरणात सर्व टूरचा सांगोपांग विचार करता सदरहू प्रवासामध्ये कुठल्याही प्रकारची आर्थिक हानी ही झालीच नाही. उलटपक्षी टूर कालावधी पूर्ण करुन संपूर्ण प्रवासी हे प्रवासाचा आनंद घेत आपल्या मूळ ठिकाणी सुखरुप पोहचले. तसेच संबंधित स्त्रोतांकडून (होटल इ.) प्रवाश्यांना कुठलाही त्रास झाला नाही.सकाळी ४ वाजता नाश्त्याची व्यवस्था करणे हे प्रत्येक हॉटेल व्यवस्थापनाला शक्य राहू शकत नाही. ३ दिवस पॅकेज व्यतिरिक्त एकूण ९,०००/- नाश्त्यासाठी वेगळे देण्यात आले होते. सर्व आरोप हे निराधार व व दिशाभूल करणारे आहेत. त्यामुळे पत्रकार परिषदेमध्ये रु. १,००,०००/- ची केलेली मागणी ही निराधार व टूर व्यावसायिकांना हेतुपुरस्सर बदनाम करण्याच्या उद्देशाने करण्यात येत असल्याचा आरोप चिरंजीवी टुरिझमचे संचालक डॉ.किरण पांडे यांनी केला आहे.

## भौतिकशास्त्र विभागाला विद्यापीठात प्रथम मानांकन

### विद्यापीठात 'एम.एस्सी. फिजिक्स' प्रवेश प्रक्रिया सुरू

**अमरावती/का.प्र**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागाद्वारे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी एम.एस्सी. फिजिक्स अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत चालवला जाणारा हा दोन वर्षांचा (४ सेमिस्टर) पूर्णवेळ अभ्यासक्रम असून, विद्यापीठ नियमांनुसार प्रवेश प्रक्रिया राबवली जाणार आहे. विशेष म्हणजे, भौतिकशास्त्र विभागाला वर्ष २०२४-२५ च्या 'युनिव्हर्सिटी डिपार्टमेंट रँकिंग फ्रेमवर्क' मध्ये प्रथम क्रमांक मिळाला असून, हा विभाग विद्यार्थ्यांसाठी उत्कृष्ट शैक्षणिक केंद्र ठरत आहे.

प्रवेशासाठी पात्रता व जागा-बी.एस्सी. फिजिक्स, एकूण प्रवेश क्षमता:३० जागा, कालावधी-२ वर्षे (४ सेमिस्टर), विभागाची वैशिष्टे आणि पायाभूत सुविधा-



या अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांना दर्जेदार शैक्षणिक वातावरण,स्वतंत्र वर्गखोल्या,ओव्हरहेड प्रोजेक्टर्स आणि हाय-स्पीड वाय-फाय सुविधा असलेली सुसज्ज इमारत अशा अत्याधुनिक सुविधा पुरवल्या जातात. प्रत्येक कोर्ससाठी स्वतंत्र आणि अत्याधुनिक उपकरणांनी सुसज्ज प्रयोगशाळा, अद्ययावत पुस्तके, ई-बुक्स, वातानुकुलित कॉम्प्युटर लॅब्स आणि मुलींसाठी स्वतंत्र कॉमन रुम असलेली लायब्रारी, संशोधन सुविधा-उच्च-तापमान भट्टी, सेंट्रीफ्यूज, एक्सआरडी, पीएल स्पेक्ट्रोमीटर, यूव्ही-व्हीजीबल स्पेक्ट्रोमीटर, एनजी-वायएजी लेझर आणि हायपॉवर डायोड लेझर्स यांसारख्या प्रगत संशोधन यंत्रणा उपलब्ध आहेत.

औद्योगिक प्रशिक्षण आणि इंटर्नशिपच्या संधी-विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता उद्योग जगताच्या गरजेनुसार तयार करण्यासाठी 'व्हॅल्यूॲडेड सर्टिफिकेट कोर्सेस' चालवले जातात. यामध्ये एनर्जी कन्झर्वेशन अँड मॅनेजमेंट, बेसिक इन्स्ट्रुमेंटेशन इन फिजिक्स तसेच विद्यार्थ्यांना अग्रगण्य कंपन्या, स्टार्टअप्स आणि नामांकित संस्थांमध्ये इंटर्नशिपसाठी विशेष मार्गदर्शन आणि पाठबळ दिले जाते, ज्यामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळतो.

विद्यार्थी `https://sgbauadm.samarth.edu.in/' या अधिकृत संकेतस्थळावर जावून आपले अर्ज करू शकतात. अधिक माहिती किंवा संपर्कासाठी hodphysics@sgbau.ac.in या ईमेल वर किंवा ९४२३१२४८८२ या क्रमांकांवर संपर्क साधू शकता, असे विद्यापीठाच्यावतीने कळविण्यात येत आहे.

## झोन २ मध्ये सर्वाधिक १५ जीर्ण इमारती

**अमरावती/का.प्र.**

नगरपालिका पावसाळा सुरू होण्यापूर्वी जीर्ण इमारतींची वार्षिक तपासणी करते. त्यानुसार, पाचही विभागांमधील 'सी-१' श्रेणीतील २६ इमारती अत्यंत जीर्ण मानल्या गेल्या असून, महानगरपालिका प्रशासनाने कारवाई करत संबंधित अधिकाऱ्यांना नोटिसा बजावल्या आहेत. हे विशेष उल्लेखनीय आहे की, पाचही विभागांमध्ये मिळून 'सी-१' मधील २६, 'सी-२' मधील ५० आणि 'सी-३' मधील ३, अशा एकूण ७९ इमारती जीर्ण श्रेणीत आहेत.

शहराच्या पाच झोनमध्ये मिळून सी-१ प्रवर्गातील एकूण २६ जीर्ण इमारती आहेत. महानगरपालिकेला या जीर्ण इमारतींचा संपूर्ण तपशील प्राप्त झाला आहे. यामध्ये झोन १ रामपुरी कॅम्पमध्ये १, झोन २ राजापेठमध्ये १५, झोन ३ दस्तूर नगरमध्ये ०, झोन ४ बडनेरामध्ये ० आणि झोन ५ भाजी बाजारमध्ये १० अशा एकूण २६ अत्यंत जीर्ण इमारतींचा समावेश आहे.पाचही विभागांमध्ये मिळून एकूण ७९ मोडकळीस आलेल्या इमारती आढळून आल्या असून, त्यापैकी २६ सी-१ श्रेणीत, ५० सी-२ श्रेणीत आणि ३ सी-३ श्रेणीत आहेत.पावसाळ्यापूर्वी सी-१ प्रवर्गातील इमारती पाडण्यात आल्या. 'अ' प्रवर्गातील सी-२ प्रवर्गातील इमारती.

दरम्यान, सी-२ मध्ये जीर्ण इमारती आहेत, परंतु त्यांची दुरुस्ती करता येते. झोन १ मध्ये रामपुरी कॅम्पमध्ये १, झोन २ मध्ये राजापेठमध्ये ३, झोन ३ मध्ये दस्तूर नगर, झोन ४ मध्ये बडनेरामध्ये १ आणि झोन ५ मध्ये भाजी बाजारमध्ये ४५ इमारती आहेत. अशाप्रकारे, सी-२ श्रेणीमध्ये एकूण ५० इमारती आढळल्या. तर सी-३ श्रेणीमध्ये, झोन १ ते ४ मधून एकही दुरुस्त करण्यायोग्य इमारत आढळली नाही. झोन ५ मध्ये भाजी बाजारमध्ये ३ इमारती आहेत.पालिका आयुक्त यांच्या माहितीनुसार, शहर अभियंता रवींद्र पवार यांच्या सूचनेनुसार,पाचही विभागांच्या सहायक आयुक्तांमार्फत संबंधित मालकांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत.

## पुरेसा पाऊस न पडल्यास पाण्याची टंचाईचे संकट

### लघु सिंचन प्रकल्पांमधील पाणीसाठा अत्यल्प

**अमरावती/का.प्र.**

यावर्षी मान्सूनला सुरुवात झाली असली तरी, मोर्शी आणि वरुड तालुक्यांमधील बहुतांश लहान सिंचन प्रकल्पांमध्ये पाणीसाठा मर्यादित आहे. अनेक जलाशयांमध्ये त्यांच्या क्षमतेच्या केवळ २५ ते ३८ टक्के पाणीसाठा असल्याचे अहवाल सूचित करतात. येत्या काही दिवसांत पुरेसा पाऊस न पडल्यास, पिण्याच्या पाण्याची आणि सिंचनाच्या पाण्याची टंचाई गंभीर होऊ शकते.

अहवालानुसार, २५१ ते ६०० हेक्टर सिंचन क्षमता असलेल्या प्रकल्पांमध्ये वैगाव लघु प्रकल्पात ३८.२६ टक्के, सतनूरमध्ये ३६.४४ टक्के, बहाडामध्ये ३५.०९ टक्के आणि पुसलीमध्ये सिंचन क्षमता आहे.या प्रकल्पात ३४.७७ टक्के पाणीसाठा नोंदवला गेला आहे. याशिवाय, त्रिवेणी प्रकल्पात ३१.३६ टक्के पाणी उपलब्ध आहे. १०१ ते २५० हेक्टर सिंचन.

क्षमता असलेल्या प्रकल्पांची स्थितीही समाधानकारक नाही. नागठाणा प्रकल्प ३३.२७ टक्के, पंढरी ३०.७३ टक्के,



जमालपूर ३०.१९ टक्के आणि जामगाव उर्वरित पाणीसाठा शहापूर प्रकल्पात २९.८५ टक्के, पूर्णासना प्रकल्पात २९.३० टक्के आणि लिंगा प्रकल्पात केवळ २५.०६ टक्के आहे. मोर्शी तालुक्यातील शहापूर लघु प्रकल्पात २७.४० टक्के पाणीसाठा आहे.अजूनही पाणी शिल्लक आहे आणि प्रशासन परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे.

सध्या बहुतांश भाग चांगल्या पावसाच्या प्रतीक्षेत आहेत, ज्यामुळे शेतकरी चिंतेत आहेत. संत्र्याचे उत्पादन करणाऱ्या भागांमध्ये सिंचनासाठी पाण्याची उपलब्धता विशेषतः महत्त्वाची आहे.हे महत्त्वाचे आहे. त्यामुळे, येत्या काही दिवसांत चांगला पाऊस पडणे आवश्यक मानले जात आहे. विहिरींमधील पाण्याची पातळीही खोल झाली आहे.तालुक्यात अपुऱ्या पावसामुळे भूजल पातळी खालावली असून, अनेक भागांतील विहिरींची पातळी लक्षणीयरीत्या कमी झाली आहे. यामुळे शेतकरी आणि ग्रामीण रहिवाशांसमोर पाणीटंचाई निर्माण झाली आहे. संत्र्याच्या उत्पादक पट्ट्यातही सिंचनासाठी पाण्याची उपलब्धता कमी होत असून, त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंता वाढली आहे. येत्या काही दिवसांत चांगला पाऊस न झाल्यास परिस्थिती आणखी बिघडण्याची शक्यता आहे.

**पाणी साठवणीवर एक नजर**

| | |
|---|---|
| वायगाव मिनी प्रकल्प- | ३८.२६ |
| सातनूर मिनी प्रकल्प- | ३६.४४ |
| बहाडा लघु प्रकल्प- | ३५.०९ |
| शहापूर लघु प्रकल्प- | २७.४० |
| लिंगा मिनी प्रकल्प- | २५.०६ |

## संक्षिप्त

### प्लास्टिक जप्ती आणि डस्टबिन तपासणी मोहीम



**अमरावती-** महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्डा व अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांच्या आदेशानुसार आणि वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ. अजय जाधव तसेच सहाय्यक आयुक्त भूषण पुसतकर झोन क्र.२ यांच्या मार्गदर्शनाखाली राजापेठ व भुतेश्वर चौक ते रविनगर परिसरात प्लास्टिक जप्ती आणि डस्टबिन तपासणीची विशेष मोहीम राबविण्यात आली. मोहिमेदरम्यान एकूण २२ व्यावसायिक आस्थापनांची तपासणी करण्यात आली. तपासणीवेळी काही ठिकाणी कापडी व कागदी पिशव्यांचा तसेच ५१ मायक्रॉनपेक्षा अधिक जाडीच्या प्लास्टिकचा वापर आढळून आला. मात्र, दोन आस्थापनांमध्ये प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर आढळल्याने संबंधितांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली.मोहिमेत प्लास्टिक नोडल अधिकारी ए. के. गोहर, ज्येष्ठ स्वास्थ्य निरीक्षक श्रीकांत डवरे, स्वास्थ्य निरीक्षक धनीराम कलोसे, मिथुन उसरे, सचिन सैनी, मिथुन वाघमारे, पवन चावरे, अजिंक्य जवंजाळ, शक्ती पिवाल आणि योगेश कंडारे यांनी सहभाग घेतला.

### शासकीय आय.टी.आय.येथे प्रवेश प्रक्रिया सुरू

**अमरावती-** शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आय.टी.आय.), गुरुकुंज मोझरी (ता. तिवसा, जि. अमरावती) येथे सत्र ऑगस्ट २०२६ करिता अधिकृत प्रवेश प्रक्रिया सुरु झाली आहे. औद्योगिक क्षेत्रातील वाढती मागणी लक्षात घेता, कौशल्याधारित शिक्षणातून विद्यार्थ्यांना स्वावलंबी बनवण्याची ही एक उत्तम संधी आहे. या शैक्षणिक सत्रासाठी संस्थेत एकूण ३६८ जागा उपलब्ध असून,१० वी उत्तीर्ण व अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी रोजगाराभिमुख अशा लोकप्रिय कोर्सेसचा यात समावेश आहे.संस्थेमध्ये १ वर्षाच्या कोर्सेस अंतर्गत वुड वर्क टेक्नॉलॉजी, कोपा, मेकॅनिक डिझेल, वेल्डर, फॅशन डिझाईन अँड टेक्नॉलॉजी आणि सोलर टेक्निशियन हे कोर्सेस उपलब्ध आहेत. तर २ वर्षांच्या कोर्सेसमध्ये इलेक्ट्रीशियन, वायरमन, मेकॅनिक मोटर व्हेहिकल, मशिनिस्ट, फिटर, आय.सी.टी.एस.एम. आणि ड्राफ्ट्समन मेकॅनिक यांसारख्या ट्रेडचा समावेश आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी संस्थेत सुसज्ज संगणक कक्ष, मोफत इंटरनेट, वाचनालय, वसतिगृह, कॅन्टीन, शुद्ध पिण्याचे पाणी आणि ओपन ग्रीन जिम या अद्ययावत सुविधा उपलब्ध आहेत.अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी आय.टी.आय. मोझरी येथे थेट किंवा ०७२२५-२२४२३७ या क्रमांकावर संपर्क साधावा.

### शासकीय वसतिगृहात विद्यार्थिनींसाठी विनामूल्य प्रवेश

**अमरावती-** चांदूर रेल्वे येथील सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत कार्यरत असलेल्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले शासकीय वसतिगृहात विद्यार्थिनींसाठी विनामूल्य प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे.चांदूर रेल्वे बस डेपोच्या मागील परिसरात असलेल्या या शासकीय वसतिगृहात इयत्ता ८ वी पासून ते महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थिनींसाठी निवास, भोजन आणि अभ्यासिकेची उत्तम सोय पूर्णपणे मोफत उपलब्ध करून दिली जाते. या प्रवेश प्रक्रियेसाठी ऑनलाईन अर्ज भरण्याची सुरुवात झाली असून, इयत्ता ७ वी उत्तीर्ण झालेल्या व ८ वीत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थिनींसाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत ३० जून २०२६ पर्यंत आहे.कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींसाठी १५ जुलै २०२६ ही अंतिम तारीख निश्चित करण्यात आली आहे. इच्छुक आणि पात्र विद्यार्थिनींनी प्रवेशासाठी https://hmasnew.mahait.org या अधिकृत संकेतस्थळाला भेट देऊन आपले ऑनलाईन अर्ज मुदतीपूर्वी सादर करावेत.

### नंदू कलावटे यांचे निधन



**चांदूर रेल्वे-** शहरातील युवा व्यापारी नंदू कालीचरण कलावटे वय ५५ वर्ष यांचे हृदयविकाराने मृत्यू झाला. त्याच्या मागे मोठे बंधू संतोष व दोन लहान बंधू गोपाल, जगदीश, पुतणे,पुतणी असा मोठा आप्त परिवार आहे.

### नशा मुक्त सप्ताहाला प्रारंभ

**अमरावती-** देशातील अमली पदार्थांची मागणी कमी करण्यासाठी भारत सरकारचे सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय नोडल विभाग म्हणून काम पाहत आहे. त्या अंतर्गत जिल्ह्यात 'नशा मुक्त भारत अभियाना'ला सुरवात झाली आहे. या पार्श्वभूमीवर, आगामी २६ जून रोजी साजरा होणाऱ्या 'आंतरराष्ट्रीय मादक पदार्थ गैरवापर आणि अवैध तस्करी विरोधी दिना'चे औचित्य साधून जिल्ह्यात 'नशा मुक्त भारत अभियान, विकसित भारत की पहचान' या संकल्पनेवर आधारित विशेष 'नशा मुक्त सप्ताह' आयोजित करण्यात आला आहे.समाज कल्याण विभागामार्फत जिल्ह्यातील सर्व महाविद्यालये, शासकीय वसतिगृहे, व्यसनमुक्ती केंद्रे, प्रतिष्ठित नागरिक आणि सर्वसामान्य जनतेला या मोहिमेत सक्रिय सहभागी होण्याचे जाहीर आवाहन करण्यात आले आहे. या अभियानांतर्गत नागरिकांनी अमली पदार्थ मुक्तीचा संकल्प करावा आणि केंद्र सरकारच्या अधिकृत संकेतस्थळावर (https://nmba.dosje.gov.in/content/take-a-pledge) जाऊन ऑनलाईन पद्धतीने तसेच विविध स्थानिक कार्यक्रमांचे आयोजन करून ऑफलाईन पद्धतीनेही नशामुक्तीची सामुहिक शपथ घ्यावी, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## ‘उबाठा’ला खिंडार

निष्क्रिय नेतृत्वाच्या निष्क्रिय पक्षाचे दोन तृतीयांश खासदार पक्षातून बाहेर पडत असल्याने देशातील राजकारणात गेले दोन दिवस त्याचीच चर्चा आहे. तृणमूल काँग्रेसमध्ये सुरू असलेली फूट तिथल्या विधानसभा निवडणुकांच्या निकालाचा परिणाम आहे. महाराष्ट्रात तसे काहीच नाही. तरीही इथे गेले दोन - अडीच महिने ‘ऑपरेशन टायगर’ सुरू आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी चार वर्षांपूर्वी सेनेला मोठा धक्का दिला, तेव्हा ‘पडद्यामागे काय सुरू आहे, याची स्पष्ट कल्पना मला होती’ असे विधान उबाठा प्रमुखांनी नुकतेच केले. मग प्रश्न असा येतो, सर्व माहिती असूनही तुम्ही काय केले? काहीच नाही? पक्ष वाचवावा असे तुम्हाला वाटलंच नाही? तुमची सगळी इच्छाशक्तीच मेली आहे का? आणि तसे असेल, तर तुमच्या बरोबर का राहायचे? असे प्रश्न निर्माण होतात. ‘ऑपरेशन टायगर’ अंतिम टप्प्यात आल्यानंतर ‘मातोश्री’ वर आयोजित केलेल्या खासदारांच्या बैठकीतही त्यांनी ‘ज्यांना जायचे आहे, त्यांनी खुशाल जा. आज माझे दिवस चांगले नाहीत; पण नंतर येतील’, असे विधान केल्याचे प्रसिद्ध झाले आहे. राजकारण इतके सोपे असते, तर काय हवे होते? इतक्या दैवभरवशी नेत्यावर विसंबून खासदार, आमदार आणि नगरसेवकांनी आपली महत्त्वाची वर्ष का वाया घालवायची? ‘माझे चांगले दिवस येतील, तोपर्यंत वाट पाहा’ असे सांगणारा असा नेता या पृथ्वीतलावर अजून तरी झाला नसेल! उबाठांनी कधी स्वतः जनतेत जाऊन निवडणूक लढवली नाही. त्यामुळे, जनमत सांभाळण्यासाठी किती कष्ट घ्यावे लागतात, याची कल्पना त्यांना नाही. हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा रक्ताचा वारस म्हणूनच केवळ राजकारणात यांचे अस्तित्व आहे. बाकी सगळे शून्य. ‘ठाकरे’ या आडनांवाच्या बळामुळेच यांना मुख्यमंत्रीपदापर्यंत आयते जाता आले. संधी अनेक मिळाल्या; पण एकाही संधीचा नीट उपयोग करता आला नाही. ना माणसांत मिसळता आले, ना माणसे सांभाळता आली उलट मिळालेल्या पवित्र वारशाचा माज म्हणून प्रामाणिक, एकनिष्ठ शिवसैनिकांची टिंगलटवाळी, पाणउतारा करण्यात दिवस घालवले. अशा नेतृत्वावरोवर कार्यकर्ते, लोकप्रतिनिधींनी का राहावे? प्रत्येक फुटीसाठी दुसऱ्याला दोष देण्यापेक्षा पूर्वीच आत्मपरीक्षण केले असते, तर आज पुन्हा तीच वेळ आली नसती, हे कोणीही सामान्य शिवसैनिक सांगेल! राजकारणात सक्रिय असणे महत्त्वाचे असते. संघटना बांधणी आणि तिची मजबुती ही तर अविरत चालणारी प्रक्रिया आहे. अन्य कोणत्याही नेत्याकडे, त्याच्या पक्षाकडे पाहा. ‘देशात सर्वाधिक आळशी नेता आणि निष्क्रिय पक्ष कोणता?’अशी जनमत चाचणी घेतली, तर खात्रीने उबाठाचाच पहिला नंबर येईल. नंबर नुसता येईलच असे नाही, तो वर्षानुवर्ष टिकेल! कारण निवडणुका येवोत, राज्यावर कुठले संकट येवो, खासदार-आमदार-नगरसेवकाने आयोजित केलेला महत्त्वाचा कार्यक्रम असो, महत्त्वाच्या कार्यकर्त्यांच्या घरी सुखदुःखाचे प्रसंग येवोत, उबाठा कधीच घराबाहेर पडणार नाहीत. बरे, त्यांच्या प्रकृती अस्वास्थ्याचे कारण मान्य करावे, तर त्यांचे आमदार चिरंजीव तरी काही करतात का? तेही वातानुकूलित घराचा उंबरठा ओलांडत नाहीत. मग लोकांनी यांच्याबरोबर का राहायचे? यांचे कधीतरी चांगले दिवस येतील आणि मग आपलेही भले होईल म्हणून? पक्षात उरलेल्यांनाच विचारा, त्यांचे अनुभव काय आहेत ते! यांची ही वक्तव्य आणि एकूण ऐषोआराम पाहून शरद पवार यांना मुख्यमंत्री पदासाठी यांच्या नावाचा आग्रह धरल्याचा सर्वाधिक पश्चात्ताप होत असेल. राज्यातल्या महाविकास आघाडीत काँग्रेस आणि उबाठा हे दोन महत्त्वाचे पक्ष आहेत. काँग्रेसची राज्यभर वाताहात सुरू आहे. पक्षाला दमदार नेताच नाही. जे नेते दिसतात, त्यातल्या प्रत्येकाची तोंडे वेगवेगळ्या दिशेला. तरीही त्यांचे खासदार आणि आमदार स्थिर आहेत. फाटाफूट दरवेळी उबाठातच का होते? कारण, पक्षाचा जनमताचा पाया रोज ढासळतो आहे. नवा कार्यकर्ता, नवा मतदार जुळणे सोडाच; आहेत त्यातही दरदिवस मोठी घसरण होते आहे. शाखांवर मरगळीचे सावट पसरले आहे. ज्या मुंबईसाठी उबाठा पितापुत्राने अख्ख्या महाराष्ट्राकडे पाठ फिरवली, त्या मुंबईतल्या पक्ष संघटनेची स्थिती तरी काय वेगळी आहे? कोणाचा कोणाला वेळ नाही अन् कोणाचा पायपोस कोणात नाही !! राज्यातल्या जाऊ द्या, मुंबईच्या पक्षाला तरी काही कार्यक्रम, काही दिशा? सगळ्या बाजूंनी विस्कटलेल्या, ढासळत चाललेल्या पक्ष संघटनेला सावरण्यासाठी स्वतः काही करणार नाही आणि दुसऱ्याला काही करू देणार नाही -अशी परिस्थिती असेल, तर जे जनतेतून निवडून आले आहेत, त्यांनी जाणीवपूर्वक स्वतःचा सर्वनाश स्वतःच का ओढवून घ्यावा? इच्छाशक्ती मेलेल्या नेतृत्वाच्या निष्क्रियतेचे ओझे त्यांनी का आणि किती दिवस वाहावे? पक्षात राहिलेल्या शेवटच्या तीन खासदारांनी आधी स्वतःसाठी या प्रश्नांची उत्तरे शोधायला हवीत आणि मग दुसऱ्याला दोष द्यायला हवा. उबाठाचे अ. भा. प्रवक्ते म्हणजे तर दिव्य पुरुष आहेत! जाणाऱ्या कोणालाही विचारले, तर आपल्या पक्षत्यागाचे पहिले श्रेय ते त्यांनाच देतील! सूर्य उगवला, की कोणावर तरी दुगाण्या झाडून, कुणाला शिवीगाळ करून किंवा त्यांच्या वयाएवढी ज्यांची राजकीय कारकीर्द आहे, त्यांना साक्षात्काराचे डोस पाजून आपले पक्षकार्य पूर्ण झाले,असा त्यांचा समज असतो. स्वतःला ‘प्रति बाळासाहेब’ मानले, की त्यांच्यासारखी भाषा वापरण्याचा अधिकार आपल्याला आपोआप मिळतो, हा त्यांचा भ्रम उबाठा गटाचे पूर्ण विसर्जन केल्याशिवाय राहणार नाही. त्यामुळे, उद्या काय घडेल; संविधानिक तरतुदींतून कोण कशी वाट काढेल, हा विषय वेगळा असला, तरी गटाचे अस्तित्व ‘निरंक’ होईपर्यंत फुटीची आणि - हासाची प्रक्रिया थांबणार नाही, एवढे नक्की. या गटाचे आता तेच नैसर्गिक भागधेय दिसते आहे.

# उद्धवजी ! उध्वस्त होण्याआधी पुनःश्च हरिओम करा !!

कोणे एके काळी महाराष्ट्रात शिवसेना नावाचे वादळ हिंदूहृदयसम्राट वं.बाळासाहेब ठाकरेंच्या विचाराने घोंगावत होते.पु.बाळासाहेबांचे निधन झाले आणि त्यांच्या पुढील पिढीने बाळासाहेबांना श्रद्धांजली वाहतांना बाळासाहेबांच्या विचारांनाही तिलांजली देणे सुरू केले.उद्धवसेना उध्वस्त सेना होऊ लागली.त्याचा परिणाम म्हणून पहिला उठाव श्री.एकनाथ शिंदे यांनी केला.काही खासदार आणि आमदारांना घेऊन त्यांनी वेगळा गट स्थापन केला.

एव्हढी मोठी घटना घडल्यावर उद्धवजींनी सावध व्हायला हवे होते.आमदार खासदार नाराज असल्याबाबत उद्धवजींना त्यातल्या काहींनी सूचित करूनही दुरुस्ती तर दुरच उलट त्यांनाच लाथाडणे उद्धवजी आणि त्यांच्या सल्लागारांनी सुरू केले.इतिहासातून धडा शिकणे तर दूरच उलट आपल्याच तालात असणारे उद्धवजी कालच्या घटनेने ‘याची देही याची डोळा’ उध्वस्त झाले.

मी सुरुवातीपासून म्हणजे १९८५ मध्ये छगन भुजबळ वाशीमला आले होते तेंव्हापासून संयुक्त शिवसेनेशी संपर्कात आहे.हिंदुत्वाच्या वैचारिक साम्यामुळे शिवसेनेची वाताहत होतांना ज्यांना ज्यांना दुःख झाले असेल त्यातला मी पण एक आहे.त्याकाळात हिंदुत्ववादी सर्वच संघटनांना शिवसेना आपली वाटत असे.

वं.बाळासाहेबांच्या निधनानंतर उद्धव ठाकरेंनी संजय राऊतांच्या ओंजळीने पाणी पीत बाळासाहेबांच्या विचारांना हळू हळू मूठमाती देणे सुरू केले. तेंव्हा माझ्यासारख्या अनेकांना प्रचंड चिड येत असे.त्यांच्यावर कडक शब्दात प्रहारही आम्ही सर्व करीत होतो.कालांतराने उबाठा हिंदुत्वापासून कोसो दूर गेल्याची जाणीव झाल्यावर आमच्या संवेदनादेखिल बोथट झाल्या.





काल उबाठाचे सहा खासदार जेंव्हा वेगळे झाले तेंव्हा उद्धव ठाकरेंची मनातून मला कीव आली.एखाद्या महाकाय डोंगराचा असा अंत होतांना बघवत नाही.एव्हढी वाताहत होऊनही या माणसाचे डोळे का उघडत नाहीत?हा प्रश्न वारंवार सतावत आहे.

जे लोक सोडून गेले त्यांच्या जाण्याची अनेक कारणे असतील पण त्यातील काही कारणे महाराष्ट्रमान्य आहेत.

१) श्रीमान उद्धव ठाकरेंनी बाळासाहेबांचे हिंदुत्व सोडले.

२) श्री.उद्धव ठाकरे खासदारांना भेटत नाहीत.

३) श्री.संजय राऊतांची वाचाळगिरी पक्षाला रसातळाला नेत आहे.

सध्याचे उबाठा नेते यातील एकही बाब मान्य करीत नाहीत पण अखिल महाराष्ट्र वरील तिन्ही बाबींवर ठाम आहे.

विशेष म्हणजे श्री.एकनाथ शिंदे यांनी जेंव्हा बंड केले तेंव्हाही हीच कारणे होती.दुधाने तोंड पोळले तर ताकही फुंकून पितात म्हणे.पण इथे सुधारणा तर दूरच उलट बिघडण्याचा चढा आलेख आहे.राऊत आणि कंपूंची उलट गुर्मी,मस्ती वाढतांना दिसत आहे.

सहा खासदार पक्ष सोडणार,ऑपरेशन टायगर होणार हे अख्ख्या महाराष्ट्राला माहीत होते.ते उबाठालाही ज्ञात होतेच.तरीही बेसावध राहून पुरेसा बेजबाबदारपणा सिद्ध करणे योग्य नाही.पण उद्धवजींनी काहीही अचूक पाऊले उचलण्याची तसदी घेतली नाही.राऊतांच्या नादी लागून साखरझोप घेतली.ठिगळ लावणे तर दूरचं उलट भोसडीचे वगैरेची लाखोळी वाहण्यात धन्यता मानल्या जात होती.

उबाठाने पूजनीय बाळासाहेबांचा विचार सोडला हे लहान लेकरू देखिल सांगेल.

एक काळ असा होता की ज्वलंत हिंदुत्व म्हणजे शिवसेना.तिच शिवसेना आता मुस्लिमसेना झाल्याची भावना महाराष्ट्राची आहे.कार्यकर्त्यांना भेट देणे,त्यांच्या सुखदुःखात सहभागी होणे हे नेत्याचे कर्तव्य आहे.या बाबतीतही उबाठा नापास आहे.संजय राऊताचे रोज सकाळचे वाचाळणे शिवसेनेच्या अध:पतनाला कारणीभूत असल्याचे ठाम मत सर्वजण व्यक्त करतात.पण तरीही यावर कोणतीही दुरुस्ती होणार नसेल तर पक्षाला क्षयरोग होणे स्वाभाविक आहे.

वंदनीय बाळासाहेबांच्या पक्षाची अशी वाताहत मनाला अस्वस्थ करून जाते.

उबाठाने अहंगंड आणि अहंकार त्यागून काही पाऊले उचलणे गरजेचे वाटते.

१) उबाठाने प्रांजळ अंतःकरणाने बाळासाहेबांचे विचार सोडण्याची चूक मान्य करून महाराष्ट्राची माफी मागावी.

२) पुन्हा एकदा वं.बाळासाहेबांचे कडवे हिंदुत्व धारण करून त्यांच्या विचारावर मार्गक्रमण करावे.

३) खूप फाटले असले तरी विनम्रता स्विकारून जुन्या नव्यांना एकत्रित येण्यासाठी पहिले पाऊल टाकावे.

४)सर्वांनी एकत्रित येणे सध्यातरी कठीण असले तरी अशक्य नाही.त्यासाठी गर्व,अभिमान,अहंकार,अहंभाव त्यागून बाळासाहेबांचा ठेवा जपण्याचा प्रयास करावा.

५) काही काळासाठी श्री.संजय राऊतांना सक्तीच्या रजेवर पाठवावे.

६) कुटुंब प्रमुखाने प्रमुखांसारखे वागावे.

७) अपमानाचे हलाहल पचवित सर्वांशी संपर्क करावा.

८) घरात घुसून मारा,आता दाखवतोच,फिरू देणार नाही,गाड्या जाळू,घरे फोडू या वेगळ पोकळ धमक्या आहेत.आणि हा यशस्वी मार्ग देखिल नाही.हे सर्व टाळले पाहिजे.हे होत नसेल तर उबाठाचे पुढील भवितव्य कठीण आहे.

विनाश काळातील विपरीत बुद्धी टाळून हिंदुत्वाचा मार्गच उबाठात थोडाफार प्राण फुंकेल असे माझे प्रांजळ मत आहे.

पुनःश्च हरिओम करीत पुन्हा एकदा आपल्या मूळ मार्गावर येण्याचा दृढसंकल्प आणि वज्ञानिर्धार करणे अत्यावश्यक आहे.शिवसेना उबाठाचे भरकटलेले जहाज मुळमार्गावर आणण्याचा हाच उपाय आहे.

अन्यथा बाळासाहेबांचा शिवसेना नावाचा पक्ष आणि पक्ष विचार त्यांच्याच पुत्र प्रपौत्रांनी रसातळाला नेवून संपविण्याचे महापाप त्यांच्या ललाटावरची दुष्टाक्षरे बनून कायम उमटून राहील.कडवे हिंदुत्व हाच बाळासाहेबांच्या पिंडाला काकस्पर्श होण्याचा योग्य मार्ग सोपान आहे.

**विद्यावाचस्पती प्रा.दिलीप जोशी,वाशिम.**
मो.९८२२२६२७३५

## लोकशाही की सत्तेचा बाजार?

आज देशातील आणि राज्यातील राजकारण ज्या दिशेने चालले आहे, ते पाहून सामान्य मतदाराच्या मनात अनेक प्रश्न निर्माण होत आहेत. निवडणुकीच्या वेळी जनतेसमोर एक विचार, एक पक्ष आणि एक भूमिका मांडून मते मागितली जातात परंतु निवडून आल्यानंतर काही लोकप्रतिनिधी सत्तेच्या आणि स्वार्थाच्या राजकारणासाठी आपली भूमिका बदलताना दिसतात. त्यामुळे जनतेच्या विश्वासाला मोठा धक्का बसतो.

मतदार आपल्या भागाच्या विकासासाठी, आपल्या विचारांचे प्रतिनिधित्व व्हावे म्हणून खासदार-आमदार निवडून देतो. पण निवडून आल्यानंतर जर तेच लोकप्रतिनिधी जनतेने दिलेल्या कौलाचा अनादर करून वेगळी भूमिका घेत असतील, तर हा केवळ राजकीय प्रश्न नसून लोकशाहीच्या मूल्यांवरच आघात आहे.आज राजकारणात तत्त्व, विचार, निष्ठा आणि जनतेप्रती असलेली बांधिलकी यांचे महत्त्व कमी होत चालल्याचे दिसते. सत्तेसाठी कोणत्याही थराला जाण्याची स्पर्धा सुरू आहे. यामुळे सामान्य नागरिकांच्या मनात राजकारणाबद्दल नाराजी आणि अविश्वास वाढत आहे. लोकशाहीची खरी ताकद ही जनतेचा विश्वास असते. तोच विश्वास जर डळमळीत झाला, तर लोकशाही कमकुवत होते.

मात्र या परिस्थितीत संताप व्यक्त करताना आपण लोकशाहीचे भानही राखले पाहिजे. हिंसा, द्वेष किंवा कायदा हातात घेणे हा कोणत्याही समस्येचा उपाय नाही. जनतेचे सर्वात मोठे शस्त्र म्हणजे मतदानाचा अधिकार. ज्या लोकप्रतिनिधींनी जनतेचा विश्वासघात केला आहे असे वाटत असेल, त्यांना निवडणुकीत योग्य उत्तर देणे हेच लोकशाहीला साजेसे उत्तर आहे.वेळ आली आहे की मतदारांनी अधिक सजग, जागरूक आणि प्रश्न विचारणारे व्हावे. लोकप्रतिनिधी कोणत्या विचारांसाठी उभे आहेत, त्यांनी दिलेली आश्वासने कितपत पाळली, जनतेच्या प्रश्नांसाठी त्यांनी किती संघर्ष केला याचा हिशेब मागितला पाहिजे.लोकशाही वाचवायची असेल तर जनतेने जागृत राहिले पाहिजे. व्यक्तीपेक्षा विचार मोठा, सत्ता पेक्षा जनतेचा विश्वास मोठा आणि राजकारणापेक्षा लोकशाही मोठी आहे, हे प्रत्येक लोकप्रतिनिधीने लक्षात ठेवले पाहिजे.

**विलास ताथोड**
मो. नं.७०२०५८५२६१

# संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या व्यथा

**मराठीमध्ये एक म्हण आहे, ‘आई जेवू घालीना आणि बाप भीक मागू देईना’ अशी अवस्था संत्रा उत्पादक शेतकऱ्यांची मागच्या काही वर्षांमध्ये झाली आहे. फक्त आईबापाची जागा आता सरकार आणि निसर्ग आलटून पालटून घेत असतो. बाकी या दोघांच्या मध्ये अडकलेला संत्रा उत्पादक शेतकरी मात्र कायम तसाच आहे. भारतात जवळपास पाच लाख हेक्टर जमिनीवर संत्र्याची लागवड झाली आहे.**

महाराष्ट्र, मध्य प्रदेश आणि इतर काही राज्यांमध्ये संत्र्याची लागवड केली जाते. त्यातून जवळपास १३ लाख टन संत्रा उत्पादन दरवर्षी घेतले जाते आणि त्यातील ६० टक्के संत्रा हा फक्त महाराष्ट्रात होतो. तो जवळपास सात लाख टन आहे. अमरावती जिल्ह्यातील वरूड आणि मोर्शी तालुका हा विदर्भातील कॅलिफोर्निया या नावाने प्रसिद्ध होण्यासाठी एकमेव कारण म्हणजे संत्र्याचे उत्पादन. एकेकाळी हमखास उत्पादन आणि नगदी पीक यामुळे या भागामध्ये बरीच सुबत्ता आली होती. परंतु गेल्या काही वर्षांमध्ये उत्पादनापासून तर विक्रीपर्यंत अनेक समस्यांना शेतकऱ्यांना सामोरे जावे लागत आहे. हवामानातील बदल, संत्र्याच्या झाडावर येणारे रोग, वाढता उत्पादन खर्च, अस्थिर, बेभरवशाचा बाजार आणि अपुरी शासकीय मदत यामुळे संत्रा उत्पादक शेतकरी अडचणीत सापडला आहे.

संत्र्याची बाग तयार करायला साधारणतः पाच ते सहा वर्षे लागतात आणि दहा वर्षांनंतर ती संत्र्याची बाग पूर्ण क्षमतेने संत्रा उत्पादन करते. सुरुवातीची पाच वर्षे त्यातून कोणतेही उत्पन्न निघत नाही. संत्रा हे फळ साधारणतः दहा ते अकरा महिने शेतकऱ्याला सांभाळावे लागते. इतर पिकं ही तीन किंवा चार महिन्यांची असतात. त्यामुळे त्यांना पाणी कमी लागते. परंतु संत्र्याच्या बागांना नियमित सिंचनाची आवश्यकता असते. अनेक भागांमध्ये भूजल पातळी खालावली असून विहिरी आणि बोरवेल कोरड्या पडलेल्या आहेत. त्यामुळे पाण्याअभावी झाडे मरत आहेत आणि फळाची गुणवत्ता कमी होत आहे. ठिबक सिंचनाचा वापर वाढत असला तरी त्यासाठी लागणारा खर्च हा छोट्या शेतकऱ्यांसाठी अडचणीचा ठरतो.

हवामानातील बदल हे संत्रा उत्पादन कमी होण्यास अतिशय महत्त्वाचे कारण आहे. संत्रा अतिशय संवेदनशील पीक आहे. तापमानात अचानक बदल झाला, अवकाळी पाऊस आला, गारपीट झालं की त्याचा विपरीत परिणाम संत्रा उत्पादनावर होतो. तीव्र उष्णतेमुळे संत्रं गळून जातात.मागील काही वर्षांमध्ये संत्र्याच्या झाडावर अनेक रोग जात आहेत. बुरशीजन्य रोगांमुळे संत्र्याचे नुकसान होत आहे. त्याचे योग्य वेळी निदान होत नाही. शेतकऱ्याला त्यावर योग्य मार्गदर्शन मिळत नाही, मग तो कृषी सेवा केंद्रामध्ये धाव घेतो. कीटकनाशक कंपन्यांचे प्रतिनिधी आणि कृषी सेवा केंद्राचे चालक ज्या पद्धतीने मार्गदर्शन करतील अशी औषधे आणि कीटकनाशके फवारतो आणि यामुळे त्याचा खर्च हा सतत वाढत जातो. खते, औषधी, मजुरी, वीज, सिंचनाच्या सुविधा या सतत वाढत आहे. संत्र्याच्या झाडाची देखभाल ही वर्षभर करावी लागते. त्यामुळे उत्पादन खर्च हा वाढतच आहे. एका एकरामध्ये साधारणतः १०० झाडे असतात या १०० झाडांची वर्षभर देखभाल करण्याचा (ज्यामध्ये फवारे, मशागत, खते, सिंचन या सगळ्या गोष्टी) एक लाख रुपये खर्च येतो. त्यामुळे एकरी एक लाख रुपये खर्च हा फक्त निगा राखण्यासाठी जातो, म्हणजे दहा एकर जर संत्र्याची बाग असेल तर त्याला दहा लाख रुपये दरवर्षी खर्च येतो आणि उत्पादनाचा विचार केला तर एकरामध्ये आठ ते दहा टन संत्रा येऊ शकतो. जर भाव निदान ४० रुपये किलो मिळाला तर त्याला खर्च वजा जाऊन पैसे शिल्लक राहतात, परंतु मागील काही वर्षांमध्ये संत्र्याचे भाव हे १५ ते २० रुपये किलो अशा कमी दरामध्ये विकावा लागला. याशिवाय अनियमित वातावरण बदलामुळे त्याचे उत्पादनही कमी झाले. हे सतत चक्र काही वर्षे चालू राहल्यामुळे संत्र्याचे पीक त्यांना परवडत नाही. व्यापारी आणि दलाल जे म्हणतील तोच भाव. शेतकऱ्याला त्याच्या उत्पादनासाठी कोणताही हमीभाव नाही. त्यामुळे संत्रा विक्रीचा हा सर्व व्यवहार आंधळेपणाने चालतो.

संत्र्याच्या झाडांची छाटणी, खुरपी, फवारणी, ओलीत करण्यासाठी मजुरांची गरज असते, परंतु मजूर मिळत नाही. परिणामी मजुरीचा दर वाढल्यामुळे उत्पादन खर्च आणखी वाढतो. हा प्रश्न किचकट असला तरी आणि यावर रामबाण उपाय नसले तरी काही उपाययोजना करणे शक्य आहे.

वीजपुरवठा- शेतकऱ्याला दिवसा पूर्ण क्षमतेने निदान आठ तास सतत वीजपुरवठा होणे अतिशय आवश्यक आहे. कारण संत्रा पिकाला पाणी पाहिजे असते. ठिबक सिंचनाच्या सोयी करणे अतिशय आवश्यक आहे.

रोग आणि कीड नियंत्रणासाठी सतत आणि बांधावर मार्गदर्शन देण्याची गरज आहे. योग्य कीटकनाशके आणि फवारणी यासाठी त्यांना सतत मार्गदर्शनाची गरज भासते. त्यामुळे ग्रामीण भागामध्ये आरोग्याच्या क्षेत्रामध्ये ‘आशा वर्कर’ ज्याप्रमाणे काम करतात त्याचप्रमाणे दर १०० शेतकऱ्यांच्या मागे एक कृषी मित्र असावा. संत्र्याच्या झाडावर काही रोग येत असेल तर त्या कृषी मित्राने कृषी तज्ञाचा सल्ला घेऊन त्यावर येणाऱ्या उपाययोजना शेतकऱ्यांपर्यंत पोहोचाव्या. अशा पद्धतीने कृषी विद्यापीठातील कृषी तज्ञ आणि शेतकरी यांच्यामध्ये जी दरी पडलेली आहे ती या ‘कृषी मित्रा’च्या निमित्ताने भरून निघेल आणि शेतकऱ्याला योग्य मार्गदर्शन मिळेल.



संत्र्याचा विमा – संत्रा पिक विमा सुलभ असावा आणि त्याचा भार शेतकऱ्यावर कसा कमी करता येईल याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. या विमा काढणाऱ्या कंपन्या शेतकऱ्याला भरपाई देण्यामध्ये टाळाटाळ करतात. तापमानाचा ट्रिगर लागूनसुद्धा, पावसाचा ट्रिगर लागूनसुद्धा शेतकऱ्यांना ते भरपाई देत नाहीत. तर त्यासाठी शेतकऱ्याला आंदोलन करावं लागतं. यामुळे पिक विम्याकडे अनेक शेतकरी पाठ फिरवतात आणि पर्यायाने मग नुकसान भरपाई त्यांना मिळत नाही. जर या विमा कंपन्या यांच्यावर सरकारचा अंकुश राहिला तर त्याचा फायदा शेतकऱ्याला होईल.

संत्राच्या व्यापाऱ्यांवर कोणाचेही नियंत्रण उरलेले नाही. त्यामुळे संत्र्याच्या व्यापाराचे नियमन करण्याची गरज आहे. संत्रा व्यापाऱ्यांची नोंदणी करणे आवश्यक आहे. या क्षेत्रामध्ये किती व्यापारी आहेत याची माहिती सरकारला असायलाच पाहिजे. या व्यापाऱ्यांमध्ये काही चुकीच्या बाबी आहेत, ज्या तत्काळ थांबवणे गरजेचे आहे. जसे की शेतकऱ्यांना एक टनामागे एक क्विंटल संत्री फुकट द्यावी लागतात. शंभर कॅरेट संत्रावर दहा कॅरेट फुकट द्यावे लागतात. याला व्यापारी सूट असं म्हणतात. या अशा पद्धतीमुळे शेतकऱ्याचे नुकसान होते. समजा व्यापाऱ्याने एका ठराविक किमतीमध्ये बगीचा विकत घेतला आणि तोडलाच नाही किंवा टाकून दिला, तर याची दाद कुठेही मागता येत नाही. त्यामुळे ग्रामीण भागातील तहसीलदार यांच्या पातळीवर यासाठी काही नियम ठरवून देणे अतिशय आवश्यक झालेले आहे. संत्र्याचा सौदा झाल्यानंतर व्यापाऱ्यांनी शेतकऱ्याला तत्काळ निदान एक तृतीयांश रक्कम दिली पाहिजे आणि उरलेली रक्कम ही संत्र्याची तोड लावण्याचे आधी दिली पाहिजे. जर हा सौदा टणाने किंवा कॅरेटने झाला असेल तर त्याही परिस्थितीमध्ये अंदाजे एक तृतीयांश रक्कम ही सौदा ठरल्याबरोबर दिली गेली पाहिजे आणि उरलेली रक्कम ही संत्रे मोजल्यानंतर शेतकऱ्याला ताबडतोब दिली गेली पाहिजे. आणि असे होत नसेल तर शेतकऱ्याला दाद मागता आली पाहिजे. त्यावर लवकरच निर्णय झाला पाहिजे. कारण शेतकरी कोर्टात जाऊन न्याय मागू शकत नाही.

शेतकऱ्यांना संत्र्याची योग्य कलमे कृषी विद्यापीठांमध्ये संशोधन करून सिडलेस कलमे माफक दरात शेतकऱ्यांना उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.मोर्शी तालुक्यातील हिवरखेड येथे जैन प्रकल्प आणि नागपूर मिहानला पतंजली यांचा संत्रा प्रक्रिया उद्योग याचे उद्घाटन होऊन अनेक वर्षे निघून गेली. परंतु हे प्रकल्प अजूनही सुरू झाले नाहीत. महाराष्ट्रातील एकमेव नांदेड येथे संत्रा प्रक्रिया पेंद्र आहे जर संत्रा प्रक्रिया केंद्रे वाढली तर संत्र्याला भाव येईल. शालेय पोषण आहारामध्ये संत्री, मोसंबी या फळाचा समावेश केला तर या फळांची मागणी वाढू शकते. कोल्ड स्टोरेज, प्रक्रिया उद्योग, निर्यात सुविधा वाढवणे यासारख्या गोष्टी करणे अतिशय आवश्यक आहे. शेतकरी उत्पादक कंपन्या, सहकारी संस्था यांना राजश्रय देऊन त्यांना बळकट करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

**डॉ. आशीष लोहे**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त

### जागतिक योग दिन ७ ठिकाणी आयोजित

**अमरावती**-पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पुढाकाराने २०१५ पासून जगभर २१ जून हा दिवस 'जागतिक योग दिन' म्हणून साजरा करण्यात येतो. या वर्षी १२ व्या जागतिक योग दिनाच्या निमित्ताने भाजप अमरावती शहर जिल्हा तर्फे सर्व ७ मंडळांमध्ये कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. अंबा मंडळ राजकमल चौक येथे सकाळी ७ वाजता, संयोजक हरीहर गिरोळकर, सहसंयोजक मनीष सरवय्या, अंजली पाठक, विकास पंचवटे. समन्वयक विनोद ठोसर. साई मंडळ न्यू प्रभात कॉलोनी बगीचा येथे सकाळी ७वाजता, संयोजक राजेश कितुकले, जोस्ना शेटे, वंदना हरणे. समन्वयक भारती गुहे. बडनेरा मंडळ - मनपा शाळा, जुनी वस्ती येथे सकाळी ७वाजता, संयोजक प्रीती वाकेकर, सह संयोजक उपमा देवडा, किरण भगत, समन्वयक उमेश निलगिरे,विद्यापीठ मंडळ - वडाळी बगीचा येथे सकाळी ७ वाजता, संयोजक प्रफुल बोके, सह संयोजक संजय चव्हाण, भय्यासाहेब तिरपुडे. समन्वयक प्रफुल बोके. संत गाडगे बाबा मंडळ -स्वामी विवेकानंद थीम पार्क, कठोरा नाका येथे सकाळी ७ वाजता, संयोजक रिता मोकलकर, सह संयोजक अभिजीत वानखडे, अमोल आगरकर.स्वामी विवेकानंद मंडळ नारायण नगर बगीचा येथे सकाळी ७ वाजता, संयोजक बरखा भोज्जे, सह संयोजक माया कांबळे, ऋषिकेश ठेलकर. समन्वयक संतोष कावरे.कॉटन मार्केट मंडळ - सहकार नगर येथे सकाळी ७ वाजता, संयोजक कौशिक अग्रवाल, सह संयोजक सुशिल साहू, प्रमोद राऊत. समन्वयक सचिन नाईक.या सर्व कार्यक्रमांना शहर जिल्हा अध्यक्ष डॉ. नितीन धांडे, महापौर तेजवानी असतील.



### खरीपपूर्व नियोजन सभा; आधुनिक शेती तंत्रज्ञानावर मार्गदर्शन

**आसेगाव पूर्णा-** तालुका कृषी अधिकारी कार्यालय, अचलपूर यांच्या वतीने सावळापूर येथे १७ जून रोजी आगामी खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर खरीपपूर्व नियोजन व मार्गदर्शन सभेचे आयोजन करण्यात आले होते.सभेत शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञान, बीजप्रक्रिया, खत व्यवस्थापन आणि कीड नियंत्रणाबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.सभेला सहाय्यक तंत्रज्ञान व्यवस्थापक निशांत इंगळे, सहाय्यक कृषी अधिकारी भागवत सोमटकर, उपकृषी अधिकारी अतुल हूड तथा तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक शीतल धुळे यांनी मार्गदर्शन केले.यावेळी सोयाबीन बीज उगवण क्षमता तपासणी, जिवाणू संवर्धकाद्वारे बीजप्रक्रिया, 'अल निनो'मुळे बदलणाऱ्या हवामानानुसार पेरणीचे नियोजन, बीबीएफ (रुंद वरंबा सरी) व पट्टा पेरणी पद्धतीचे फायदे याविषयी माहिती देण्यात आली. तसेच माती परीक्षणावर आधारित खतांचा संतुलित वापर, हुमणी अळी नियंत्रणासाठी जैविक व रासायनिक उपाययोजना, तसेच शून्य मशागत व फळबाग लागवडीचे महत्त्वही शेतकऱ्यांना पटवून देण्यात आले. सभेला सावळापूर व परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित शेतकऱ्यांनी विविध शंकांचे कृषी अधिकाऱ्यांकडून निरसन करून घेतले. आगामी खरीप हंगाम यशस्वी करण्यासाठी या मार्गदर्शनाचा लाभ होणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

### श्री.स्वामी समर्थ सेवा केंद्रात भागवत कथा

**अमरावती-**श्री स्वामी समर्थ आध्यात्मिक विकास व बालसंस्कार केंद्र, रहाटगाव,अमरावती च्या वतीने अधिक मासानिमित्त संगीतमय श्रीमद् भागवत कथेचे आयोजन करण्यात आले होते. ही कथा श्रीमद् भागवताचार्य, वाणीभूषण गुरुवर्य ह.भ.प श्री आकाश लक्षणे महाराज यांच्या सुमधुरवाणीतून करण्यात आली होती.श्रीमद् भागवत कथेचे मानवी जीवनात महत्त्व त्यांनी सखोल समजावून सांगितले त्यानंतर भगवान श्रीकृष्णाचे १६,१०८ विवाह कथा, सुदामा ब्राह्मण कथा सांगून भागवत कथा कशी महत्त्वाची आहे. यावर त्यांनी प्रकाश टाकला. टाळ मृदुंग च्या गजरात भव्य महाआरती यावेळी करण्यात आली.या भागवत कथेला परिसरातील नागरिक, तसेच सर्व भाविक भक्त मंडळी रोज उपस्थित राहून भागवत कथेचा लाभ घेतला. शेवटी काला,व महाप्रसादाने सप्ताहाची सांगता करण्यात आली. कार्यक्रमात श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र रहाटगाव येथील विश्वस्त मंडळींनी कार्यक्रम उत्तम पद्धतीने कसा साजरा करण्यात येईल याकरिता अथक परिश्रम घेतले.



### पांढरे डिजिटल लाईट ठरत आहे अपघाताला कारण

**अंजनगाव बारी-** बडनेरा रोड परिसरात रात्रीच्या वेळी अनेक चारचाकी व दुचाकी वाहनांवर लावण्यात आलेले पांढरे डिजिटल, एलईडी व शोभेचे प्रखर लाईट्स इतर वाहनचालकांसाठी मोठा धोका ठरत असल्याचे चित्र समोर आले आहे. या तीव्र प्रकाशामुळे समोरून येणाऱ्या वाहनचालकांचे डोळे दिपून जात असून अपघाताचा धोका वाढत आहे. वाहनांवर नियमबाह्य पद्धतीने बसविण्यात आलेले हाय-पॉवर लाईट्स आणि डिजिटल प्रकाशयंत्रणा रात्रीच्या प्रवासात अडथळा निर्माण करत आहेत. विशेषतः ग्रामीण भागातील रस्त्यांवर या समस्येची तीव्रता अधिक जाणवत असून अनेक वेळा वाहनचालकांना रस्त्याचा अंदाज घेणे कठीण होत असल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे. स्थानिक नागरिकांनी या प्रकाराबाबत तीव्र आक्षेप नोंदवित आरटीओ विभाग, वाहतूक पोलीस व संबंधित प्रशासनाने विशेष मोहीम राबवून नियमबाह्य लाईट्सवर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. तसेच वाहनचालकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने रात्रीच्या वेळी अशा प्रखर पांढऱ्या डिजिटल लाईट्सवर तातडीने निर्बंध आणावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.संबंधित विभागाने या गंभीर बाबीकडे लक्ष देऊन त्वरित उपाययोजना करावी, अन्यथा भविष्यात मोठ्या अपघातांना निमंत्रण मिळू शकते, अशी भीती नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे.



# रोजच्या त्रासातून शिक्षकांची झाली सुटका

## शालेय स्तरावर माहिती देण्याचा वार फक्त शनिवार; निर्णयाबद्दल होतेय शिक्षकवृंदाकडून समाधान

**अमरावती/का.प्र.**

वरिष्ठ पातळीवरून सातत्याने दिवसभरात विविध प्रकारची माहिती शालेय शिक्षकांकडून मागविली जाते. त्यामुळे शिक्षकांना अध्ययन करण्यास वेळ मिळत नसल्याच्या तक्रारी गेल्या अनेक वर्षापासून सातत्याने होत आहेत. शिक्षकांना शैक्षणिक कार्यापेक्षा अशैक्षणिक कामेच अधिक करावी लागत असल्याची ओरड सर्व स्तरातून होत असली तरी याकडे फारसे कुणीच लक्ष देत नसल्याने शिक्षक हैराण झाले होते. या साऱ्या बाबींचा विचार करून शासनाने आता 'माहितीचा वार शनिवार' ठेवण्याचे निश्चित केल्याने शिक्षकांना मोठाच दिलासा मिळणार आहे. या निर्णयामुळे वरिष्ठ पातळीवरून शालेय स्तरावर मागितलेली ऑनलाइन / ऑफलाइन माहिती दररोज द्यावी लागणार नसून ही माहिती आठवड्यातून एकदाच शनिवारी देण्याचे स्पष्ट आदेश राज्याचे शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह यांनी सर्व विभागीय उपसंचालक, शिक्षणाधिकारी आणि संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत.

काही जिल्ह्यांत केला प्रयोग सद्यस्थितीत केंद्र शासनाच्या / राज्य शासनाच्या विविध उपक्रमांचा अहवाल ऑनलाइन ऑफलाइन स्वरूपात शाळा स्तरावरून द्यावा लागतो. तसेच जिल्हास्तर / तालुकास्तर / केंद्रस्तरावरही माहिती शाळांना द्यावी लागते. यामुळे शिक्षकांचा अध्ययन /अध्यापनाचा वेळ माहिती तयार करण्यात व ऑनलाईन स्वरूपात माहिती सादर करण्यात जात असल्याचे निदर्शनास आले आहे.



प्राथमिक शिक्षण संचालनालयामार्फत राज्यातील पन्हाळा, जिल्हा कोल्हापूर, आष्टी, जिल्हा बीड, अक्कलकुवा, जिल्हा नंदुरबार, एटापल्ली, जिल्हा गडचिरोली या तालुक्यातील प्रत्येकी एका केंद्रामध्ये 'माहितीचा वार शनिवार' या उपक्रमाची पथदर्शी स्वरूपात अंमलबजावणी करण्यात आली.यामध्ये आठवड्याभरात जी काही माहिती ऑनलाइन / ऑफलाईन स्वरूपात मागवली होती ती सर्व माहिती दर शनिवारी सादर करण्याबाबत कळवले होते.

या पथदर्शी अभ्यासक्रमांचे या उपक्रमात सहभागी असलेल्या ९० टक्के शिक्षकांनी स्वागत केले, तर ९६ टक्के शिक्षकांनी शिकवण्यासाठी यामुळे पुरेसा वेळ मिळाल्याचे मत नोंदवले. 'माहितीचा वार शनिवार' ठेवल्यामुळे सतत माहिती भरण्याच्या कटकटीतून काही प्रमाणात शिक्षकांची सुटका झाली. शिवाय शिक्षकांना वर्गातील अध्यापनासाठी अधिक वेळ मिळाला विद्यार्थाशी अधिक संवाद साधण्याची संधी मिळाली. या सर्व बाबींचा विचार करून शिक्षकांचा दैनंदिन अध्ययन अध्यापनाचा वेळ माहिती सादर करण्यात जाऊ नये यासाठी हा निर्णय जारी केला आहे.याची अंबलबजावणी कीती टक्के यशस्वी होते ते येणारा काळाच ठरवेल पण दररोजच्या माहीती पासुन सुटका होईल असे वाटते.

शालेय शिक्षण विभागाची येणारी ऑनलाईन व ऑफलाईन माहिती दर शनिवारी सादर करण्याचा घेतलेला निर्णय अत्यंत स्वागतार्ह आहे. या निर्णयामुळे शिक्षकांना वारंवार माहिती संकलन व सादरीकरणाच्या कामातून दिलासा मिळणार आहे. परिणामी त्यांचा अधिक वेळ अध्यापन, विद्यार्थ्यांशी संवाद आणि गुणवत्तावाढीच्या उपक्रमांसाठी उपलब्ध होईल.

**राजेश सावरकर**

## आपले सरकार' तक्रारींबाबत जिल्हा परिषदेचा दणका

**टाकरखेडासंभू/ वार्ताहर**

'आपले सरकार' व पीजी पोर्टलवर दाखल झालेल्या आणि जिल्हा परिषद स्तरावर एस्कलेट झालेल्या ग्रामपंचायत संबंधित तक्रारी गांभीर्याने घेत जिल्हा परिषदेने तिवसा, भातकुली आणि चांदूर बाजार पंचायत समित्यांना संबंधितांची प्रत्यक्ष सुनावणी घेऊन प्रकरणे तातडीने निकाली काढण्याचे आदेश दिले आहेत.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) बालासाहेब बायस यांनी १६ जून रोजी यासंदर्भात पत्र जारी केले आहे. ग्रामपंचायतींशी संबंधित अनेक तक्रारी पंचायत समिती स्तरावर निकाली न निघाल्याने तक्रारदारांनी त्या जिल्हा परिषद स्तरावर एस्कलेट केल्या होत्या. त्यामुळे संबंधित गटविकास अधिकाऱ्यांनी स्वतः सुनावणी घेऊन तक्रारींचा निष्कर्ष काढावा आणि त्यानुसार तात्काळ कार्यवाही करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत.

जिल्हा परिषदेकडून तिवसा, भातकुली आणि चांदूर बाजार पंचायत समिती क्षेत्रातील एकूण आठ तक्रारींचा आढावा घेण्यात आला आहे. यामध्ये आखतवाडा (ता. तिवसा), भातकुली, फुभगाव, चिचोली काळे, बोराळा आणि कोतगावंडी पूर्णा (ता. चांदूर बाजार) येथील तक्रारदारांच्या प्रकरणांचा समावेश आहे.संबंधित तक्रारींची सुनावणी करून योग्य ती कार्यवाही करण्यात यावी, कार्यवाहीचा अहवाल जिल्हा परिषदेला सादर करावा तसेच तक्रारदारांनाही त्याबाबत माहिती द्यावी, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे. याशिवाय ही प्रकरणे पुन्हा वरिष्ठ स्तरावर एस्कलेट होणार नाहीत, याची गांभीर्याने दक्षता घेण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.ग्रामपंचायत प्रशासनातील प्रलंबित तक्रारींना गती देण्यासाठी जिल्हा परिषदेने उचललेले हे पाऊल महत्त्वाचे मानले जात असून, संबंधित तक्रारदारांना न्याय मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## तुकाराम मुंढेंचा धसका चांदूर रेल्वेलाही
## सलग दुसऱ्या दिवशी अनेक पानटपरी बंद

**चांदूर रेल्वे/ वार्ताहर**

राज्यात अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी भेसळयुक्त अन्नपदार्थाविरोधात सुरू केलेल्या धडक कारवाईमुळे राज्यभरात अन्न व्यवसायिकांमध्ये खळबळ उडाली आहे. या कारवाईचे पडसाद आता चांदूर रेल्वे शहरातही उमटतांना दिसत असून, सलग दुसऱ्या दिवशी शहरातील अनेक पानठेले बंद असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

मंगळवारपासून सुरू झालेली ही परिस्थिती बुधवारीही कायम राहिली. शहरातील प्रमुख चौकांमधील अनेक पानठेले उघडलेच नसल्याने नागरिकांमध्ये विविध चर्चांना उधाण आले आहे. काहींनी ही बाब अन्न व औषध प्रशासनाच्या धडक मोहिमेशी जोडली असून, कारवाईच्या भीतीने अनेक व्यावसायिकांनी स्वखुशीने दुकाने बंद ठेवल्याची चर्चा सुरू आहे.याशिवाय, काही डेअरी आणि किरकोळ दुकानांमध्ये खुल्या स्वरूपातील पनीरची विक्री कमी झाल्याचेही दिसून येत आहे. दरम्यान, चांदूर रेल्वे शहरातील पानठेले नेमक्या कोणत्या कारणामुळे बंद आहेत, याबाबत कोणतीही अधिकृत माहिती उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे या प्रकारामागे प्रशासनाच्या कारवाईची भीती आहे की अन्य काही कारण, याबाबत तर्क-वितर्कांना उधाण आले आहे. अन्नपदार्थांच्या गुणवत्तेबाबत प्रशासनाने कठोर भूमिका घेतल्याने नागरिकांनीही सुरक्षित व दर्जेदार खाद्यपदार्थांनाच प्राधान्य द्यावे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. दरम्यान, पानठेले व्यावसायिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, सलग दोन दिवस दुकाने बंद राहिल्याने अनेक लहान व्यावसायिकांवर उपासमारीची वेळ येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. व्यावसायिकांचे म्हणणे आहे की, अन्न व औषध प्रशासनाने कारवाई करतांना छोट्या पानठेलेधारकांवर लक्ष केंद्रित न करता भेसळयुक्त किंवा निकृष्ट दर्जाचे अन्नपदार्थ तयार करणाऱ्या मोठ्या कंपन्या आणि उत्पादकांवर कठोर कारवाई करावी, त्यामुळे भेसळीच्या मूळ स्रोतांवर आळा बसेल, अशी त्यांची अपेक्षा आहे.

# अल निनो : संकटाचा सामना शेतकऱ्यांची सतर्कता आवश्यक



'अल निनो ' हा शब्द महाराष्ट्रातील तमाम शेतकऱ्यांनी समजून घेणे आवश्यक आहे.अल निनो हे एक वातावरणीय संकट असून आता या संकटाच्या आम्ही जवळ असून याचा सर्वाधिक परिणाम जून मध्ये मृग आणि रोहिणी नक्षत्रावर झाला आहे. तो पुढेही होऊ शकतो. त्यामुळे या लेखात, चला! 'अल निनो या वातावरणातील बदलाच्या संकटाला सोप्या भाषेत समजून घेऊया!

हवामान बदल, वाढते तापमान, अनियमित पर्जन्यमान आणि नैसर्गिक आपत्ती यामुळे शेती क्षेत्रासमोर नवी आव्हाने उभी राहत आहेत. या आव्हानांमध्ये 'अल निनो ' ही जागतिक हवामानाशी संबंधित घटना विशेष महत्त्वाची मानली जाते. जागतिक हवामान संघटना (WMO), भारत हवामान विभाग (IMD), संयुक्त राष्ट्रांची अन्न व कृषी संघटना (FAO) आणि विविध संशोधन संस्थांच्या अभ्यासानुसार अल निनोचा प्रभाव केवळ हवामानापुरता मर्यादित राहत नाही, तर त्याचा परिणाम शेती, जलसंपदा, पशुधन, आरोग्य, जैवविविधता आणि अर्थव्यवस्थेवरही होतो. त्यामुळे या घटनेचे स्वरूप समजून घेणे आणि त्यासाठी पूर्वतयारी करणे अत्यंत आवश्यक आहे.

**अल निनो म्हणजे काय?**

अल निनो हा स्पॅनिश शब्द असून त्याचा अर्थ लहान मुलगा असा होतो. वैज्ञानिक भाषेत सांगायचे झाल्यास, प्रशांत महासागराच्या मध्य आणि पूर्व भागातील समुद्रपृष्ठाचे तापमान सरासरीपेक्षा जास्त वाढते, तेव्हा अल निनो स्थिती निर्माण होते. ही घटना ENSO (El Niño Southern Oscillation) या जागतिक हवामान प्रणालीचा भाग आहे.आता हे कसे होते हे जाणून घेऊया ! समुद्रातील तापमानातील या बदलांमुळे जगभरातील वाऱ्यांचे प्रवाह, ढगांची निर्मिती आणि पर्जन्यमानाचे स्वरूप बदलते. त्यामुळे काही भागात दुष्काळ, तर काही भागात अतिवृष्टीसारख्या घटना घडू शकतात.

**अल निनो दरवर्षी येतो का?**

नाही. जागतिक हवामान संघटनेच्या माहितीनुसार अल निनो साधारणतः दर दोन ते सात वर्षांनी उद्भवतो. त्याचा कालावधी साधारण नऊ महिने ते एक वर्ष किंवा काही वेळा त्याहून अधिक असू शकतो. प्रत्येक अल निनोची तीव्रता आणि परिणाम सारखेच असतील असे नाही.

**भारतावर यापूर्वी काय परिणाम झाला?**

भारतातील शेतकरी, पर्यावरण तज्ञ, जलतज्ञ, वनतज्ञ, कृषी तज्ञांसाठी अल निनो हा शब्द आता अपरिचित राहिलेला नाही. भारतातील मान्सून आणि अल निनो यांचा संबंध अनेक दशकांपासून अभ्यासला जात आहे. १९८२, १९८७, २००२, २००९ आणि २०१५ या वर्षांमध्ये भारताने कमी पावसाचा अनुभव घेतला होता. विशेषतः २००२ आणि २००९ मध्ये देशातील अनेक भागांत दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली होती. त्यामुळे गेल्या वर्षी जसा तुफान पाऊस झाला किंवा त्या वर्षापूर्वीही जसा पूरक पाऊस झाला तसा पाऊस यावर्षी नाही ही गोष्ट अगदी स्पष्ट आहे.तथापि, हवामान तज्ञ स्पष्ट करतात की प्रत्येक अल निनो वर्षात दुष्काळ पडेलच असे नाही. भारतीय महासागरातील तापमान, अरबी समुद्रातील स्थिती, बंगालच्या उपसागरातील कमी दाबाची क्षेत्रे आणि इतर हवामान घटकही मान्सूनवर प्रभाव टाकतात.

**हवामान तज्ञांचे काय मत आहे?**

जागतिक हवामान संघटना (WMO), भारत हवामान विभाग (IMD), संयुक्त राष्ट्रांची अन्न व कृषी संघटना (FAO) आणि इतर संशोधन संस्थांच्या मते अल निनो हा जागतिक हवामान व्यवस्थेतील नैसर्गिक भाग आहे. मात्र जागतिक तापमानवाढीमुळे त्याचे परिणाम अधिक तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.हवामान तज्ञांच्या मते, अल निनोमुळे जागतिक सरासरी तापमान वाढू शकते. उष्णतेच्या लाटांची तीव्रता वाढू शकते. काही भागात दुष्काळ तर काही भागात अतिवृष्टी होऊ शकते. अन्नसुरक्षा आणि जलसुरक्षेवर परिणाम होऊ शकतो. अशा परिस्थितीत पेरणीच्या नियोजनासाठी हवामान अंदाजांचे महत्त्व अधिक वाढते.

**'अल निनो'परिणाम रोखण्यासाठी प्रयत्न**

अल निनो ही नैसर्गिक महासागरीय घटना आहे, त्यामुळे यावर्षी अनेक बाबतीत अनियमितता घडू शकते. अशा परिस्थितीत परिणामांची तीव्रता कमी करण्यासाठी विविध उपाययोजना केल्या जातात. साधारणत: अशावेळी शासन स्तरावर हवामानाचा सतत अभ्यास आणि पूर्वसूचना प्रणाली विकसित व कार्यक्षम केली जाते, जलसंधारण प्रकल्प राखीव ठेवले जातात. पीक विमा योजनेचा लाभ घेण्याचे सुचविले जाते. दुष्काळ व्यवस्थापन आराखडे तयार केले जातात, सूक्ष्म सिंचनाला प्रोत्साहन दिले जाते, हवामान आधारित कृषी सल्ला सेवा दिली जाते, बियाणे व चारा उपलब्धतेचे नियोजन करणे, जलाशय व्यवस्थापन आणि पिण्याच्या पाण्याचे नियोजन या काळात शासनामार्फत केले जाते.

**शेतकऱ्यांनी काय करावे**

शासन स्तरावर हे सर्व निर्णय घेतले जात असताना आपल्या शेतकऱ्यांनी या परिस्थितीत काय करावे यासंदर्भात कृषी तज्ञांनी मार्गदर्शन केले आहे. कृषी तज्ञांच्या मते अल निनोच्या संभाव्य परिणामांचा विचार करून शेतकऱ्यांनी पुढील बाबींकडे लक्ष देणे आवश्यक आहे

१. हवामान अंदाजांवर लक्ष ठेवावे

भारत हवामान विभाग आणि कृषी विभागाच्या अधिकृत सूचनांचे पालन करावे.

२. पीक निवडीचे नियोजन करावे

कमी कालावधीत येणारी आणि कमी पाण्यात तग धरणारी पिके निवडण्याचा विचार करावा.

३. जलसंधारणाला प्राधान्य द्यावे

शेततळे, बांधबंदिस्ती, पावसाचे पाणी साठवणे, चर निर्माण करणे, शेत व शेत रस्त्याच्या मध्ये पाणी साठवणे, ओलसरपणा राहिली, मूलस्थानी जलसंधारणासाठी प्रयत्न करणे.

४. उपलब्ध जलस्तोत्रातून फक्त सूक्ष्म, ठिबक आणि तुषार सिंचनाद्वारे पाण्याचा कार्यक्षम वापर करणे.

५. पीक विमा घ्यावा

नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या नुकसानीपासून आर्थिक संरक्षण मिळण्यासाठी हे सर्वात आवश्यक आहे.

६. पशुधन व्यवस्थापन

चारा आणि पाण्याची उपलब्धता याचे पूर्वनियोजन करणे आवश्यक आहे.

७. सर्वात महत्त्वाचे म्हणजे कृषी विभागाने सांगितल्याशिवाय पेरणी न करणे कारण या परिस्थितीत दुबार, तिबार पेरणीची शक्यता असते.

**सामान्य नागरिकांनी काय करावे?**

अल निनोचा परिणाम केवळ शेतकऱ्यांवरच होतो असे नाही. तर या वातावरणाच्या बदलातून सर्वसामान्य प्रत्येक नागरिकाला जावे लागणार आहे. त्यामुळे हा अल निनो काय हे प्रत्येकाने जाणून घेणे आवश्यक आहे. सामान्य नागरिकांनी अशा परिस्थितीत, पाण्याची बचत करावी,वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन करावे. स्थानिक जलस्रोतांचे संरक्षण करावे. उष्णतेच्या लाटांपासून बचावासाठी आवश्यक काळजी घ्यावी. पर्यावरणपूरक जीवनशैलीचा अवलंब करावा.

**कोणत्या देशांवर अल निनोचा प्रभाव?**

अल निनोचा प्रभाव जागतिक स्वरूपाचा असतो. विशेषतः खालील देश यावर्षी अधिक प्रभावित होणार आहे. यामध्ये भारत, ऑस्ट्रेलिया, इंडोनेशिया, अमेरिका, ब्राझील, दक्षिण आफ्रिकेतील काही देश, फिलिपाईन्स, पॅसिफिक महासागरातील बेट राष्ट्रे यांच्यावर अधिक संकट कोसळू शकते. काही भागात दुष्काळ, काही भागात पूर आणि काही ठिकाणी समुद्री परिसंस्थांवर परिणाम दिसून येतो.

**कोणती राज्ये अधिक संवेदनशील?**

अल निनोच्या काळात पावसातील तफावत सर्वाधिक जाणवणाऱ्या राज्यांमध्ये महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा, आंध्र प्रदेश, राजस्थान, गुजरात, मध्य प्रदेश आणि छत्तीसगड यांचा उल्लेख केला जातो. तथापि, प्रत्येक वर्षी परिस्थिती वेगळी असू शकते. त्यामुळे या प्रदेशावर अधिक लक्ष भारतीय हवामान खात्याने केले असून त्या दृष्टीने नियोजन सुरू आहे.

**मृग नाही म्हणजे अल निनोचा प्रभाव काय**

हे उत्तर सध्या नाही असे आहे. कारण भारतात अनेक वेळा उशिरा पावसाला सुरुवात होते. भारतीय हवामान विभागाच्या मते मान्सूनचे आगमन आणि त्यातील खंड अनेक घटकांवर अवलंबून असतात. अरबी समुद्रातील परिस्थिती, बंगालच्या उपसागरातील कमी दाबाची क्षेत्रे, पश्चिमी वारे, स्थानिक तापमान आणि इतर महासागरीय घटक यांचाही प्रभाव असतो.म्हणूनच जून महिन्यात काही दिवस पाऊस उशिरा येणे किंवा खंड पडणे यामागे केवळ 'अल निनो 'च कारणीभूत आहे, असे निश्चितपणे म्हणता येत नाही. तथापि यासंदर्भात हवामान शास्त्रज्ञांनी यावर्षी पाऊस उशिरा होईल अशी सूचना केली आहे. 'अल निनो' च्या प्रभावाबाबत काही कालावधीनंतर हवामान खाते मत व्यक्त करणार आहे तथापि,पाऊस उशिरा येणार हे निश्चित.त्यामुळे,अधिकृत हवामान विभागाच्या निरीक्षणांवर विश्वास ठेवणे आवश्यक आहे.

**शासनाच्या उपाय योजना**

महाराष्ट्र शासनाने जलयुक्त शिवार, जलसंधारण प्रकल्प, सूक्ष्म सिंचन प्रोत्साहन, पीक विमा, हवामान आधारित कृषी सल्ला आणि दुष्काळ व्यवस्थापन यांसारख्या उपाययोजनांवर भर दिला आहे. शासन सातत्याने हवामान परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे. राज्य शासनाने संभाव्य जल संकटामुळे धरणातील पाणी पिण्यासाठीच राखीव ठेवण्याची महत्त्वाची सूचना केली आहे. सिंचनासाठी पाणी उपसा बंदी लागू केली आहे. धरणातून कालव्यातून नद्या आणि तलावांमधून होणाऱ्या अधिक अनधिकृत व बेकायदेशीर पाणी उपसा तातडीने बंद करण्याचे निर्देश दिले आहे. तसेच वेळोवेळी आवश्यकतेनुसार जिल्हास्तरावर मार्गदर्शक सूचना जारी करण्यात येणार आहे.

**मुख्यमंत्र्यांकडून शेतकऱ्यांना सूचना**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यासंदर्भात हवामान विभाग व राज्याच्या व केंद्राच्या कृषी विभागाशी सल्लामसलत करून शेतकऱ्यांसाठी पेरणीची घाई न करण्याच्या संदेश दिला आहे. अल निनो मुळे पावसात खंड पडू शकतो. त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये, कृषी विभागाच्या सल्ल्यानेच पेरणी करावी, अशी सूचना त्यांनी केली आहे. शेतकऱ्यांनी घाबरून न जाता अधिकृत हवामान अंदाज, कृषी विद्यापीठांचे मार्गदर्शन आणि कृषी विभागाच्या सूचनांच्या आधारे निर्णय घेण्याचे आवाहन केले आहे.

थोडक्यात,अल निनो ही जगभर परिणाम घडवणारी नैसर्गिक हवामान घटना असली तरी ती अटळ संकट नाही. विज्ञानाधारित नियोजन, अचूक हवामान अंदाज, जलसंधारण, आधुनिक शेती तंत्रज्ञान आणि शासन-जनसहभाग यांच्या मदतीने तिच्या परिणामांची तीव्रता मोठ्या प्रमाणात कमी करता येते. शासनाकडून होणाऱ्या वेळोवेळी सूचना भीती निर्माण करण्यासाठी नाहीत. तर जागरूकता वाढविण्याची आहे. शाश्वत जलव्यवस्थापन, पर्यावरण संरक्षण आणि हवामान अनुकूल शेती हीच अल निनोसारख्या आव्हानांना सामोरे जाण्याची सर्वात प्रभावी दिशा ठरू शकते. त्यामुळे शेतीच्या कोणत्याही कामाला सुरुवात करण्यापूर्वी कृषी विभागाच्या व हवामान विभागाच्या सूचनांचे पालन करणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांनी त्यासाठी सतर्क असणे सर्वात महत्त्वाचे आहे.

**प्रवीण टाके**
उपसंचालक (माहिती)
विभागीय माहिती
कार्यालय, कोल्हापूर
**मो.९७०२८५८७७७**

# अकोलखेड घरफोडीचा छडा ; अट्टल चोरट्याला ठोकल्या बेड्या

## ४.२० लाखांचा मुद्देमाल जप्त ; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई



■ प्रतिनिधी | अकोला ■

अकोट तालुक्यातील अकोलखेड येथे झालेल्या धाडसी घरफोडीचा छडा लावण्यात स्थानिक गुन्हे शाखेला उल्लेखनीय यश आले आहे. अवघ्या काही दिवसांत तपासाची सूत्रे हातात घेत पोलिसांनी अट्टल चोरट्याला अटक केली असून त्याच्याकडून ४ लाख २० हजार ६०० रुपयांचा सोन्या-चांदीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. चोरी केलेले दागिने वितळवून तयार करण्यात आलेली सोन्याची लगडी आणि चांदीचा गोळा पोलिसांनी हस्तगत केला.

अकोट ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील अकोलखेड येथील रहिवासी देवानंद मधुकर फरकाडे यांच्या बंद घरात १० जून २०२६ रोजी सकाळी ६ ते सायंकाळी ५ वाजेदरम्यान अज्ञात चोरट्याने घरफोडी केली होती. चोरट्याने घराच्या आवाराच्या भिंतीवरून आत प्रवेश करून स्टोअर रूमची खिडकी, लोखंडी ग्रील आणि प्लायवूड काढले. त्यानंतर किचन व बेडरूमचे कुलूप तोडून घरात प्रवेश करत लोखंडी कपाट फोडले आणि त्यातील सोन्याची नथ, पेंडल, डोरले, अंगठ्या, कानातील टॉप्स तसेच चांदीच्या तोरड्या असा मौल्यवान ऐवज लंपास केला होता.

या घटनेनंतर अकोट ग्रामीण पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. जिल्ह्यातील घरफोडी आणि चोरीच्या गुन्ह्यांचा तातडीने छडा लावण्याचे आदेश पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी दिल्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेने समांतर तपास सुरू केला.

तपासादरम्यान मिळालेल्या गुप्त माहितीनुसार रवी ऊर्फ नारायण रामदास डाबेराव (वय ३६, रा. गणेश नगर, चोहट्टा बाजार) याने हा गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने चोहट्टा बाजार येथे सापळा रचून आरोपीला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्याने गुन्ह्याची कबुली दिली.आरोपीने चोरीतील दागिने वितळवून २६.२४० ग्रॅम वजनाची सोन्याची लगडी आणि ६४ ग्रॅम वजनाचा चांदीचा गोळा तयार केल्याचे उघड झाले. पोलिसांनी पंचनामा करून ४ लाख ४ हजार रुपयांची सोन्याची लगडी व १६ हजार ६०० रुपयांचा चांदीचा गोळा असा एकूण ४ लाख २० हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. आरोपीसह जप्त मुद्देमाल पुढील तपासासाठी अकोट ग्रामीण पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आला आहे. घरफोडीच्या गंभीर गुन्ह्याचा अल्पावधीत छडा लावत चोरीचा मुद्देमाल जप्त करण्यात स्थानिक गुन्हे शाखेने दाखविलेली तत्परता आणि तपास कौशल्य पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

> **पथकाच्या अथक परिश्रमांना यश**
>
> पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक नितीन लेव्हरकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. या कारवाईत सहायक पोलीस निरीक्षक आशिष देशमुख, गोपाल जाधव, पोलीस उपनिरीक्षक माजिद पठाण, पोलीस अंमलदार शेख हसन, रवि खंडारे, अब्दुल माजिद, वसीमोद्दीन, महेंद्र मलीये, किशोर सोनुने, स्वप्नील खेडकर, सुल्तान पठाण, श्रीकांत पातोंड, अमोल दिपके, देवानंद खरात यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच चोहट्टा बाजार पोलीस चौकीचे अंमलदार विनोद गोलाईत यांनी आरोपीला ताब्यात घेण्यासाठी महत्त्वपूर्ण मदत केली.

# रामदास मठ–मारोती मंदिर संस्थानची जागा अतिक्रमणमुक्त

### मनपाची धडक कारवाई ; चार अनधिकृत दुकाने जमीनदोस्त



■ प्रतिनिधी | अकोला ■

शहरातील धार्मिक व सार्वजनिक संस्थांच्या मालमत्तांवर डोळा ठेवून अतिक्रमण करणाऱ्यांविरोधात अकोला महानगरपालिकेने पुन्हा एकदा कठोर भूमिका घेतली आहे. उत्तर झोन अंतर्गत आकोट फैल परिसरातील रामदास मठ व मारोती मंदिर संस्थानच्या मालकीच्या जागेवर उभारण्यात आलेल्या चार अनधिकृत दुकानांवर गुरुवारी मनपाने बुलडोझर चालवत ती जागा अतिक्रमणमुक्त केली.

गेल्या काही वर्षांपासून संबंधित जागेवर काही दुकानदारांनी अनधिकृतपणे बांधकाम करून संस्थानची मालमत्ता गिळंकृत करण्याचा प्रयत्न सुरू केला होता. याबाबत संस्थानच्या पदाधिकाऱ्यांसह स्थानिक नागरिकांनी वारंवार महानगरपालिकेकडे तक्रारी करून अतिक्रमण हटविण्याची मागणी केली होती. या तक्रारींची दखल घेत मनपा प्रशासनाने संबंधितांना मालकी व बांधकामासंदर्भातील वैध कागदपत्रे सादर करण्याची नोटीस बजावली होती. मात्र, कोणत्याही अतिक्रमणधारकाकडून समाधानकारक कागदपत्रे सादर करण्यात आली नाहीत. त्यानंतर उत्तर झोन प्रशासनाने नियोजनबद्ध पद्धतीने कारवाईचा निर्णय घेतला. सहाय्यक आयुक्त गणेश शहाणे यांच्या मार्गदर्शनाखाली व सहाय्यक आयुक्त विठ्ठल देवकते यांच्या उपस्थितीत गुरुवारी पोलीस बंदोबस्तात ही मोहीम राबविण्यात आली. यावेळी चार अनधिकृत दुकाने हटवून संस्थानची जागा मोकळी करण्यात आली.

केवळ दुकानेच नव्हे तर परिसरातील व्यावसायिकांनी सार्वजनिक जागांवर उभारलेले टीनशेड, ओटे तसेच अतिक्रमणाच्या स्वरूपात ठेवण्यात आलेल्या चारचाकी वाहनांवरही मनपाने कारवाई केली. या धडक मोहिमेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून अतिक्रमण धारकांमध्ये धास्तीचे वातावरण निर्माण झाले आहे. या कारवाईत आकोट फैल पोलीस ठाण्याचे ठाणेदार रहीम शेख, कनिष्ठ अभियंता नरेश कोपेकर, पियूष बंगाले, पोलीस कर्मचारी ज्ञानेश्वर गिते, आलीम काजी यांच्यासह पोलीस पथक आणि उत्तर झोन कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी सहभागी झाले होते. महानगरपालिका प्रशासनाने शहरातील सार्वजनिक, धार्मिक आणि शासकीय जागांवरील अतिक्रमणांविरोधात यापुढेही अशाच कठोर कारवाया सुरू राहतील, असा स्पष्ट इशारा दिला आहे. त्यामुळे बेकायदा बांधकामे व अतिक्रमणे करणाऱ्यांचे धाबे दणाणले असून शहरातील अतिक्रमणमुक्ती मोहिमेला वेग येण्याची चिन्हे दिसत आहेत.

# अंकीत नंदागवळी हत्याकांडातील मुख्य आरोपी जेरबंद

■ प्रतिनिधी | अकोला ■

नवीन तारफैल परिसरातील गाजलेल्या अंकीत नंदागवळी हत्याकांडातील दोन मुख्य आरोपींना अटक करण्यात रामदासपेठ पोलिसांना अखेर यश आले आहे. घटनेनंतर चार दिवसांपासून फरार असलेल्या आरोपींना जळगाव जिल्ह्यातून शिताफीने ताब्यात घेण्यात आले असून न्यायालयाने त्यांना २१ जूनपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, १४ जून रोजी मध्यरात्री जुन्या वादाच्या सेटलमेंटच्या बहाण्याने अंकीत नंदागवळी याला नवीन तारफैल परिसरातून बोलावून नेण्यात आले होते. त्यानंतर त्याची निर्घृण हत्या करण्यात आल्याची घटना उघडकीस आली होती. या प्रकरणामुळे शहरात मोठी खळबळ उडाली होती. या हत्याकांडातील मुख्य आरोपी आशिष शेखर बनसोड (वय ३५, रा. तारफैल, अकोला) आणि आनंद भगवंत चवरे (वय २९, रा. अशोकनगर, अकोट फैल, अकोला) हे घटनेनंतर फरार झाले होते. त्यांचा शोध घेण्यासाठी रामदासपेठ पोलीस ठाण्याचे गुन्हे शोध पथक गेल्या चार दिवसांपासून सातत्याने प्रयत्न करत होते. तांत्रिक माहिती, गुप्त खबरदारी आणि स्थानिक माहितीदारांच्या मदतीने पोलिसांनी दोन्ही आरोपींचा माग काढत जळगाव जिल्ह्यातून त्यांना ताब्यात घेत अटक केली.



या प्रकरणी फिर्यादी अंजली स्वप्नील बागडे (रा. भीमज्योती चौक, अशोकनगर, अकोट फैल, अकोला) यांच्या तक्रारीवरून रामदासपेठ पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ४१८/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता (ऱ्ए) कलम १०३(१), ३(५) तसेच इतर संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यापूर्वी स्थानिक गुन्हे शाखेने या गुन्ह्यातील आरोपी निलेश विजय बोरकर याला अटक केली होती.

अटक करण्यात आलेल्या दोन्ही मुख्य आरोपींना गुरुवारी प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्रमांक २ यांच्यासमोर हजर करण्यात आले. सुनावणीनंतर न्यायालयाने आरोपींना २१ जूनपर्यंत पोलीस कोठडी (PCR) मंजूर केली आहे. या काळात पोलिसांकडून हत्येमागील नेमके कारण, कटातील इतर सहभागी आणि पुरावे यांचा सखोल तपास केला जाणार आहे.

### रामदासपेठ पोलिसांची मोठी कामगिरी

ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. रामदासपेठ पोलीस ठाण्याचे ठाणेदार शिरीष खंडारे यांच्या नेतृत्वाखाली पोउपनि निलेश गायकवाड, प्रदीप जोगदंड, श्याम मोहळे, दादाराव टापरे, सुरेश लांडे, संदीप वानखडे, किरण गवई यांच्यासह पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी ही यशस्वी मोहीम राबविली. दरम्यान, शहरात चर्चेचा विषय ठरलेल्या या हत्याकांडातील मुख्य आरोपी जेरबंद झाल्याने तपासाला वेग आला असून पुढील चौकशीत आणखी महत्त्वाचे धागेदोरे समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

**Change In Name**

I have change my name
after marraige From
BUSHRA PERWEEN
BASHEER AHMED
KHAN
-TO-
BUSHRA BEGUM
ARIFUR RAHMAN
KHAN
MY RESIDENTIAL
ADDRESS IS-
MOHAMMAD ALI
ROAD KOTHADI
BAZAR AKOL A444001

# शेतातील पालापाचोळा जाळताना शेतकऱ्याचा होरपळून मृत्यू

## मुंडगावमध्ये शोककळा; माजी उपसरपंच भिमराव दहिभात यांच्यावर अंत्यसंस्कार

■ प्रतिनिधी | अकोट ■



अकोट तालुक्यातील संतनगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंडगाव येथील प्रतिष्ठित शेतकरी तथा माजी उपसरपंच भिमराव मारोती दहिभात (वय ७२) यांचा शेतातील पालापाचोळा जाळताना होरपळून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना बुधवारी घडली. या घटनेमुळे मुंडगाव परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, भिमराव दहिभात हे मधुमेहाने (शुगर) त्रस्त होते. बुधवारी सकाळी ते नेहमीप्रमाणे आपल्या शेताची पाहणी करण्यासाठी गेले होते. शेतात पडलेला काडीकचरा व पालापाचोळा त्यांनी पेटवून दिला. मात्र, त्यानंतर उष्णतेचा त्रास किंवा प्रकृती बिघडल्याने त्यांचा तोल गेला असावा आणि ते पेटलेल्या पालापाचोळ्यात पडल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

दरम्यान, बराच वेळ उलटूनही वडील घरी परत न आल्याने त्यांचा मुलगा त्यांना शोधण्यासाठी शेतात गेला. तेव्हा भिमराव दहिभात हे अर्धवट जळालेल्या अवस्थेत पडलेले दिसून आले. ही बाब लक्षात येताच त्याने आरडाओरड केली. गावातील नागरिक घटनास्थळी धावून आले. मात्र, तोपर्यंत त्यांची प्राणज्योत मालवली होती.

घटनेची माहिती मिळताच अकोट ग्रामीण पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. त्यानंतर मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी अकोट येथील ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आला. उत्तरीय तपासणीनंतर रात्री उशिरा त्यांच्या पार्थिवावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

भिमराव दहिभात हे गावातील ज्येष्ठ व मान्यवर व्यक्तिमत्त्व म्हणून परिचित होते. ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच म्हणून त्यांनी गावाच्या विकासात योगदान दिले होते. त्यांच्या अकस्मात निधनाने मुंडगाव परिसरात शोककळा पसरली असून, विविध स्तरांतून हळहळ व्यक्त केली जात आहे.

**जाहिर नोटिस**

सर्व आम जनतेस सुचित करण्यात येते कि माझे पक्षकार खालीदुन्निसा शेख फहीमोद्दिन यांच्या मालकी व कब्जातील खालिल नमुद मालमत्ता आहे. **मालमत्तेचे वर्णन येणे प्रमाणे:** मौजा नायगांव, प्र. अकोला, ता. जि. अकोला

महानगरपालिका अकोला च्या हद्दितील शादाब नगर वार्ड कं. क-१० घर/मालमत्ता कं. ३८८ नविन येथील शेत सर्वे कं. २० मधील प्लॉट कं. १४ चा पुर्वेकडील भाग ज्याची एकूण आराजी ४६.४६ चौ. मी. म्हणजेच ५००.०० चौ. फुट इतकी असुन त्याची चतुःर्सिमा :- पुर्वेसः प्लॉट कं. १५ मो. जाफर यांची जागा, पश्चिमेसः याच प्लॉट चा उर्वरित भाग, उत्तरेसः १५ फुट रोड, दक्षिणेसः सर्विस लाईन, वर नमुद मालमत्ता माझे पक्षकार ईक्वीटास स्माल फायनान्स बँक यांचेकडे गहाण

ठेवून त्यावर रक्कम रू. १२,०१,०००/- चे कर्ज घेत आहे. वर नमुद मालमत्ता कोणत्याही बँकेकडे, कंपनीकडे अथवा संस्थेकडे गहाण असल्यास अथवा इतर कोणत्याही स्वरूपाचा बोझा असल्यास तसेच कोणाचाही हक्क वा अधिकार असल्यास वा इतर काही भानगड असल्यास खालिल नमुद पत्यावर लेखी दस्तऐवजासह सदर नोटिस प्रकाशित झाल्यापासून ३ दिवसाच्या आत लेखी उजर नोंदवावा. त्यानंतर कोणाचाही आक्षेप ग्राहय धरल्या जाणार नाही.

**ॲड. सचिन एस. कुरझडकर**
साई नगर वर्धा
मो. नं. ९८६००४१३६१

**जाहिर नोटिस**

सर्व आम जनतेस सुचित करण्यात येते कि माझे पक्षकार नासिर खान अमजद खान यांच्या मालकी व कब्जातील खालिल नमुद मालमत्ता आहे.

**मालमत्तेचे वर्णन येणे प्रमाणे :** मौजा शिळोदा, प्र. अकोला, ता. जि. अकोला महानगरपालिका अकोला च्या हद्दितील वार्ड कं. क-१० घर/मालमत्ता कं. १७६६ नविन व ३६८६ जुना येथील प्लॉट कं. ७ ज्याची एकूण आराजी ९२.९३ चौ. मी. म्हणजेच १००.०० चौ. फुट इतकी असुन त्याची चतुःर्सिमा :- पुर्वेसः सर्विस लेन, पश्चिमेसः रोड, उत्तरेसः प्लॉट सिरियल नं.६, दक्षिणेसः प्लॉट सिरियल नं.८,

वर नमुद मालमत्ता माझे पक्षकार ईक्वीटास स्माल फायनान्स बँक यांचेकडे गहाण ठेवून त्यावर रक्कम रू. २०,०१,०००/- चे कर्ज घेत आहे. वर नमुद मालमत्ता कोणत्याही बँकेकडे, कंपनीकडे अथवा संस्थेकडे गहाण असल्यास अथवा इतर कोणत्याही स्वरूपाचा बोझा असल्यास तसेच कोणाचाही हक्क वा अधिकार असल्यास वा इतर काही भानगड असल्यास खालिल नमुद पत्यावर लेखी दस्तऐवजासह सदर नोटिस प्रकाशित झाल्यापासून ३ दिवसाच्या आत लेखी उजर नोंदवावा. त्यानंतर कोणाचाही आक्षेप ग्राहय धरल्या जाणार नाही.

**ॲड. सचिन एस. कुरझडकर**
साई नगर वर्धा
मो. नं. ९८६००४१३६१

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १९२**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

**जाहीर नोटीस**

**वि. ०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ८२६/२०२६ प्रोसेस नं.७५३०/२०२६
चौ.ता. २७/०७/२०२६ दिनांक : १२/०६/२०२६

**अर्जदार :** १. दिपाली वीरेंद्र देशमुख २. राजवीर वीरेंद्र देशमुख ३. विहान वीरेंद्र देशमुख ४. शालीनी कृष्णराव देशमुख सर्व रा. ह. मु. व्दारा मेघना राजेश देशमुख, रिद्धी सिद्धी अपार्टमेंट जी-२, सुधीर कॉलनी, ता. जि. अकोला. मो. क. ७२१८१५७७०५

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : वीरेंद्र कृष्णराव देशमुख
**पत्ता :-** रा. ह. मु. व्दारा मेघना राजेश देशमुख, रिद्धी सिद्धी अपार्टमेंट जी-२, सुधीर कॉलनी, ता. जि. अकोला. मो. क. ७२१८१५७७०५

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत वीरेंद्र कृष्णराव देशमुख यांचे दि. ०७/०४/२०२६ रोजी ओझोन मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनाक २७/०७/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी, अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही, असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १२/०६/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर नोटीस**

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ८१९/२०२६ प्रोसेस नं. ७५३२/२०२६
चौ.ता. २७/०७/२०२६ दिनांक : १२/०६/२०२६

**अर्जदार :** १. राजपती बिंदेश्वरीप्रसाद यादव २. कैलाश बिंदेश्वरीप्रसाद यादव दोघेही रा. क्वार्टर नं. ५, बिरला सी कॉलनी, जठारपेठ, अकोला. ४४४००५ ३. माया विजय यादव रा. विशाल नगर, शिवणी, अकोला. ४४४१०४ ४. छाया उमाकांत यादव रा. विशाल नगर, शिवणी, अकोला. ४४४१०४

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : बिंदेश्वरीप्रसाद बैजनाथ यादव
**पत्ता :-** रा. क्वार्टर नं. ५, बिरला सी कॉलनी, जठारपेठ, अकोला. ४४४००५

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत बिंदेश्वरीप्रसाद बैजनाथ यादव यांचे दि. २७/१२/२०२३ रोजी क्वार्टर नं. ५, बिरला सी कॉलनी, अकोला. येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २७/०७/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १२/०६/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर सूचना**

माझे पक्षकार श्री. निलेश मधुकरराव धांडे, रा. हरिहर पेठ जवळ, अकोला यांची पत्नी सौ. विशाखा ही त्यांच्या दोन अल्पवयीन मुलींसह घरातील महत्त्वाच्या वस्तू, रोख रक्कम, सोन्याचे दागिने व कपडे घेऊन दि. ११/०६/२०२६ रोजी न सांगता घरातून निघून गेली आहे. याबाबत माझ्या पक्षकाराने दि. १४/०६/२०२६ रोजी जुने शहर पोलीस स्टेशन, अकोला येथे रीतसर लेखी तक्रार दाखल केलेली आहे. त्यामुळे सर्व संबंधितांना याद्वारे जाहीर सूचित करण्यात येते की, माझे पक्षकार श्री. निलेश मधुकरराव धांडे व त्यांच्या मातोश्री श्रीमती शोभा धांडे यांच्या नावाने कोणताही आर्थिक, उसने, गहाण, खरेदी-विक्री किंवा इतर कोणताही व्यवहार सौ. विशाखा निलेश धांडे हिच्याशी केल्यास तो माझ्या पक्षकारावर अथवा त्यांच्या मातोश्रींवर बंधनकारक राहणार नाही. तसेच अशा व्यवहाराची संपूर्ण जबाबदारी संबंधित व्यवहार करणाऱ्या व्यक्तीची राहील. करिता ही जाहीर सूचना.

दि. १८/०६/२०२६
स्थळ : अकोला

**ॲड. ऐस. ऐ. देशमूख.**
कुणाल कॉम्प्लेक्स, रणपिसे नगर चौक,
अकोला. मो. ७३७८३३६६९९

**जाहीर नोटीस**

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ७९३/२०२६ प्रोसेस नं.७६१९/२०२६
चौ.ता. २९/०७/२०२६ दिनांक : १६/०६/२०२६

**अर्जदार :** १. शशिकला रामचंद्र शिरसाट २. उमेश रामचंद्र शिरसाट ३. राहुल रामचंद्र शिरसाट क्र. १ ते ३ रा. प्लॉट नं. १४०, कबिर नगर, नारी लेआउट, उप्पालवाडी, एस. ता. जि. नागपुर. ४. भारती रामचंद्र शिरसाट (लग्नापुर्वीचे नाव) भारती अजय हिवराळे (लग्नानंतरचे नाव) रा. बॉम्बे व्हेटरनरी कॉलेज, ऑफीस कॉटर नं. ५, वेस्टर्न एक्सप्रेसे हायवे, महानंदा डेरी जवळ, आरेमिल्क कॉलनी, गोरेगाव पुर्व, मुंबई.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : रामचंद्र मोतीराम शिरसाट
**पत्ता :-** रा. कबिर नगर, नारी लेआउट, उप्पालवाडी, एस. ओ. नागपुर, ता. जि. नागपुर.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत रामचंद्र मोतीराम शिरसाट यांचे दि. ०४/०५/२०१४ रोजी राहत्या घरी नागपुर, ता. जि. नागपुर येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकतहरकत असल्यास दिनांक ०९/०७/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०९/०६/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर नोटीस**

**वि. ०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ८२६/२०२६ प्रोसेस नं.७५३०/२०२६
चौ.ता. २७/०७/२०२६ दिनांक : १२/०६/२०२६

**अर्जदार :** १. दिपाली वीरेंद्र देशमुख २. राजवीर वीरेंद्र देशमुख ३. विहान वीरेंद्र देशमुख ४. शालीनी कृष्णराव देशमुख सर्व रा. ह. मु. व्दारा मेघना राजेश देशमुख, रिद्धी सिद्धी अपार्टमेंट जी-२, सुधीर कॉलनी, ता. जि. अकोला. मो. क. ७२१८१५७७०५

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : वीरेंद्र कृष्णराव देशमुख
**पत्ता :-** रा. ह. मु. व्दारा मेघना राजेश देशमुख, रिद्धी सिद्धी अपार्टमेंट जी-२. सुधीर कॉलनी, ता. जि. अकोला. मो. क. ७२१८१५७७०५

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत वीरेंद्र कृष्णराव देशमुख यांचे दि. ०७/०४/२०२६ रोजी ओझोन मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २७/०७/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १२/०६/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर नोटीस**

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ८६१/२०२६ प्रोसेस नं. ७६१९/२०२६
चौ.ता. २९/०७/२०२६ दिनांक : १६/०६/२०२६

**अर्जदार :** १. उदय भुजबळ ठाकरे २. भार्गवी उदय ठाकरे ३. राधा उदय ठाकरे सर्व रा. आत्मजा उदय ठाकरे, मेफ्लोअर-२/६०४, कॉसमोर पार्क, घोडबंदर रोड, सूरज वॉटर पार्क जवळ, कावेसर, ठाणे, वेस्ट, ठाणे. ४००६१५

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : शिल्पा उदय ठाकरे
**पत्ता :-** रा. व्दारा के. एस. देशमुख, सरस्वती कन्या विद्यालयाचे मागे, नित्यानंद नगर, गौरक्षण रोड, अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत शिल्पा उदय ठाकरे यांचे दि. २५/१२/२०२२ रोजी नित्यानंद नगर, गौरक्षण रोड, अकोला. ता. जि. अकोला. येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २९/०७/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १६/०६/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

# रेतीच्या 'डॉन'वर हातोडा की राजकीय वरदहस्त!

## पालकमंत्र्यांच्या निकटवर्तीयावरही कारवाई होणार का जिल्हाभरात चर्चेला उधाण

**वर्धा/जनमाध्यम**

रेतीच्या डॉनला कोणाचा आशीर्वाद या मथळ्याखाली जनमाध्यमने प्रकाशित केलेल्या वृत्ताने अखेर महसूल प्रशासनाला जाग आणल्याचे चित्र दिसत आहे. उमरी (मेघे) परिसरात रहिवासी भागातच मोठ्या प्रमाणात करण्यात आलेल्या वाळू साठेबाजीचा मुद्दा ऐरणीवर आल्यानंतर जिल्हाधिकारी यांनी तातडीने दखल घेत तहसीलदारांना चौकशी व कारवाईचे निर्देश दिल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे अनेक महिन्यांपासून उघडपणे सुरू असलेल्या या रेती साम्राज्यावर प्रशासनाचा खरोखरच हातोडा पडणार की पुन्हा राजकीय वरदहस्तामुळे कारवाई कागदावरच राहणार, असा प्रश्न नागरिक विचारू लागले आहेत.

उमरी (मेघे) परिसरा मधील मोकळ्या जागांवर, भूखंडांवर आणि रहिवासी भागालगत शेकडो ब्रास वाळूचे मनोरे उभारण्यात आले होते. दिवसाढवळ्या सुरू असलेल्या या साठेबाजीमुळे परिसरातील रस्त्यांची अक्षरशः चाळण झाली असून, रात्रभर सुरू असलेल्या ट्रॅक्टर व हायवा वाहतुकीमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत.मंडळ अधिकारी प्रवीण हाडे, तलाठी लीलाधर खास आणि कोतवाल विलास शेळके यांनी केलेल्या पंचनाम्यात तब्बल ७०० ते ८०० ब्रास वाळूचे साठे आढळून आल्याचे समोर आले आहे. या संदर्भातील अहवाल तहसीलदारांकडे सादर करण्यात आला असून, प्राथमिक टप्प्यात आठ मोठ्या साठेधारकांना नोटीस बजावण्याची तयारी सुरू असल्याचे सांगितले जात आहे.मात्र, या संपूर्ण प्रकरणातील सर्वात महत्त्वाचा प्रश्न अजूनही अनुत्तरित आहे. हिंदी विश्व विद्यापीठ परिसरात मोठ्या प्रमाणात वाळू साठवून ठेवल्याचा आरोप असलेल्या आणि राजकीय वर्तुळात पालकमंत्र्यांच्या निकटवर्तीय म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सचिन नावाच्या व्यक्तीवर प्रशासन प्रत्यक्ष कारवाई करणार का? की इतरांवर कारवाईचा बडगा दाखवत मुख्य सूत्रधारांना अभय दिले जाणार याबाबत गावकऱ्यांमध्ये आणि महसूल वर्तुळात जोरदार चर्चा रंगली आहे.



### जनमाध्यमच्या वृत्तानंतर महसूल विभाग खडबडून जागा

विशेष म्हणजे, ग्रामस्थांच्या मते महसूल विभागाने पाहणी केलेले साठे हे केवळ हिमनगाचे टोक आहे. उमरी परिसरात तब्बल २५ ते ३० ठिकाणी मोठ्या प्रमाणात वाळू साठवण्यात आली असल्याचा दावा करण्यात येत आहे. त्यामुळे केवळ आठ नोटीसांवर प्रशासन थांबणार की संपूर्ण रेती साखळीचा पर्दाफाश करणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.यावेळी उपसरपंच सचिन खोसे यांनी स्पष्ट भूमिका घेत, बेकायदेशीर वाळू साठे तातडीने जप्त करावेत. जप्त केलेली वाळू पुन्हा त्याच माफियांच्या घशात घालू नये. तसेच रेती वाहतुकीमुळे खराब झालेल्या रस्त्यांच्या दुरुस्तीचा खर्च संबंधितांकडून वसूल करावा, अशी मागणी केली आहे.जनमाध्यमने उघडकीस आणलेल्या या प्रकरणानंतर प्रशासनाने कारवाईचे संकेत दिले असले तरी आता नागरिकांना नोटीस नव्हे तर प्रत्यक्ष कारवाईची अपेक्षा आहे. कारण वाळूमाफियांचे जाळे मोडीत काढायचे असेल तर केवळ कागदी घोडे नाचवून चालणार नाही. त्यामुळे उमरीतील रेती साम्राज्यावर खरोखर बुलडोझर चालणार की पुन्हा राजकीय छत्रछायेखाली सर्व काही सुरळीत होणार, याचे उत्तर येत्या काही दिवसांत मिळणार आहे.

### सेलूत पोलिसांचा सर्जिकल स्ट्राईक

# अवैध दारू निर्मितीच्या अड्ड्यांवर धडक कारवाई

**वर्धा/जनमाध्यम**

सेलू अवैध दारू निर्मिती आणि विक्रीविरोधात सेलू पोलिसांनी धडक कारवाई करत दारूमाफियांच्या मुसक्या आवळल्या आहेत. हिंगणी आणि बोरी शिवारात केलेल्या स्वतंत्र कारवाईत पोलिसांनी तब्बल ३ लाख ७ हजार ३०० रुपये किमतीचा मोहफुल सडवा जप्त करून जागीच नष्ट केला. या कारवाईमुळे अवैध दारू व्यवसाय करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली असून परिसरात पोलिसांच्या कारवाईची जोरदार चर्चा सुरू आहे.

नुकतेच सेलू पोलीस ठाण्याची सूत्रे हाती घेतलेल्या ठाणेदार पंकज वाघोडे यांनी अवैध धंद्यांविरोधात कठोर भूमिका घेतली आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली डीबी पथकाने गोपनीय माहितीच्या आधारे गुरुवारी १८ जून रोजी हिंगणी शिवारात छापा टाकला या कारवाईत अनिल चिचहारे रा शिवणगाव याच्या ताब्यातून ६७ हजार ३०० रुपये किमतीचा मोहफुल सडवा आढळून आला पोलिसांनी हा साठा जप्त करून जागीच नष्ट केला.



यानंतर पोलिसांनी बोरी शिवारात दुसरी धडक कारवाई केली येथे आरोपी पठाण याच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात अवैध दारू निर्मितीसाठी साठवून ठेवलेला मोहफुल सडवा आढळून आला. या ठिकाणाहून तब्बल २ लाख ४० हजार रुपयांचा साठा जप्त करण्यात आला. दोन्ही कारवायांमध्ये एकूण ३ लाख ७ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल नष्ट करण्यात आला. असून संबंधित आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.या मोहिमेत डीबी पथकाचे मनोहर मुडे अखिलेश गव्हाणे सचिन वाटखेडे विनायक गोडे तसेच हिंगणी बीटचे प्रशांत श्रीवास्तव शरद इंगोले आणि गंगाधर तांबारे यांनी सक्रिय सहभाग घेतला. पोलिसांच्या या कारवाईमुळे अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या काही अवैध अड्ड्यांना मोठा फटका बसल्याचे सांगितले जात आहे.दरम्यान अवैध दारू विक्री आणि निर्मितीमुळे त्रस्त असलेल्या परिसरातील नागरिकांनी पोलिसांच्या कारवाईचे स्वागत केले आहे.

विशेषतः महिला आणि ज्येष्ठ नागरिकांनी समाधान व्यक्त करत अशाच प्रकारच्या कारवाया सातत्याने सुरू ठेवण्याची अपेक्षा व्यक्त केली. पोलिसांच्या या धडक कारवाईमुळे दारूमाफियांचे आर्थिक कंबरडे मोडले असून अवैध धंदे करणाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

## संक्षिप्त

### नाली खोदण्याच्या वादातून दाम्पत्यास मारहाण

**आर्वी-**पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी नाली खोदण्याच्या कारणावरून झालेल्या वादात एका दाम्पत्याला मारहाण करण्यात आल्याची घटना पाचोड येथे घडली. या प्रकरणात अनार राठोड व त्यांची पत्नी कुसूम राठोड जखमी झाले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, घराशेजारी पावसाचे पाणी साचू नये म्हणून दोघेही नाली खोदत होते. त्यावेळी शेजारी राहणारे प्रल्हाद राठोड व भय्या राठोड यांनी नाली खोदण्यास विरोध केला. यावरून दोन्ही बाजूंमध्ये शाब्दिक वाद झाला. वादाचे रूपांतर हाणामारीत होताच दाम्पत्याला मारहाण करण्यात आली. जखमींनी आर्वी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीच्या आधारे पोलिसांनी संबंधितांविरुद्ध गुन्हा नोंद करून पुढील तपास सुरू केला आहे. परिसरात या घटनेची चर्चा असून किरकोळ वादातून मारहाणीपर्यंत प्रकरण पोहोचल्याने नागरिकांनी खेद व्यक्त केला आहे.

### अवैध रेती वाहतुकीवर कारवाई

**आर्वी-**अवैध वाळू वाहतुकीविरोधात महसूल विभागाने धडक कारवाई करत खुबगाव शिवारातून एका टिप्परसह तब्बल २५ लाख ७० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. महसूल विभागाच्या पथकाला गुप्त माहिती मिळाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. नायब तहसीलदार साईकिरण अबुलवार, पोलिस पाटील रोशन सवाळे आणि महसूल सेवक अर्जुन दांडेकर यांनी घटनास्थळी धाव घेत तपासणी केली. एमएच-२७-डीएस-८१८१ क्रमांकाच्या टिप्परमध्ये सुमारे १० ब्रास वाळू आढळून आली. संबंधित वाहनावरील कागदपत्रांची पडताळणी केली असता वाहतूक नियमांचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आले. यानंतर वाळूसह टिप्पर जप्त करण्यात आला. या प्रकरणी भूषण चव्हाण व अभिषेक मोरे, दोघेही अमरावती येथील रहिवासी, यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिस पुढील तपास करीत आहेत.

### कुलूप तोडून चांदीचे दागिने लंपास

**देवळी-**पॉवर ग्रीड कॉलनी परिसरात बंद घर फोडून अज्ञात चोरट्यांनी चांदीचे दागिने चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. यामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. श्रीकांत रासपेल्ली (वय ३९) हे कुटुंबासह बाहेरगावी गेले असताना चोरट्यांनी संधी साधली. त्यांच्या घराचे कुलूप तोडून घरात प्रवेश करण्यात आला. घरातील साहित्याची उचकापाचक करत चांदीचा कमरपट्टा व चांदीचे कडे असा मौल्यवान ऐवज चोरून नेण्यात आला. कुटुंबीय परतल्यानंतर घरफोडीचा प्रकार लक्षात आला.

# बुरकोणी ग्रामपंचायतीतील कथित महाघोटाळ्याची चौकशीची मागणी

## रोख पुस्तकात खाडाखोड, बोगस बिले व निधी अपहाराचे गंभीर आरोप; जनतेच्या पैशांवर डल्ला

**हिंगणघाट/जनमाध्यम**

तालुक्यातील बुरकोणी ग्रामपंचायतीत गेल्या काही वर्षांत विविध शासकीय योजनांच्या निधीमध्ये मोठ्या प्रमाणावर आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा आरोप पुढे आला असून या प्रकरणी पुराव्यांसह जिल्हास्तरीय यंत्रणांकडे तक्रार दाखल करण्यात आल्याने खळबळ उडाली आहे. ग्रामपंचायतीतील आर्थिक व्यवहार, विकासकामे आणि निधी खर्चाबाबत अनेक गंभीर अनियमितता झाल्याचा दावा तक्रारदाराने केला आहे.

गावातील ज्येष्ठ नागरिक व सामाजिक कार्यकर्ते शंकर धोंडबाजी अष्टणकर यांनी जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग तसेच स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागाकडे लेखी तक्रार सादर केली आहे. तक्रारीसोबत विविध कागदपत्रे आणि आर्थिक व्यवहारांशी संबंधित पुरावे जोडण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे.तक्रारीनुसार, ग्रामपंचायतीच्या निधीतून करण्यात आलेल्या काही विकासकामांमध्ये गंभीर अनियमितता झाल्याचा आरोप आहे. वन विभागाच्या मालकीच्या जमिनीवर एका खासगी व्यक्तीच्या फायद्यासाठी रस्ता बांधण्यात आल्याचा दावा करण्यात आला असून संबंधित जागेची वन विभागाकडून मोजणी झाल्याचेही नमूद करण्यात आले आहे. तसेच या कामासाठी वापरण्यात आलेल्या निधीची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

मुख्य रोख पुस्तकातील नोंदींबाबतही अनेक प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. पाच वर्षांच्या आर्थिक नोंदींमधील काही महिन्यांचे तपशील उपलब्ध



नसल्याचा तसेच बँक खात्यातील शिल्लक आणि दप्तरी नोंदींमध्ये तफावत असल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. त्यामुळे ग्रामपंचायतीच्या आर्थिक व्यवहारांची विशेष लेखापरीक्षा करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.राष्ट्रीय ग्रामीण पाणीपुरवठा योजना, दलित वस्ती सुधार योजना, स्वच्छ भारत अभियान तसेच इतर विकास योजनांच्या निधीचा नियमबाह्य वापर करण्यात आल्याचाही दावा तक्रारदाराने केला आहे. काही कामे प्रत्यक्षात पूर्ण न करता मजुरीची बोगस बिले काढण्यात आली, तर काही विकासकामे कागदोपत्री पूर्ण दाखवून प्रत्यक्षात अपूर्ण अवस्थेत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.याशिवाय ग्रामपंचायतीच्या शिपायाकडे दीर्घकाळ शासकीय रोख रक्कम ठेवण्यात आल्याचा, काही व्यवहारांचा अधिकृत हिशेब उपलब्ध नसल्याचा तसेच चेक बाऊन्स झाल्यामुळे ग्रामपंचायतीला आर्थिक दंडाचा फटका बसल्याचा उल्लेख तक्रारीत करण्यात आला आहे.

या संपूर्ण प्रकरणाची विशेष लेखापरीक्षा करून संबंधित जबाबदार अधिकारी व पदाधिकाऱ्यांवर प्रशासकीय कारवाई करण्यात यावी, तसेच आर्थिक अनियमितता सिद्ध झाल्यास फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी तक्रारदाराने केली आहे.दरम्यान, या प्रकरणातील सर्व आरोप हे तक्रारदार शंकर धोंडबाजी अष्टणकर यांनी केलेले असून संबंधित विभागांकडून अद्याप अधिकृत चौकशी पूर्ण झालेली नाही. त्यामुळे आरोपांची सत्यता चौकशी अहवालानंतरच स्पष्ट होणार आहे. मात्र, जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा विभाग या चार प्रमुख यंत्रणांनी तक्रार स्वीकारल्याने प्रकरणाचे गांभीर्य वाढले आहे. आता विशेष लेखापरीक्षण आणि चौकशीतून नेमके काय निष्पन्न होते तसेच प्रशासन कोणती कारवाई करते, याकडे बुरकोणीसह संपूर्ण हिंगणघाट तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# मोडकळीस आलेल्या घरकुलांना नवजीवन द्या

## जीर्ण घरांसाठी पुनर्बांधणी योजना राबवा; खा.अमर काळे यांची ग्रामविकास मंत्र्यांकडे मागणी

**वर्धा/जनमाध्यम**

शासनाच्या विविध घरकुल योजनांतर्गत २५ ते ३० वर्षांपूर्वी बांधण्यात आलेली हजारो घरे आज जीर्णावस्थेत पोहोचली असून अनेक घरकुलांचे छप्पर, भिंती आणि पाया कमकुवत झाल्याने रहिवाशांच्या जीविताला धोका निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर जीर्ण व मोडकळीस आलेल्या घरकुलधारकांना नवीन घरकुल योजनांमध्ये विशेष बाब म्हणून समाविष्ट करून त्यांना सुरक्षित निवारा उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी खा.अमर काळे यांनी राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे केली आहे. खा. काळे यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, राज्यातील अनेक गरीब कुटुंबांना शासनाने वर्षांपूर्वी घरकुलांचा लाभ दिला होता. मात्र, कालांतराने ही घरे जीर्ण



झाली असून काही घरकुले पडण्याच्या स्थितीत आहेत. अनेक कुटुंबे आजही या धोकादायक घरांमध्ये राहण्यास मजबूर आहेत. पावसाळ्याच्या दिवसांत तर या कुटुंबांची चिंता अधिक वाढते. छप्पर कोसळणे, भिंती ढासळणे आणि अपघात होण्याचा धोका कायम निर्माण झाला आहे. आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्यामुळे या कुटुंबांना स्वतःच्या खर्चाने नवीन घर उभारणे शक्य होत नाही.

त्यामुळे शासनाने मानवतावादी दृष्टिकोनातून पुढाकार घेत अशा लाभार्थ्यांना नवीन घरकुल योजनांमध्ये समाविष्ट करावे. तसेच ज्या जागेवर पूर्वी घरकुल बांधण्यात आले होते, त्याच जागेवर पुनर्बांधणीस परवानगी देऊन नवीन घर उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी त्यांनी केली आहे.राज्यातील हजारो जीर्ण घरकुलधारक कुटुंबांसाठी ही मागणी दिलासादायक ठरू शकते. शासनाने सकारात्मक निर्णय घेतल्यास गरीब कुटुंबांना सुरक्षित, सन्मानजनक आणि हक्काचे घर मिळण्याचा मार्ग मोकळा होईल, असा विश्वास खासदार अमर काळे यांनी व्यक्त केला आहे. शासनाच्या निर्णयाकडे आता राज्यातील हजारो घरकुलधारकांचे लक्ष लागले आहे.

# कर्मकांडांना दिला नकार

## डॉ.सुधीर भगत यांचे बुद्धा टेकडीवर पर्यावरणपूरक अस्थी विसर्जन

**वर्धा-**जीवनभर बुद्ध, धम्म आणि विज्ञाननिष्ठ विचारांचा प्रचार करणारे ज्येष्ठ आंबेडकरी साहित्यिक, लेखक, संपादक व धम्मसेवक स्मृतीशेष डॉ. सुधीर वत्सला जनार्धन भगत यांच्या निधनानंतर त्यांच्या कुटुंबीयांनीही त्याच विचारांचा वारसा जपत एक आदर्श निर्माण केला. रूढी, परंपरा आणि कर्मकांडांना फाटा देत



त्यांच्या अस्थींचे विसर्जन वाहत्या पाण्यात न करता सिंदी (मेघे) येथील बुद्धा टेकडीवर पर्यावरणपूरक पद्धतीने करण्यात आले. राज्य उत्पादन शुल्क विभागाचे माजी अधिकारी असलेले डॉ. भगत हे धम्म चळवळीचे समर्पित कार्यकर्ते, पाली भाषेचे अभ्यासक आणि ज्ञानसूर्य इस जगत का भिमराव महान' या लोकप्रिय गीताचे गीतकार, गायक व संगीतकार म्हणून महाराष्ट्रभर परिचित होते. त्यांच्या निधनानंतर कोणतेही धार्मिक कर्मकांड न करण्याचा निर्णय भगत परिवाराने घेतला. १६ जून रोजी बुद्धा टेकडीवर पाच खड्ड्यांमध्ये अस्थी व राख विसर्जित करून त्यावर बोधिवृक्ष (पिंपळ), आंबा, कडूनिंब, जांभूळ आणि उंबर या वृक्षांची लागवड करण्यात आली. मृत्यूनंतरही समाज आणि पर्यावरणासाठी काहीतरी देऊन जाणे हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. यावेळी बुद्धा टेकडीच्या पर्यावरण संवर्धनासाठी भगत परिवाराने ८,५०० रुपयांचे धम्मदानही दिले.यानंतर आयोजित श्रद्धांजली सभेत डॉ. भगत यांच्या साहित्यिक, सामाजिक आणि धम्म कार्याचा गौरव करण्यात आला. सभेचे संचालन सुनील ढाले यांनी केले. प्रास्ताविक प्रकाश कांबळे यांनी तर मनोगत समाजभूषण राजू थुल व प्रा. ज्ञानेंद्र मुन्नेश्वर यांनी व्यक्त केले. आभार दिनेश भगत यांनी मानले.याप्रसंगी प्रभाकर भगत, प्राचार्य मुन्ना नाखले, मुकुंद नाखले, धर्मपाल ताकसांडे, माजी न्यायाधीश देवराव कांबळे, राजाभाऊ ढाले तसेच रमाई फाउंडेशनचे सदस्य आणि मोठ्या संख्येने धम्म बांधव उपस्थित होते. डॉ. भगत यांच्या स्मृतीला वृक्षांच्या रूपाने दिलेली ही अनोखी आदरांजली अनेकांसाठी प्रेरणादायी ठरली.

**पाऊस पडू दे रे देवा**

# मातीत पेरल्या आशा, नजरा आभाळाकडे; पावसासाठी महिलांची सामूहिक प्रार्थना

## आद्रा नक्षत्राकडून आशा, २२ नंतर पावसाचा अंदाज

**वर्धा/प्रमोद पानबुडे**

जून महिना अर्धा संपत आला तरीही समाधानकारक पाऊस न झाल्याने कानगाव परिसरातील शेतकरी चिंतेत सापडले आहेत. मृग नक्षत्र जवळपास कोरडे गेल्यामुळे आता सर्वांच्या आशा आद्रा नक्षत्रावर खिळल्या असून, पावसासाठी महिलांनी देवाकडे आर्त साकडे घालत गावात सामूहिक प्रार्थना केली. कानगाव, गाडेगाव, भोसा, उमरा, गौळ आणि परिसरातील गावांमध्ये खरीप हंगामाच्या तयारीला वेग आला आहे. शेतकऱ्यांनी कपाशी, सोयाबीन, तूर, मूग व उडीद पिकांसाठी जमिनीची मशागत करून ठेवली असून बियाणे, खते आणि औषधांची खरेदीही पूर्ण केली आहे. मात्र पावसाच्या प्रतीक्षेमुळे पेरण्या खोळंबल्या आहेत. त्यामुळे वाढत्या उत्पादन खर्चासोबतच उत्पन्नाबाबतची अनिश्चितता शेतकऱ्यांच्या चिंतेत भर घालत आहे. यंदा मृग नक्षत्रात चांगल्या पावसाची अपेक्षा होती. मात्र अपेक्षाभंग झाल्याने शेतकऱ्यांच्या आशांवर पाणी फिरले आहे. अनेक ठिकाणी जमिनीतील ओलावा कमी झाल्यामुळे मशागतीच्या कामांवरही परिणाम झाला आहे. पाऊस आणखी लांबल्यास दुबार मशागत करण्याची वेळ येण्याची शक्यता असून त्यामुळे आर्थिक भार वाढणार असल्याची भीती व्यक्त होत आहे. दरम्यान, परिसरातील महिलांनी पारंपरिक श्रद्धेनुसार पावसासाठी मंदिरांमध्ये पूजा-अर्चना, भजन-कीर्तन व सामूहिक प्रार्थनांचे आयोजन केले. पाऊस पडू दे रे देवा, बळीराजाच्या आशा पूर्ण होऊ दे, अशी आर्त हाक देत महिलांनी गावातून फेरफटका काढून देवाकडे साकडे घातले. महिलांच्या या भावनिक उपक्रमामुळे गावात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.

शेतकरी कुटुंबांचे संपूर्ण अर्थचक्र पावसावर अवलंबून असल्याने प्रत्येक घरात पावसाचीच चर्चा सुरू आहे. काही शेतकऱ्यांनी आशेवर कपाशी लागवडीची प्राथमिक कामे सुरू ठेवली असली तरी पावसाचा विलंब वाढल्यास पिकांच्या नियोजनावर परिणाम होण्याची शक्यता आहे. हवामान विभागाने मात्र दिलासादायक अंदाज व्यक्त केला आहे. २२ जूननंतर विदर्भातील अनेक भागांत मान्सून सक्रिय होण्याची शक्यता असून मध्यम ते चांगल्या पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आशा पुन्हा एकदा पल्लवित झाल्या आहेत.

सध्या कानगाव परिसरात एका बाजूला पेरणीसाठी सज्ज झालेली शेते तर दुसऱ्या बाजूला आभाळाकडे आशेने नजर लावून बसलेला बळीराजा असे चित्र पाहायला मिळत आहे. महिलांच्या ओठांवरील प्रार्थना, शेतकऱ्यांच्या कपाळावरील चिंता आणि ढगांकडे लागलेल्या नजरा हेच सध्या ग्रामीण भागाचे वास्तव बनले आहे.

आता आद्रा नक्षत्र शेतकऱ्यांच्या आशा पूर्ण करणार का, याकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.

### २२ नंतर पावसाची शक्यता

हवामान विभागाच्या अंदाजानुसार २२ जूननंतर विदर्भात मान्सूनला गती मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे रखडलेल्या पेरण्यांना वेग मिळेल, अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करीत आहेत. मात्र प्रत्यक्ष पाऊस पडत नाही तोपर्यंत शेतकरी प्रतीक्षेतच राहणार आहेत.



जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक २०२**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# शिवसेना उबाठाचे अर्धनग्न आंदोलन..!

## शेतकऱ्यांना सरसकट पिक विमा, महिलांना न्याय द्या.. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र निदर्शने

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. १८ : राज्यातील सर्वाधिक शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्हा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या यवतमाळ जिल्ह्यातील शेतकरी आणि महिलांच्या प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अर्धनग्न आंदोलन करण्यात आले. यावेळी शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी, सर्व शेतकऱ्यांना कोणत्याही अटींशिवाय पिक विम्याचा लाभ आणि मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून वगळण्यात आलेल्या ६५ हजार महिलांचा तात्काळ पुनर्समावेश करण्याची जोरदार मागणी करण्यात आली.**



यावेळी आंदोलनकर्त्यांनी शासनाच्या धोरणांविरोधात तीव्र संताप व्यक्त करत, यवतमाळ जिल्ह्यातील शेतकरी सततच्या अवकाळी पाऊस, अतिवृष्टी, दुष्काळसदृश परिस्थिती, उत्पादन खर्चातील वाढ आणि शेतीमालाला मिळणाऱ्या अपुऱ्या भावामुळे आर्थिक संकटात सापडल्याचे सांगितले. पिकांचे नुकसान होऊनही पुरेशी मदत मिळत नसल्याने शेतकरी हवालदिल झाला असून त्याला तातडीने सरसकट कर्जमाफी आणि पिक विम्याचे संरक्षण देणे आवश्यक असल्याचे आंदोलकांनी स्पष्ट केले. तसेच, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून यवतमाळ जिल्ह्यातील सुमारे ६५ हजार महिलांना विविध तांत्रिक कारणांमुळे वगळण्यात आल्याने अनेक गरीब, कष्टकरी आणि शेतकरी कुटुंबांतील महिलांवर आर्थिक संकट ओढवले आहे. पात्र महिलांना किरकोळ त्रुटींच्या कारणावरून लाभापासून वंचित ठेवणे अन्यायकारक असल्याची भूमिका शिवसेना उबाठाने मांडली. यावेळी आ. संजय दरेकर,किशोर इंगळे, राजेंद्र गायकवाड, प्रवीण शिंदे संजय निखाडे या सह मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होत.जिल्हाप्रमुख, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) यांच्या नेतृत्वाखाली पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी करत शासनाविरोधात जोरदार निदर्शने केली. मागण्यांवर तात्काळ सकारात्मक निर्णय न घेतल्यास यापेक्षाही तीव्र लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्याचा इशाराही आंदोलनकर्त्यांनी दिला.

# विनापरवाना शेतमाल व्यवहारांवर बाजार समितीचा दणका..!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

## पुसदमधील ९ व्यापाऱ्यांची दुकाने सील



**पुसद, दि. १८ :** शेतमाल खरेदी-विक्री व्यवहारात पारदर्शकता राखण्यासाठी आणि शेतकऱ्यांच्या हिताचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने पुसद कृषी उत्पन्न बाजार समितीने मोठी कारवाई करत विनापरवाना शेतमाल खरेदी-विक्री करणाऱ्या नऊ व्यापाऱ्यांच्या दुकानांवर धडक कारवाई केली असून काही दुकाने तात्पुरत्या स्वरूपात सील करण्यात आली आहेत.

या कारवाईमुळे अवैध पद्धतीने व्यवसाय करणाऱ्या व्यापाऱ्यांमध्ये एकच खळबळ उडाली आहे. महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन अधिनियम १९६३ व नियम १९६७ अंतर्गत शेतमाल खरेदी-विक्रीसाठी परवाना बंधनकारक असतानाही अनेक व्यापारी विनापरवाना व्यवहार करत असल्याच्या तक्रारी बाजार समितीकडे प्राप्त झाल्या होत्या. त्यानुसार गुरुवारी विशेष तपासणी मोहीम राबवून ओंकार ट्रेडर्स, माधव ट्रेडर्स, नारायणदास गिरीधरलाल बजाज, सुरज ट्रेडिंग कंपनी, इनानी ट्रेडिंग, जनता ट्रेडर्स, निरबाण ट्रेडर्स (वाशिम रोड), निरबाण ॲग्रो प्रोसेस (एमआयडीसी) आणि दत्तगुरू ट्रेडर्स या आस्थापनांची तपासणी करण्यात आली. कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शेख कौसर शेख अख्तर यांनी भविष्यातही विनापरवाना शेतमाल व्यवहार करणाऱ्यांवर कठोर कारवाईचा इशारा दिला आहे. या कारवाईत सहाय्यक निबंधक केशव मस्के, उपसभापती अभय राठोड, संचालक मंडळ व बाजार समितीचे अधिकारी-कर्मचारी सहभागी होते.

# मांग गारुडी समाजावरील हल्ल्याचा तीव्र निषेध..!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. १८ :** मालेगाव तालुक्यातील राजमाने गावातील मांग गारुडी समाजाच्या नागरिकांवर झालेल्या भ्याड हल्ल्याचा तीव्र निषेध व्यक्त करत दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. याबाबत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे जिल्हाधिकाऱ्यांमार्फत निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, राजमाने गावात अनेक वर्षांपासून वास्तव्यास असलेल्या मांग गारुडी समाजातील नागरिक, महिला, युवती, लहान मुले आणि ज्येष्ठांवर काही समाजकंटकांनी जीवघेणा हल्ला करून गंभीर मारहाण केली. तसेच अनेक घरांची तोडफोड करून समाजात दहशतीचे वातावरण निर्माण करण्यात आले. या घटनेमुळे संपूर्ण समाजामध्ये भीती आणि संतापाची भावना निर्माण झाली आहे. सदर प्रकरणातील सर्व आरोपींवर अनुसूचित जाती-जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायद्यानुसार कठोर कारवाई करून त्यांना तात्काळ अटक करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच पीडित कुटुंबांना शासकीय आर्थिक मदत, संरक्षण आणि पुनर्वसन देण्याची मागणीही करण्यात आली आहे. मांग गारुडी समाजाच्या वतीने यवतमाळ जिल्ह्यात तीव्र जनआक्रोश मोर्चा काढून आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा निवेदनातून देण्यात आला. यावेळी निवेदन देण्याकरिता संजय वानखडे,चंदन हातागडे, विक्की हातागडे, बाला गाडे,सुदाम हातागडे, शितल हातागडे सह समस्त मांग गारुडी समाज बांधव, नेताजी नगर,मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# पारधी हक्क न्याय यात्रा अजंती ते यवतमाळ पायी लाँग मार्च..!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ , दि. १८ :** अजंती ग्रामपंचायत हद्दीतील सर्वे गट क्रमांक १९ मधील ई-क्लास (गायरान) शासकीय जमिनीवर गेल्या ३० ते ३५ वर्षांपासून वास्तव्यास असलेल्या आदिवासी पारधी समाजाच्या ५६ कुटुंबांनी आपल्या न्याय्य हक्कांसाठी अजंती ते यवतमाळ असा लाँग मार्च काढत जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक दिली.

या मोर्चामध्ये महिला, पुरुष, लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि वयोवृद्धांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून आपल्या हक्कासाठी तीव्र एल्गार पुकारला. पारधी समाजातील सुमारे ८० कुटुंबे अनेक वर्षांपासून या ठिकाणी राहत असूनही त्यांना आजतागायत मालकी हक्काचे पट्टे, पक्की घरे, पिण्याचे पाणी, वीजपुरवठा, रस्ते आणि इतर मूलभूत सुविधा मिळालेल्या नाहीत. परिणामी या कुटुंबांना अत्यंत हलाखीचे आणि असुरक्षित जीवन जगावे लागत आहे. उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागत असल्याने निर्माण झालेल्या भीषण परिस्थितीत अजंती पारधी समाजातील एका अल्पवयीन मुलीचा पाण्याच्या शोधात असताना मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडल्याने समाजामध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. या घटनेने प्रशासनाच्या दुर्लक्षावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून मूलभूत सुविधांपासून वंचित असलेल्या पारधी समाजाच्या वेदना पुन्हा एकदा समोर आल्या आहेत. मोर्चेकऱ्यांनी प्रशासनाकडे महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ मधील तरतुदींनुसार ई-क्लास जमिनीवरील जुन्या निवासी अतिक्रमणांचे नियमाकुलीकरण करून मालकी हक्काचे पट्टे देण्याची मागणी केली. तसेच आदिवासी पारधी बेड्याला स्वतंत्र महसूल गाव अथवा विशेष दर्जा देऊन सर्व शासकीय योजनांचा लाभ मिळावा, अशीही मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. यावेळी आंदोलकांनी व्यथा व्यक्त केली तीन दशकांपासून आम्ही याच भूमीवर राहत आहोत. मात्र अजूनही आम्हाला नागरिक म्हणून मूलभूत अधिकार नाकारले जात आहेत. प्रशासनाने तातडीने निर्णय घेऊन पारधी समाजाला न्याय द्यावा.आता जिल्हा प्रशासन आणि शासन या मागण्यांवर किती संवेदनशीलतेने निर्णय घेते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# शिवसैनिका वरील हल्लातील चार आरोपी गजाआड



✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**उमरखेड, दि. १८ :** शिवसेना कार्यकर्ते रमेश गुलाबसिंह चव्हाण (वय ६०, रा. हनुमान वॉर्ड, उमरखेड) यांच्यावर जीवघेणा हल्ला करणाऱ्या अनोळखी आरोपींना अवघ्या ४८ तासांत जेरबंद करून उमरखेड पोलिसांनी उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. १६ जून रोजी चव्हाण हे दुचाकीने घरी जात असताना तोंडाला रूमाल बांधून आलेल्या तिघांनी त्यांना अडवून लोखंडी रॉडने मारहाण केली आणि चाकूने गळ्यावर वार करून ठार मारण्याचा प्रयत्न केला होता.

गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी तातडीने विशेष पथके तयार करून तांत्रिक व गोपनीय तपास सुरू केला. आरोपींची ओळख पटवून ते तेलंगणात पळून जाण्याच्या तयारीत असताना मध्यरात्री सापळा रचून त्यांना ताब्यात घेण्यात आले. याप्रकरणी सय्यद आरीफ उर्फ धार सय्यद युसूफ, अहेफाजोद्दीन उर्फ गौसोद्दीन काझी यांच्यासह दोन विधीसंघर्षग्रस्त बालकांना ताब्यात घेण्यात आले असून, परवेझ उर्फ लाला सलीम खान याने हल्ल्याचा कट रचल्याचे तपासात समोर आले आहे. पुढील तपास उमरखेड पोलीस करीत आहेत.

# शालेय वाहनाची फिटनेस तपासणी मोहीम राबवावी – अतुल पांडे

## फिटनेसविना शालेय वाहने रस्त्यावर नकोत..!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. १८ :** नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होत असताना विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, जिल्ह्यातील सर्व शालेय वाहनांची फिटनेस तपासणी करण्यासाठी परिवहन विभागाने तातडीने विशेष मोहीम राबवावी, अशी ठाम मागणी आक्रमण युवक संघटना महाराष्ट्र राज्याचे यवतमाळ जिल्हाध्यक्ष अतुल पांडे यांनी केली आहे.

प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, मागील काही वर्षांत राज्यातील विविध भागांत शालेय वाहनांच्या अपघातांमुळे विद्यार्थ्यांना दुखापती व जीवित हानीच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे शाळा सुरू होण्यापूर्वी सर्व स्कूल बस, व्हॅन व विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या वाहनांचे फिटनेस प्रमाणपत्र, विमा, प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र (PUC), परवाने आणि इतर आवश्यक कागदपत्रांची काटेकोर तपासणी करण्यात यावी. याशिवाय प्रत्येक वाहनात अग्निशामक यंत्र, प्राथमिक उपचार पेटी, आपत्कालीन बाहेर पडण्याचा मार्ग, सीसीटीव्ही कॅमेरे, जीपीएस प्रणाली, स्पीड गव्हर्नर तसेच विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी सहाय्यक कर्मचारी उपलब्ध आहेत की नाही, याचीही पडताळणी करण्याची मागणी त्यांनी केली आहे.नियमांचे उल्लंघन करणाऱ्या व फिटनेस नसलेल्या वाहनांवर कठोर कारवाई करून अशा वाहनांना विद्यार्थ्यांची वाहतूक करण्यास बंदी घालावी, अशी मागणी करताना विद्यार्थ्यांच्या सुरक्षेशी कोणतीही तडजोड सहन केली जाणार नाही. असा इशाराही अतुल पांडे यांनी दिला.

# थोडक्यात



## स्वातंत्र्यवीर सावरकर चौकाचे लोकार्पण..! राष्ट्रभक्तीच्या विचारांना अभिवादन

**पांढरकवडा :** नगर परिषद पांढरकवडा यांच्या पुढाकारातून स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या प्रतिमेचे अनावरण आणि 'स्वातंत्र्यवीर सावरकर चौक' नामफलकाचे लोकार्पण रविवारी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. लोकनेते अण्णासाहेब देशमुख पारवेकर यांच्या हस्ते प्रतिमेचे अनावरण करण्यात आले. यावेळी नगराध्यक्ष आतिश (सोनुभैया) बोरेले, उपाध्यक्ष अतिश चव्हाण, घाटंजी नगर परिषदेचे अध्यक्ष परेश कारिया, प्राचार्य डॉ. रमेश जलतारे, गजानन बेजंकीवार, काशिनाथ मिलमिले यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात प्राचार्य डॉ. रमेश जलतारे यांनी सावरकरांचे राष्ट्रभक्तीपर विचार, सामाजिक सुधारणांसाठीचे योगदान आणि स्वातंत्र्यलढ्यातील त्यांचे कार्य यावर प्रकाश टाकला. 'जयोस्तुते' गीताने प्रारंभ झालेल्या या सोहळ्यात नागरिक, महिला व युवकांची मोठी उपस्थिती लाभली. "स्वातंत्र्यवीर सावरकर की जय" आणि "भारत माता की जय"च्या घोषणांनी परिसर दणाणून गेला. सावरकरांच्या विचारांचे स्मरण जपणारा हा चौक शहराच्या राष्ट्रप्रेरणेचे नवे प्रतीक ठरणार असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

## विडूळच्या श्री नाल साहेब संस्थानात मोहरम उत्सवाला प्रारंभ

**उमरखेड :** तालुक्यातील मौजे विडूळ येथे शेकडो वर्षांची धार्मिक सलोखा, एकता आणि सर्वधर्म समभावाची परंपरा जपणाऱ्या मोहरम उत्सवाला उत्साहात प्रारंभ झाला आहे. श्री नाल साहेब संस्थान (रजि. क्र. ए-१००४) येथे मोहरमनिमित्त पवित्र श्री नाल साहेब, ताज (तांबारी), विविध सवारी आणि ताजियांची स्थापना करण्यात आली. दि. १६ जून रोजी परंपरेनुसार भूमिपूजन (अलावा पूजन) करून उत्सवाची सुरुवात करण्यात आली, तर दि. १७ जून रोजी सवारींची विधिवत स्थापना झाली. मोहरमच्या सात, नऊ आणि दहा तारखेला पवित्र श्री नाल साहेब सवारी, ताज सवारी आणि ताजियांच्या पारंपरिक ग्रामफेऱ्या (मिरवणुका) काढण्यात येणार असून दहाव्या दिवशी विसर्जन होणार आहे. महाराष्ट्रासह परिसरातील हजारो भाविक या उत्सवात दर्शनासाठी उपस्थित राहतात. दि. २८ जून रोजी खिचडी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. सर्व भाविकांनी उत्सवात सहभागी व्हावे, असे आवाहन संस्थापकीय अध्यक्ष व पुजारी जयराम शंकरराव डांगे गुरव यांनी केले आहे.

## औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची प्रवेश प्रक्रिया सुरू..!

**बाभूळगाव :** येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून २०२६ या सत्रा करिता दि. २१ जून पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन प्राचार्य विशाल मिलमिले यांनी केले आहे.कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभाग, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई अंतर्गत कार्यरत आजीबाई बनारसे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, बाभुळगाव येथे सत्र ऑगस्ट २०२६ करीता प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. विविध रोजगाराभिमुख तांत्रिक अभ्यासक्रमांसाठी ऑनलाईन प्रवेश अर्ज नोंदणी करण्याची अंतिम मुदत २१ जून २०२६ पर्यंत आहे. या संस्थेमध्ये उपलब्ध असलेले एकूण ६ अभ्यासक्रम पैकी वीजतंत्री (Electrician), जोडारी (Fitter), इलेक्ट्रॉनिक्स मेकॅनिक (Electronics Mechanic) तसेच ट्रॅक्टर मेकॅनिक (Tractor Mechanic) या चार व्यवसाय अभ्यासक्रमा करीता पात्रता १० वी उत्तीर्ण तसेच वेल्डर (Welder) व ड्रेस मेकिंग (Dress Making) या दोन व्यवसाय अभ्यास क्रमा करीता पात्रता १० वी उत्तीर्ण किंवा अनुत्तीर्ण अशी आहे. संस्थेत सर्व ट्रेड्स मिळून एकूण १४४ जागा उपलब्ध आहेत.

# उपविभागीय अधिकाऱ्यांचे अधिकार वापरून खरेदी-विक्री..!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

## पुसद दुय्यम निबंधक कार्यालय पुन्हा वादाच्या भोवऱ्यात!



**पुसद, दि. १८ :** येथील सहाय्यक दुय्यम निबंधक कार्यालयात नियमबाह्य खरेदी-विक्री व्यवहारांचा प्रकार पुन्हा समोर आल्याने कार्यालयाच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. उपविभागीय अधिकारी यांच्या भूखंड विभाजन परवानगी शिवाय काही प्लॉट आणि अविभाज्य हिस्स्यांच्या खरेदीखतांची नोंदणी झाल्याचा आरोप होत असून, याबाबत उच्चस्तरीय चौकशीची मागणी जोर धरत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मौजा काकडदाती येथील सर्वे क्रमांक २/३ मधील प्लॉट क्र. १०६ मधील ३३.४२ चौ.मी. खुल्या जागेचे खरेदीखत दि. २ एप्रिल २०२६ रोजी दस्त क्र. २०२५ नुसार नोंदविण्यात आले. तसेच मौजा इटावा येथील सर्वे क्रमांक ५/२/ब मधील ०.०१.३९ आर अविभाज्य हिस्स्याचे खरेदीखतही त्याच दिवशी दस्त क्र. २०३८ नुसार नोंदणी करण्यात आल्याची माहिती आहे. या व्यवहारांसाठी आवश्यक असलेली उपविभागीय अधिकारी, पुसद यांची विभाजन परवानगी घेण्यात आली नसल्याचा आरोप असून, दलालांमार्फत आर्थिक लाभाच्या मोबदल्यात व्यवहार झाल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगली आहे. यापूर्वीही अशाच प्रकारांमुळे काही सामाजिक कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ येथे उपोषण करून कारवाईची मागणी केली होती. दरम्यान, ४ जून रोजी दस्त लेखक आणि दलाल यांच्यात नंबर लावण्याच्या कारणावरून दुय्यम निबंधक कार्यालयातच वाद आणि अश्लील शिवीगाळ झाल्याची घटना घडली होती. या प्रकरणाची चौकशी अद्यापही पूर्ण झालेली नाही. पुसदमध्ये दररोज मोठ्या प्रमाणात खरेदी-विक्री व्यवहार होत असून शासनाला कोट्यवधींचा महसूल मिळतो. मात्र, कथित गैरकारभार आणि दलालांच्या हस्तक्षेपामुळे कार्यालयाची प्रतिमा मलिन होत असल्याची भावना व्यक्त होत आहे. त्यामुळे नियमबाह्य व्यवहारांची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिक व सामाजिक कार्यकर्त्यांकडून होत आहे.

# आरक्षण उपवर्गीकरणा विरोधात दीक्षाभूमी ते जिल्हाधिकारी कार्यालय महामोर्चा..!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

## यवतमाळ येथून ५ हजार गाड्यांचा सहभाग"



**यवतमाळ, दि. १८ :** सर्वोच्च न्यायालयाच्या अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणा संदर्भातील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर आरक्षण उपवर्गीकरण विरोधी कृती समितीने यवतमाळ येथे पत्रकार परिषद घेऊन राज्य शासनाच्या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त केली. उपवर्गीकरणाचा निर्णय हा अनुसूचित जातींच्या घटनात्मक अधिकारांवर आणि अस्तित्वावर आघात करणारा असल्याचा आरोप करत हा निर्णय तातडीने मागे घेण्याची मागणी करण्यात आली.

यावेळी ॲड. जयसिंग चव्हाण यांनी सांगितले की, सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय हा पंजाबमधील विशिष्ट परिस्थितीशी संबंधित असून त्याची अंमलबजावणी महाराष्ट्रात सरसकट करता येणार नाही. महाराष्ट्रातील अनुसूचित जातींच्या ५९ जातींपैकी सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक मागासलेपणासोबत अस्पृश्यतेची झळ सोसणाऱ्या घटकांनाच संविधानाने आरक्षणाचा अधिकार दिला आहे. अशा स्थितीत उपवर्गीकरणाच्या माध्यमातून आरक्षणाचे पुनर्वाटप करणे घटनात्मकदृष्ट्या योग्य नसल्याचे त्यांनी नमूद केले. राज्य शासनाकडे यासंदर्भात कोणताही अनुभवाधारित (Empirical) डेटा उपलब्ध नसताना घाईघाईने निर्णय पुढे रेटला जात असल्याचा आरोपही त्यांनी केला. अनुसूचित जातींमधील काही जातींना अधिक लाभ मिळत असल्याचे सांगितले जात असले, तरी उर्वरित समाज घटका कडून उपवर्गीकरणाची कोणतीही ठोस मागणी नसल्याचा दावा त्यांनी केला. दरम्यान, आरक्षण उपवर्गीकरण विरोधी कृती समितीच्या वतीने जिल्हाभर जनजागरण मोहीम राबविण्यात येणार आहे. याच पार्श्वभूमीवर २० जून रोजी नागपूर येथील दीक्षाभूमी ते जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत संयुक्त विदर्भ महामोर्चा काढण्यात येणार असून, यवतमाळ जिल्ह्यातून सुमारे पाच हजार कार्यकर्ते आणि नागरिक वाहनांच्या ताफ्यासह सहभागी होणार असल्याची माहिती देण्यात आली. आगामी काळात मुंबई येथेही लाँग मार्च काढण्याचा इशारा समितीने यावेळी दिला. पत्रकार परिषदेला उमेश मेश्राम, प्रदीप बोरकर, प्रा.अंकुश वाकडे, अमर तांडेकर, मीनाक्षी सावरकर, चंदन हातागडे, रामदास वीर आणि नारायण थूल यांची उपस्थिती होती.

# अमरावती विधान परिषदेसाठी ९४.६८ टक्के मतदान

**-४२७ मतदारांनी बजावला हक्क, महायुतीचे पारडे जड!**





**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघात विधान परिषदेच्या एका जागेसाठी गुरुवार, १८ जून रोजी सरासरी ९४.६८ टक्के इतके विक्रमी मतदान झाले. सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत पार पडलेल्या या मतदानात राजकीय घडामोडींना प्रचंड वेग आला होता. ४५१ पैकी ४२७ मतदारांनी आपले कर्तव्य पार पाडले. महाविकास आघाडीचे काँग्रेस उमेदवार हर्षजीत देशमुख हे निवडणुकीत सक्रिय नसल्याचे पाहून काँग्रेसने बुधवारी रात्री उशिरा 'तटस्थ' राहण्याचा व्हिप जारी केला होता. मात्र, तरीपण शहरातील काँग्रेसच्या ७ नगरसेवकांनी हा पक्षादेश धुडकावून लावत थेट मतदान केले. ग्रामीण भागातही काँग्रेस सदस्यांनी व्हिपची पर्वा न करता उघडपणे मतदान केल्याने (काँग्रेसमधील अंतर्गत बंडाळी आणि महाविकास आघाडीतील समन्वयाचा अभाव चव्हाट्यावर आला आहे. काँग्रेसचे धीरज हिवसे, राजश्री जठाले, लुबना तनवीर, अफसर जहा सादिक शहा, प्रशांत महल्ले, विकी वानखडे, भल्ला यांनी पक्ष आदेश झुगारून मतदान केले. तसेच राष्ट्रवादी अजित पवार आणि युवा स्वाभिमान पार्टीच्या सर्व नगरसेविकांनी एक सोबत मतदान केले. शांतेत निवडणूक प्रक्रिया पार पडली. महायुतीमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. दर्यापूर, मोर्शी, धारणी, अचलपूर सर्वच ठिकाणी काँग्रेस ☞(पान २ वर)

### ■ प्रवीण पोटे यांनी घेतला आढावा

अमरावती जिल्ह्यात मतदानासाठी एकूण ७ मतदान केंद्रे उभारण्यात आली होती. प्रत्येक केंद्रावर मतदारांना आणण्याची आणि नेण्याची जबाबदारी स्थानिक नेत्यांवर सोपवण्यात आली होती. स्थानिक आमदार स्वतः मतदारांच्या संपर्कात होते. अमरावती शहरातील भातकुली, अमरावती तहसील या दोन केंद्रांवर महायुतीचे उमेदवार प्रवीण पोटे पाटील यांनी स्वतः भेट देऊन प्रतिनिधींकडून मतदानाचा आढावा घेतला.





### ■ तिवसात १२, दर्यापूर १ अमरावतीत ११ मतदार तटस्थ-

विधान परिषदेच्या अमरावती स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील निवडणुकीत आज मतदानाच्या दिवशी देखील नाट्यमय घडामोडी बघायला मिळाल्या. काँग्रेसच्या सदस्यांनी मतदानाला गैरहजर राहून तटस्थ रहावे, असा आदेश पक्षाकडून देण्यात आल्या नंतरही त्याला तिलांजली देत तिवसा येथील १२, अमरावतीचे ११ आणि दर्यापूर येथील एक सदस्य वगळता इतरांनी मतदानात सहभाग घेतल्याचे चित्र दिसले.

## मतदान केंद्रात मोबाईल नेल्याचे प्रकरण

# काँग्रेस नगरसेवक सै. मौलाना यांच्यावर गुन्हा दाखल



**अचलपूर/प्रतिनिधीः-** अमरावती स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधानपरिषद निवडणुकीसाठी अचलपूर येथील मतदान केंद्र क्रमांक २ वर मातादाना प्रक्रिया पार पडली. अचलपूर व चांदूरबाजार येथील एकूण ६९ मतदारांसाठी उपविभागीय अधिकारी कार्यालयाच्या नवीन प्रशासकीय इमारतीतील सभागृहात मतदान केंद्राची व्यवस्था करण्यात आली होती. निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदान केंद्रात मोबाईल फोनसह कोणत्याही इलेक्ट्रॉनिक उपकरणाच्या वापरास प्रतिबंध करण्यात आला होता. मात्र, अचलपूर नगर परिषदेच्या प्रभाग क्रमांक १३-ब येथील काँग्रेसचे नगरसेवक मोहम्मद सईद मोहम्मद सादिक (सै. मौलाना) हे मतदानासाठी जाताना नेहमीच्या सवयीप्रमाणे मोबाईल फोन सोबत घेऊन मतदान ☞(पान २ वर)

■ मतदान कक्षात नगरसेवक सै. मौलाना यांनी मोबाईलचा वापर केल्याने मोबाईल जप्त करण्यात आला.निवडणूक आयोगाच्या निर्देशाला अनुसरुन परतवाडा पोलिस स्टेशन येथे तक्रार दाखल करण्यात आली. **-बळवंत अरखराव,** मतदान केंद्राध्यक्ष अचलपूर

■ अचलपूर येथील मतदान केंद्र क्रमांक २ वरील विधानपरिषद निवडणूकीचे केंद्राध्यक्ष यांनी दिलेल्या फिर्यादीवरून नगरसेवक सै. मौलाना यांच्यावर गुन्हा नोंदविण्यात आला.पुढील कारवाई नियमाप्रमाणे केल्या जाईल. **-सुरेश मस्के ,ठाणेदार परतवाडा.**

## दर्यापूर येथे २७ नगरसेवकांनी केले मतदान



**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर येथे तहसिल कार्यालयात विधानपरीषदेचे मतदान पार पडले असून एकूण २९ पैकी २७ सदस्यांनी मतदानाचा हक्क बजावला आहे. यामध्ये काँग्रेसच्या एका नगरसेवकाचा यापूर्वीच मृत्यू झाला आहे तर काँग्रेसचेच एक नगरसेवक हजला गेल्याने ते आपला मतदानाचा हक्क बजावू शकले नाही.गुरुवारी दुपारी १२:३० पर्यंत २७ मतदारांनी विधान परिषद निवडणुकीत मतदान केले. यामध्ये काँग्रेसचे नगरसेवक रामेश्वर तांडेकर यांचा महिन्याभरपूर्वी मृत्यू झाला. तर हबीब खान असदुल्ला खान हे हज यात्रेला गेल्याने मतदानाचा हक्क बजावू शकले नाही. दर्यापूरमध्ये काँग्रेसच्या नगराध्यक्षसह १८ सदस्यांनी मतदान केले. तर भाजप ५, शिंदेसेना २, राष्ट्रवादी अजित पवार १, तर राष्ट्रवादी शरद पवार १ अश्या एकूण २७ सदस्यांनी मतदान केले.

# मोर्शीत शांततेत मतदान





**मोर्शी/प्रतिनिधीः-** तहसील कार्यालयाच्या आवारात विधान परिषदेच्या स्थानिक प्राधिकारी निवडणुक शांततेत पार पडले. अमरावती विधान परिषदेच्या स्थानिक प्राधिकारी ☞(पान २ वर)

# वाळूची अवैध वाहतूक करणारा गजाआड

**-३०.५६ लाखांचा मुद्देमाल जप्त**

**अमरावती/प्रतिनिधीः-** वाळूची अवैध वाहतूक करणाऱ्याला शिरजगांव पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. त्याच्या कडून १६ चाकी ट्रक सह आठ ब्रास कनान रेती असा एकूण ३० लाख ५६ हजाराचा मुद्देमाल जप्त केला आहे. शोएब खान अफसर खान (वय ३२, इस्लाम मज्जित ताज नगर नंबर.२) असे अटक आरोपीचे नाव आहे. शिरजगाव पोलिसांना पेट्रोलिंग दरम्यान गोपनीय माहिती मिळाली होती की गुरुवारी सकाळी ५.१५ वाजता बहिरम ते खरपी ☞(पान २ वर)



# मृत व्यक्तीच्या खात्यातून १४.८२ लाख लंपास



**अमरावती/प्रतिनिधीः-** मृत व्यक्तीच्या बँक खात्यातून १४ लाख ८२ हजार ४४२ रुपये गायब करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणात पोलिसांनी आरोपी उमेश रामराव ब्राह्मण (वय ४०,वरूड) आणि त्यांच्या पत्नी विरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. तक्रारदार महिलेने सांगितले आहे की ,त्यांच्या दिवंगत भावाच्या खात्यातून मोबाईल फोन आणि ऑनलाइन बँकिंग माध्यमातून विविध टप्प्यात एकूण १४ लाख ८२ हजार ४४२ आरोपी यांनी आपल्या खात्यात ट्रान्सफर केले. या संदर्भात माहिती मिळताच महिलेने वरुड पोलीस ठाण्यात तक्रार दिली. पोलिसांनी दोघांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला☞(पान २ वर)

# राजापेठ परिसरातून सराईत गुन्हेगार जेरबंद



**अमरावती/प्रतिनिधीः-** तडीपार आदेशाचे उल्लंघन करून अमरावती शहरात वावरत असलेल्या एका सराईत इसमाला राजापेठ पोलिसांच्या डीबी पथकाने सापळा रचून ताब्यात घेतले. या प्रकरणी त्याच्याविरुद्ध महाराष्ट्र पोलीस कायद्याच्या कलम १४२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, कुशल संजय बोबडे (वय ४०, रा. तखतमल कॉलेज मागे, राजापेठ) हा तडीपार असतानाही राजापेठ परिसरात फिरत असल्याची गोपनीय माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांना प्राप्त झाली होती. त्यानुसार डीबी पथकाला तत्काळ कारवाईचे आदेश देण्यात आले. १७ जून रोजी रात्री १०.२० वाजताच्या सुमारास डीबी ☞(पान २ वर)

# तडीपार गुन्हेगारांकडून कोयता-तलवार जप्त


**-नागपुरी गेट पोलिसांची धडक कारवाई**



**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरात तडीपार करण्यात आलेल्या गुन्हेगारांकडून पुन्हा दहशत निर्माण करण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे समोर आले असून, नागपुरी गेट पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण (डीबी) पथकाने दोन स्वतंत्र कारवायांत धारदार कोयता आणि तलवार जप्त करत दोन तडीपार आरोपींना जेरबंद केले आहे. पहिली कारवाई १७ जून रोजी करण्यात आली. डीबी पथकाला मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे ॲकेडमिक स्कूलच्या मैदान परिसरात सापळा रचण्यात आला. यावेळी तोंडाला रुमाल बांधून संशयास्पदरीत्या फिरणारा तडीपार आरोपी जब्बार खान रऊफ खान (वय २८, रा. अन्सारनगर) पोलिसांच्या नजरेस पडला. त्याची झडती घेतली असता त्याच्याकडून सुमारे ५०० रुपयांचा धारदार लोखंडी कोयता जप्त☞(पान २ वर)

# रखडलेल्या बडनेरा उडानपूलामुळे हायकोर्टने ओढले ताशेरे

**शासनाने उत्तर देण्यासाठी मागितला वेळ**




**अमरावती/प्रतिनिधीः-** बडनेरा येथील जुन्या बायपास मार्गावर रेल्वे क्रॉसिंगच्या वर उडान पूल निर्माण कार्यामध्ये होणाऱ्या विलंबामुळे मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने ताशेरे ओढले आहे. खंडपीठाने स्वतः जनहित याचिका दाखल करत याची दखल घेतली आहे आणि शासनाला यासंदर्भात आपला पक्ष ठेवण्यासाठी म्हटले आहे. शासनाने पक्ष प्रस्तुत करण्यासाठी जुलैपर्यंत वेळ मागितला आहे. या प्रकरणाची बुधवारी न्यायमूर्ती अनिल किल्लोर आणि राज वाकोडे यांच्या समक्ष सुनावणी झाली. एका पेपरच्या रिपोर्टच्या आधारावर ही याचिका दाखल करण्यात आली होती. ज्यामध्ये उडान पूल निर्माण कार्य कासव गतीने होतं असल्यामुळे नागरिकांना होणाऱ्या अडचणीचा उल्लेख करण्यात आला होता. केंद्र आणि राज्य शासनाच्या समन्वयाने बनविण्यात येणाऱ्या ६५० मीटर लांब उडान पूल सहा वर्षातही पूर्ण झाला ☞(पान २ वर)

# इतवारा बाजारातील खाद्यपदार्थांच्या दुकानांवर टाळे

**-तुकाराम मुंडे यांच्या कारवाईची धास्ती**

**अमरावती/प्रतिनिधीः-** अन्न व औषध प्रशासन आयुक्त म्हणून तुकाराम मुंढे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर राज्यभरात खाद्य सुरक्षेवर कठोर कार्यवाही करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर आज गुरुवार १८ जून रोजी शहरातील इतवारा बाजार परिसरातील बहुतांश खाद्यपदार्थांच्या दुकानांवर टाळे दिसले. प्रतिष्ठाने बंद असल्यामुळे इतवारा बाजार परिसरात आज सन्नाटा ☞(पान २ वर)



# ऑनलाईन जुगार अड्ड्यावर राजापेठ पोलिसांची धाड

**'फन टारगेट' गेमच्या माध्यमातून सुरू होता सट्टा**

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरात ऑनलाईन गेमिंगच्या नावाखाली सुरू असलेल्या जुगार व्यवसायावर राजापेठ पोलिसांनी धडक कारवाई करत एका गेमिंग सेंटरवर छापा टाकला. या कारवाईत दोन जणांविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, १५ हजार ७०० रुपयांचे साहित्य जप्त करण्यात आले आहे.




पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, यादव मार्केट, सुतगिरणी रोड परिसरातील एका दुकानात ऑनलाईन गेमिंगच्या माध्यमातून जुगार खेळविला जात असल्याची खात्रीलायक माहिती राजापेठ पोलिसांच्या डीबी पथकाला मिळाली होती. त्यानुसार १७ जून रोजी सायंकाळी साडेसात वाजताच्या सुमारास पोलिसांनी संबंधित ठिकाणी छापा टाकला.कारवाईदरम्यान रुपेश देविदास ☞(पान २ वर)

## एड स्केअरचे संचालक अश्विन गुजर यांना पितृशोक



**अमरावती/प्रतिनिधीः-** स्थानिक एड स्केअरचे संचालक अश्विन गुजर यांचे वडील मधुकरराव गणपतराव गुजर यांचे आज गुरुवार दि. १८ जूनला सकाळी ६ वाजता वृद्धापकाळामुळे अल्पशा आजाराने निधन झाले.ते ८९ वर्षाचे होते. त्यांची अंत्ययात्रा आज सायंकाळी ७.३० वाजता सामरा नगर नं.१, बडनेरा बायपास रोड येथील त्यांच्या निवास्थानाहून निघून हिंदू स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

कै. मधुकरराव गुजर यांच्या मागे उमेश, अविनाश आणि अश्विन ही तीन मुले, मंगला आणि सरिता या दोन मुली, नातवंडे आणि मोठा आप्त परिवार आहे.